


# सावध ऐका पुढल्या हाका...

लक्ष्यवेध प्रतिनिधी

आखाती देशांमध्ये प्रत्यक्ष रणकंदन सुरू होऊन जवळपास दोन महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी लोटला. इस्रायल, इराण आणि आसपासच्या प्रदेशात भडकलेल्या या युद्धझळांनी संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला आणि विशेषतः जागतिक ऊर्जापुरवठा साखळीला अक्षरशः वेठीस धरले. याच जागतिक महासंकटाची चाहूल लागल्यामुळे आणि देशाची अर्थव्यवस्था सुरक्षित ठेवण्याच्या अत्यंत प्रामाणिक व उदात्त हेतूने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशवासीयांना एक अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले आहे.

इंधनबचत करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, दैनंदिन जीवनात खाद्यतेलाचा वापर मर्यादित ठेवणे आणि अस्थिर काळात सोनेखरेदीचा मोह टाळणे, अशा काटकसरीच्या सवयी अंगीकारण्याची साद पंतप्रधानांनी देशवासीयांना घातली. त्यावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी 'आता हा देश चालवणे मोदींच्या आवाक्यातली गोष्ट नाही,' अशी अत्यंत असंबद्ध, बालिश आणि बेजबाबदार टीका केली. राहुल गांधींचे हे विधान म्हणजे निव्वळ मोदीद्वेषातून आलेली वैफल्याची मळमळ असून, राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवरही घाणेरडे राजकारण करण्याची विरोधकांची सवय किती बळावली आहे, याचे हे ज्वलंत उदाहरण. त्यामुळेच अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत या आवाहनाचा खरा अर्थ, त्यामागील दडलेले जागतिक अर्थशास्त्र समजून घेणे क्रमप्राप्त ठरावे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जनतेला काटकसरीचे जे आवाहन केले आहे, ते कुठल्याही आर्थिक कमकुवतपणाचे लक्षण नसून, ती एका द्रष्ट्या नेत्याची आणि खंबीर नेतृत्वाची दूरदृष्टी म्हणावी लागेल. भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाला दररोज लाखो बॅरल्स कच्च्या तेलाची आवश्यकता असते. आपल्या देशाच्या एकूण इंधन-गरजेपैकी तब्बल ८० ते ८५ टक्के कच्चे तेल आपण आयात करतो. ही आयात प्रामुख्याने आखाती देशांमधूनच होते. आज जेव्हा आखातात युद्धाचा भडका उडाला आहे, तेव्हा साहजिकच कच्च्या तेलाच्या विहिरी, तेलशुद्धीकरण प्रकल्प आणि तेलाची वाहतूक करणारे सागरीमार्ग धोक्यात आले. अशा वेळी भारताने वेळीच खबरदारीची पावले उचलली नाहीत, तर देशाची ऊर्जासुरक्षा धोक्यात येऊ शकते. ऊर्जासुरक्षा ही फक्त दुचाकी किंवा चारचाकी वाहने चालवण्यापुरती मर्यादित नसते; तर ती महाकाय उद्योगधंदे, कारखाने, रेल्वे, हवाई वाहतूक आणि कृषिक्षेत्राशीही निगडित आहे. या अनिश्चित काळात देशांतर्गत इंधनाचा पुरेसा साठा राखून ठेवणे आणि आयातीवरील अवलंबित्व शक्य तितके कमी करणे, हाच मोदींच्या आवाहनामागील प्रमुख हेतू. देशाची ऊर्जासुरक्षा अबाधित राखण्यासाठी प्रत्येकाने इंधनाचा थेंब अन् थेंब वाचवणे, हे आता राष्ट्रीय कर्तव्य बनले आहे.

पंतप्रधानांनी केलेल्या प्रत्येक आवाहनामागे गणिती अर्थशास्त्रही आहे. त्यांनी जनतेला सोनेखरेदी न करण्याचे आणि खाद्यतेलाचा वापर कमी करण्याचे जे आवाहन केले, त्याचा थेट संबंध देशाच्या विदेशी गंगाजळीशी आहे. भारत हा जगातील सर्वाधिक सोने आयात करणार्‍या देशांपैकी एक. आपण जेव्हा विदेशातून हजारो टन सोने आयात करतो, तेव्हा त्याचे मूल्य आपल्याला अमेरिकन डॉलर्समध्ये चुकवावे लागते. जागतिक बाजारपेठेत सोन्याचे भाव गगनाला भिडले आहेत आणि डॉलर वधारला. अशा वेळी महागड्या दराने सणासुदीच्या किंवा लग्नसराईच्या नावाखाली सोनेखरेदीचा सपाटा लावला, तर देशातील अब्जावधी डॉलर्सची विदेशी गंगाजळी सोन्याच्या आयातीवर खर्च होऊन देशाची व्यापारी तूट वाढेल. विदेशी गंगाजळी ही देशाची सर्वांत मोठी ताकद. तीच आपल्याला कच्चे तेल, नैसर्गिक वायू, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि औषधे आयात करण्यासाठी आवश्यक. देशाला चालवण्यासाठी कच्चे तेल आणि संरक्षण सामग्री हीदेखील तितकीच गरजेची. त्यामुळे मोदींनी भारतीयांना सोनेखरेदी टाळण्याचे केलेले आवाहन हे देशाचा पैसा देशातच आणि अत्यंत आवश्यक कारणांसाठीच राखीव राहावा, यासाठी आहे, हे लक्षात घ्यायला हवे. तीच बाब खाद्यतेलाची. आपण पेट्रोल-डिझेलची आणि खाद्यतेलाची बचत केली, तर आयातीचा खर्च अब्जावधी रुपयांनी कमी होऊ शकतो. हा वाचलेला पैसा अर्थव्यवस्था भक्कम ठेवण्यासाठी निश्चितच संजीवनी ठरणार आहे.

**आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशाची अर्थव्यवस्था आणि परकीय गंगाजळी सुरक्षित ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधनबचत आणि सोनेखरेदी टाळण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले. तेव्हा, आता प्रत्येक भारतीयानेही नागरी कर्तव्य म्हणून राष्ट्रहिताच्या यज्ञात पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनांना गांभीर्याने घेऊन समिधा अर्पण करण्याची हीच वेळ आहे.**

युद्धाच्या या दोन महिन्यांत युरोपसह आशिया खंडातील अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडून पडली. पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश यांसारख्या देशांमध्ये आज अक्षरशः हाहाकार उडालेला दिसतो. स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे उद्योगधंदेही ठप्प झाले आहेत. एवढे मोठे जागतिक संकट घोंगावत असताना, भारतात अन्य देशांप्रमाणे इंधनटंचाई निर्माण झाली नाही.

गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावरही टोकाचा परिणाम झाला नाही की, जीवनावश्यक वस्तूंची साखळी विस्कळीत झाल्याचे चित्र निर्माण झाले नाही. यामागे मोदी सरकारचे अचूक नियोजन आणि संकटाची आगाऊ चाहूल समजून घेऊन त्यानुसार वेळीच पावले उचलण्याची क्षमता आहे. जगात आग लागलेली असताना आपल्या देशातील चूल मात्र अत्यंत सुरक्षितपणे पेटत आहे. त्यामागचे कारण म्हणजे, सरकारने धोरणात्मक इंधनसाठ्याचा अत्यंत कल्पकतेने वापर केला. याशिवाय, भारताने रशियासारख्या देशाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल आयात करण्याचे धोरण कायम ठेवले आहे.

सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात वेळोवेळी धोरणात्मक बदल करून जागतिक दरवाढीचा थेट बोजा भारतीय ग्राहकांच्या खांद्यावर पडू दिला नाही. एकीकडे राजकोषीय तूट आटोक्यात ठेवणे आणि दुसरीकडे महागाईचा दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडेल असा नियंत्रित ठेवणे, अशी तारेवरची कसरत मोदी सरकार अत्यंत यशस्वीपणे करीत आहे. याच धोरणात्मक यशामुळे जग मंदीच्या छायेत असताना भारताचा विकासदर सर्वाधिक राहिला. अशा संवेदनशील परिस्थितीत प्रमुख विरोधी पक्षाने सरकारला आणि देशाला साथ देणे अपेक्षित असते. परंतु, 'आता हा देश चालवणे मोदींच्या आवाक्यातली गोष्ट नाही,' हे राहुल गांधींचे विधान त्यांच्या राजकीय अपरिपक्वतेचा आणि वैचारिक दिवाळखोरीचाच कळस म्हणावा लागेल. आखातात युद्ध सुरू आहे, जागतिक आयात-निर्यातीचे गणित बिघडले आहे, हे साधे अर्थशास्त्र समजण्याइतपत बौद्धिक झेप राहुल गांधींकडे नाही, हे यावरुन पुनश्च सिद्ध झाले. देशावर आर्थिक किंवा राष्ट्रीय सुरक्षेचे संकट येते, तेव्हा राजकीय जोडे बाजूला ठेवून देशाच्या, सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे राहायचे असते, ही लोकशाहीची प्रगल्भता. पण, दुर्दैवाने काँग्रेस आणि त्यांच्या आघाडीच्या नेत्यांमध्ये या प्रगल्भतेचा पूर्णपणे अभाव दिसतो.

पंतप्रधान मोदींनी केलेल्या या आवाहनाला देशातील जनतेने अत्यंत गांभीर्याने आणि सकारात्मकतेने घेण्याची गरज आहे. हे आवाहन कुठल्याही एका राजकीय पक्षाच्या फायद्यासाठी नसून, या देशातील १४० कोटी जनतेच्या सुरक्षित भविष्यासाठी आणि अखंड प्रगतीसाठीच आहे. इतिहास साक्षी आहे की, जेव्हा-जेव्हा पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला साद घातली आहे, तेव्हा-तेव्हा जनतेने त्यांना भरभरून प्रतिसाद दिला. मग तो 'स्वच्छ भारत' अभियानाचा संकल्प असो, गॅस सबसिडी सोडण्याचे ऐतिहासिक आवाहन असो किंवा महामारीचा तो अंधकारमय काळ असो. त्यामुळे भारताची जनताही नक्कीच या जागतिक परिस्थितीचे गांभीर्य ओळखेल आणि राहुल गांधींसारख्या नेत्यांच्या असंबद्ध बडबडीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून देशहितासाठी मोदींच्या आवाहनाला सक्रिय आणि सकारात्मक प्रतिसाद देईल, हे निश्चित. हा देश चालवणे ही १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक संकल्पाची आणि राष्ट्रभक्तीची ताकद आहे, हे या देशाने वेळोवेळी सिद्ध केले आहे. म्हणूनच, 'सावध ऐका पुढल्या हाका' आणि राष्ट्रहिताच्या या महायज्ञात योगदान देण्यासाठी सज्ज व्हा!

# 'विजय'पर्वाला अननुभवाचे ग्रहण...

वेधक विजय कुलकर्णी

नुकतेच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. तामिळनाडूमध्ये अनपेक्षितपणे जोसेफ विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' अर्थात 'टीव्हीके' या अवघ्या अडीच वर्षांचे राजकीय संचित असलेल्या पक्षाला १०८ जागांवर घवघवीत यश मिळाले. मात्र, २३४ आमदारांच्या विधानसभेत आवश्यक ११८ हा बहुमताचा आकडा विजय यांना गाठता आला नाही. शेवटी काँग्रेससह 'सीपीआय', 'सीपीआय-एम', 'व्हीसीके', 'आययूएमएल' या पक्षांनी 'टीव्हीके'ला पाठिंबा दिला आणि विजय यांच्या शपथविधीचा मार्ग मोकळा झाला. पण, या संपूर्ण प्रक्रियेसाठी तब्बल चार वेळा 'लोकभवना'च्या फेर्‍या विजय यांना माराव्या लागल्या. एकदा तर ते काँग्रेसच्या समर्थनाचे पत्र गाडीमध्येच चक्क विसरल्याचीही बातमी झळकली. त्यामुळे तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांना 'पॉलिटिक्स इज सीरियस बिझनेस' असा वडीलकीचा सल्लाही विजय यांना प्रारंभीच द्यावा लागला. अखेरीस अण्णाद्रमुकच्या एस. पी. वेलुमणी गटातील २५ आमदारांच्या पाठिंब्यामुळे 'टीव्हीके'कडे १४४ आमदारांचे भक्कम पाठबळ सिद्ध झाले. याचाच अर्थ, काँग्रेस आणि डावे 'टीव्हीके'ला त्यांच्या तालावर नाचवू शकणार नाही, याचीही अप्रत्यक्ष तजवीज अण्णाद्रमुकला सत्तेत सामील करून कुठेतरी केंद्रानेच घेतलेली दिसते. त्यामुळे विजय यांच्या बाळसे घेतलेल्या सरकारवरील राजकीय अस्थिरतेचा धोका तूर्तास टळला आहे. मात्र, तरीही विजय यांच्या सरकारवर अननुभवाचे ग्रहण मात्र कायम आहे.

जोसेफ विजय शरीरयष्टीने वाटत नसले, तरी त्यांचे वयवर्षे ५१! आता या ५१ वर्षांपैकी तब्बल ४० वर्षांचा त्यांचा प्रदीर्घ अनुभव हा तामिळ चित्रपटसृष्टीतला. १९८४ साली बालकलाकार म्हणून सुरू केलेली कारकीर्द ते आता जवळपास ६९ चित्रपटांतून विजयने तामिळ प्रेक्षकांच्या मनात गारुड निर्माण केले. 'थलपती' (अर्थात, सेनापती) अशी त्यांची तामिळनाडूमध्ये 'लार्जर देन लाईफ' प्रतिमा आणि त्याच प्रतिमेने त्यांची राजकारणातील विजयी वाट सुकर केली. तसा 'रील लाईफ' ते 'रिअल लाईफ' राजकारणाचा तामिळनाडूला जुनाच राजकीय वारसा. करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन आणि नंतर जयललिता, या तीन दिग्गजांनी चित्रपटांतून प्रेक्षकांची मने जिंकल्यानंतर मुख्यमंत्री म्हणूनही राज्याचे आपापल्यापरीने सक्षमपणे नेतृत्व केले. रजनीकांत, कमल हसन या तामिळ सुपरस्टार्सनेही आपले नशीब राजकारणात आजमावून बघितले खरे. पण, त्यात ते अयशस्वी ठरले.

जोसेफ विजय मात्र त्याला अपवाद! २०२४ साली 'टीव्हीके'ची स्थापना करून, आता २०२६ साली ते सत्तेच्या केंद्रस्थानी आहेत. पण, पद, प्रसिद्धी, पैशाचा हा आलेख जितक्या वेगाने वर उंचावतो तितक्याच तीव्रतेने कोसळायलाही फारसा वेळ लागत नाही, ही खूणगाठ विजय यांनी आताच बांधलेली बरी! कारण, खरेखुरे राजकारण हे सिनेमाप्रमाणे 'स्क्रिप्ट'वर नव्हे, तर दिवसागणिक नवनवीन आव्हाने इथे राजकीय 'स्किल'चीच कसून परीक्षा घेत असतात. ही आव्हाने सत्ता उपभोगणार्‍या करुणानिधी, एमजीआर आणि जयललिता यांच्या नेतृत्वालाही चुकली नाहीत. त्यामुळे या पूर्वसूरींच्या अनुभवातून, नेतृत्वशैलीतून धडा घेऊन विजय यांना स्वतःचे नाणे खणखणीत वाजणारे आहे, हे सिद्ध करावे लागेल.

**चित्रपटातील राजकीय नाट्यावर अवघ्या तीन तासांत पडदा पडतो. पण, वास्तवात राजकारण हे 'प्रोफेशन' नसून २४ तास आणि ३६५ दिवसांचे जनसेवेचे अखंड 'पॅशन' आहे. मात्र, तामिळनाडूतील विजय सरकारचे निकालापासून ते आजवरचे अवघ्या काही तासांतील निर्णय पाहता, 'टीव्हीके' सरकारवरील हे अननुभवाचे ग्रहण सर्वस्वी चिंताजनकच म्हणावे लागेल.**

विजय यांना शपथ घेऊन अवघे काही तास उलटत नाही, तोवर त्यांच्या एका निर्णयाला मद्रास उच्च न्यायालयात आव्हानही दिले गेले. हा निर्णय म्हणजे त्यांचे वैयक्तिक ज्योतिषी राधान पंडित वेट्रिवेल यांची 'ओएसडी' म्हणून जाहीर केलेली नियुक्ती. खरेतर 'ओएसडी' हे अत्यंत जबाबदारीचे पद. या पदावर शक्यतो 'आयएएस' दर्जाचे अधिकारी, ज्येष्ठ सल्लागार किंवा राजकीय पार्श्वभूमी असलेल्या धोरणी व्यक्तीची निवड अपेक्षित असते. पण, विजय यांनी ज्योतिषालाच 'ओएसडी' म्हणून नेमल्याने टीकेची झोड उठली.

मित्रपक्षांनी विजय यांच्या या निर्णयाला उघड विरोध केला. 'सरकार विज्ञाननिष्ठतेवर विश्वास ठेवणारे हवे. अशाप्रकारे ज्योतिषाच्या निवडीने समाजात चुकीचा संदेश जाईल,' म्हणून अखेरीस विजय यांनी काल या नियुक्तीला स्थगितीही दिली. मुळात जो मुख्यमंत्री ख्रिश्चन धर्म मानतो, वर स्वतःला 'सेक्युलर' म्हणवून मिरवतो, अशा नेत्याला ज्योतिषाची गरजच काय, हा प्रश्न पडणे साहजिकच. त्यातच एकीकडे ज्योतिषाची नेमणूक करणारे विजय मात्र परवा उदयनिधीच्या विधानसभेतील 'सनातन धर्माचे उच्चाटन करायला हवे' या संतापजनक विधानावर मात्र मूग गिळून बसले. म्हणजे विजय यांना सनातनची ज्योतिष-परंपरा मान्य; पण त्याच सनातनचा जेव्हा उदयनिधीकडून विधानसभेच्या सभागृहात अपमान झाला, तेव्हा विजय तोंड शिवून का बसले होते? शपथ घेतल्यानंतर केलेल्या भाषणातच 'आता सेक्युलॅरिझम आणि सामाजिक न्यायाच्या नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे,' असे वक्तव्य विजय यांनी केले. पण, ज्योतिषाच्या निवडीवरून त्यांचे हेच 'सेक्युलॅरिझम' मित्रपक्षांनाही खुपले आणि त्यांच्या विरोधामुळे 'ओएसडी' नियुक्तीचा निर्णय त्यांना रद्द करावा लागला. त्यामुळे विजय यांच्या कारकिर्दीची सुरुवातच काहीशी अडखळत झालेली दिसते. त्यातच विजय यांची विधानसभेतील एकूणच देहयष्टीही शपथविधीच्या दिवशीप्रमाणे आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेली नव्हती. त्यांच्या चेहर्‍यावर चिंता, निराशा यांचे मळभ जणू दाटून आले होते. काही राजकीय तज्ज्ञांच्या मते, विजय यांनाही खरेतर अभूतपूर्व विजय अपेक्षित नसावा.

आपण अवघ्या काही जागा जिंकू आणि चित्रपटातील अभिनयही पुढे असाच सुरू राहील, असा त्यांचा कयास असावा. पण, आता त्यांना अभिनयाला पूर्णविराम देऊन, पूर्णवेळ मुख्यमंत्रिपदाची भूमिकाच निभवावी लागेल. जनतेला दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठाही करावी लागेल. त्यामुळे हे स्थित्यंतरही वाटते तितके सोपे नक्कीच नाही. राजकारणात नियम, कायदे, राजशिष्टाचाराचे पालन, सरकार, प्रशासन, पक्ष आणि जनता या चारही स्तरावर सुसंवाद विजय यांना प्रस्थापित करावा लागेल. शपथ विधीदरम्यान आपणच सत्तेचे केंद्र असणार आहोत, हे विजय यांनी जाहीर केले खरे. परंतु, सत्तेचे किती पातळीवर केंद्रीकरण करायचे आणि कुठे विकेंद्रीकरण आवश्यक आहे, याचा सुवर्णमध्य विजय यांना साधावा लागेल. शिवाय विजयच पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्रीही; त्यामुळे पक्ष आणि सरकार या दोन्हीच्या कसोटीवर त्यांच्या नेतृत्वाचा कस निश्चितच लागू शकतो. करुणानिधी, जयललिता यांची नेतृत्वशैली, कार्यशैली एकमेकांपासून भिन्न असली, तरीही द्रविडी राजकारणावर दबदबा निर्माण करण्यात ते कमालीचे यशस्वी ठरले. त्यामुळे सिनेमातील सुपरस्टार जोसेफ विजय आता राजकारणातही त्याच त्वेषाने चमकेल का, हे येणारा काळच ठरवेल!



मागोवा

प्रकाश बापट



# शूरा मी वंदिले ....!

**देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात १८५७च्या स्वातंत्र्यसमराचे महत्त्व विलक्षण असेच. या समरामुळेच 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी'च्या सत्तेला सुरुंग लागला. या स्वातंत्र्यसमरात 'राष्ट्रवेदी'च्या 'यज्ञस्थंडिला'वर अनेक वीरांच्या ज्या 'जीवनसमिधा' अर्पण झाल्या, त्यातूनच पुढे १९४७च्या स्वातंत्र्याचा पाया घातला गेला. १० मे १८५७ मध्ये या स्वातंत्र्यसमराची पहिली ठिणगी पडली होती. त्यानिमित्ताने या स्वातंत्र्यसमराचा घेतलेला मागोवा...**

१८५७ चा उठाव हा ब्रिटिश राजवटीविरुद्धचा मोठा उठाव. हा उठाव महत्त्वपूर्ण अशासाठी की, ब्रिटिश सत्तेला आव्हान देण्याचा हा पहिलाच मोठा प्रयत्न ठरला. याच उठावातून पुढे भविष्यातील स्वातंत्र्यचळवळीचा पाया घातला गेला. म्हणूनच, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी या उठावाचा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' असा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या उठावाची कारणे अनेक होती. लॉर्ड डलहौसीचे 'खालसा धोरण' हे त्यापैकीच एक महत्त्वाचे कारण. त्याने दत्तक वारस नामंजूर करून झाशी, नागपूर, सातारा, जैतपूर ही संस्थाने खालसा केली. पुढे अवध संस्थानाचेही विलीनीकरण केले. संस्थाने खालसा केल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेले लोक व सैनिक बेरोजगार झाले. १८३३ पासून १८५७ पर्यंत ब्रिटिशांनी साम्राज्य विस्तारासाठी अनेक युद्धे केली. या युद्धांचा खर्चदेखील भारतीय जनतेवरच प्रचंड कर लादून वसूल करण्यात आला होता.

पाश्चात्त्य वस्तूंवरील आयात कर माफ केल्याने इंग्रजी मालाला उठाव मिळाला आणि भारतीय उद्योगधंद्यांना कठीण दिवस आले. स्वदेशी हस्तकला व उद्योग बंद पडल्याने बेरोजगारीही वाढली. 'सतीबंदी', 'विधवा पुनर्विवाह' कायद्यामुळे समाज दुखावला गेला. ब्रिटिशांकडून ख्रिश्चन धर्मप्रसारक आणि मिशनरी यांच्या कार्यामुळे धार्मिक स्वातंत्र्यालाच धोका असल्याची भावना सनातनींच्या मनात निर्माण झाली होती. त्याकाळी भारतीय सैनिकांना युरोपियन सैनिकांच्या तुलनेत कमी वेतन आणि दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असे. भारतीय सैनिकांना वरिष्ठ पदांवरही पदोन्नती मिळत नसे. १८०६ ते १८५० दरम्यान हिंदी सैनिकांनी बराकपूर, जबलपूर, फिरोजपूर, बरेली इत्यादी ठिकाणी युद्धे केली. हिंदी सैन्याच्या बळावरच इंग्रजांनी त्यांची भारतातील सत्ता बळकट करून साम्राज्य विस्तार केला खरा. परंतु, पदव्या व बक्षिसे फक्त इंग्रजी अधिकाऱ्यांनाच मिळत असत. सन १८५२ मध्ये डलहौसीने सरदार-ईनामदार यांचे हक्क तपासण्यासाठी नेमलेल्या 'इनाम आयोगा'ने ३२ हजार इनामांची चौकशी केली. त्यात मालकीचा पुरावा नसलेल्या २१ हजार वतनदारांची वतने जप्तदेखील केली. त्यावेळी वारस नाही म्हणून, आंग्रे यांचे संस्थानही खालसा करण्यात आले. या सर्व कारणांसोबतच एक तत्कालिक कारण घडले ते म्हणजे, नवीन 'एनफील्ड रायफल'मध्ये वापरल्या जाणाऱ्या काडतुसांना गाय व डुकराची चरबी लावली जाई. ही काडतुसे तोंडाने तोडावी लागत असल्याने हिंदू-मुस्लीम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. त्यातूनच दि. १० मे १८५७ रोजी मीरत येथे उठावाची पहिली ठिणगी पडली. म्हणजेच, हा उठाव अनेक घटनांच्या एकत्रित परिणामांमुळेच घडून आला. मीरत येथील उठावाबरोबरच दिल्ली, लखनौ, लाहोर, अलाहाबाद, अलिगढ, पेशावर, मथुरा, आग्रा येथेही गडबडी सुरू झाल्या. मंगल पांडे, सेनापती बहादूरशहा दुसरा, नानासाहेब पेशवा दुसरा, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवरसिंह, मानसिंग, बेगम हजरत महल यांनी, तसेच इतर अनेक सैनिकांनीही उठावाचे नेतृत्व करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. हा उठाव भारतीय इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. या उठावादरम्यान, मे महिन्यात सैनिकांनी दिल्ली ताब्यात घेऊन बहादूरशहाला हिंदुस्थानचा बादशहा म्हणून घोषित केले.परंतु, थोड्याच दिवसांत सेनापती लॉरेन्सने दिल्लीवर पुन्हा 'युनियन जॅक' फडकावला. इंग्रज अधिकारी ऊट्रम आणि हॅवलॉक यांनी लखनौमधील उठाव मोडीत काढले. ड्युरँड याने माळव्यातील उठाव मोडीत काढला. मार्च १८५८ मध्ये इंग्रजांनी झाशीला वेढा दिला. अधिकारी ह्यू रोज व झाशीची राणी यांच्यात लढाई होऊन इग्रजांनी झाशी संस्थानही ताब्यात घेतले. पुढे राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे ग्वाल्हेर येथे इंग्रजांविरुद्ध लढले. मात्र, या लढाईत राणी लक्ष्मीबाई यांना हौतात्म्य आले. जानेवारी १८५९ मध्ये राजपुतान्यातील सीकर येथे तात्या टोपे व इंग्रज यांच्यातील लढाईत तात्या टोपे यांचा पराभव झाला आणि ते पकडले गेले. पुढे एप्रिल १८५९ मध्ये त्यांना फाशी देण्यात आली. या उठावाचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले होते.

इंग्रजी सत्ता उलथविण्यासाठी आणि साताऱ्याच्या गादीचे पुनरुत्थान करण्यासाठी सातारकरांचा वकील रंगो बापूजी याने पुणे, सातारा, कोल्हापूर येथे गुप्त कारस्थाने सुरू केली. ग्वाल्हेरचे ज्योतीराव घाटगे व निंबाळकर यांनी कोल्हापुरात शस्त्र उगारले. पण, इंग्रजांच्या लष्करी शक्तीपुढे फारकाळ निभाव लागला नाही. १८५७ चा हा उठाव प्रामुख्याने उत्तर भारतापुरताच मर्यादित राहिला. दक्षिण भारत, पंजाब व बंगालचा मोठा भाग यापासून अलिप्तच राहिला. या उठावामधील लोकांपुढे निश्चित ध्येय नव्हते, त्यांच्यात एकजूट नव्हती. सर्व नेत्यांची उद्दिष्टे वेगवेगळी होती. कोणाला आपली गेलेली सत्ता परत हवी होती, तर कोणाचा ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांवरच राग होता. म्हणजेच, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे स्पष्ट ध्येय नव्हते. तसेच या उठावाला सर्वमान्य असे केंद्रीय नेतृत्वही नव्हते.

विविध ठिकाणी स्थानिक नेत्यांनी आपापल्या परीने लढा दिला. परंतु, त्यांच्यात समन्वयाचाही अभाव होता. तसेच हे सर्व नेते डावपेचांच्या पातळीवरही कमी पडल्याचेही लक्षात येते. याबरोबरच, अनेक भारतीय राजे, संस्थानिक, जमीनदार वर्ग इंग्रजांच्या बाजूनेच या उठावादरम्यान उभा राहिला. याच सर्व कारणांमुळे इंग्रजांना अवघ्या एका वर्षामध्ये हा उठाव मोडून काढण्यात यश मिळाले. मात्र, या उठावामुळे हिंदुस्थानचा राज्यकारभार 'ईस्ट इंडिया कंपनी'कडून ब्रिटनच्या संसदेकडे गेला. कंपनीचे 'बोर्ड ऑफ कंट्रोल' रद्द करून 'इंडिया काऊन्सिल' नेमण्यात आले. सैन्याची पुनर्रचना होऊन गव्हर्नर जनरल कॅनिंग हिंदुस्थानचा पहिला व्हाईसरॉय झाला.

१८५७चा उठाव तत्कालीन परिस्थितीत जरी अयशस्वी झाला असला, तरी यामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची चेतना जागृत होण्यास मोठीच मदत झाली. पुढील काळातील स्वातंत्र्यसंग्रामात या उठावाची पहिले स्वातंत्र्यसमर म्हणून स्मृती जागी ठेवण्यात आली.

१९५७ मध्ये संपूर्ण भारतात १८५७च्या उठावाचा शतसांवत्सरिक उत्सवदेखील साजरा करण्यात आला. या उठावाचे विश्लेषण शेषराव मोरे, ज. द. जोगळेकर (१८५७चा प्रस्फोट), सेतुमाधवराव पगडी (१८५७चे आणखी काही पैलू), अनिल गोडबोले (१८५७ची यशोगाथा), परशुराम देसाई (१८५७च्या बंडाचा वणवा), कॅप्टन राजा लिमये (रणसंग्राम १८५७ चा - भाग १ व २) अशा अनेक अभ्यासकांनी गौरवपूर्ण शब्दांत केले. परंतु, प्रखर देशभक्त स्वा. सावरकर यांच्या लेखणीतून साकारलेले '१८५७चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक आदर्शवतच. तरुणांमध्ये स्वातंत्र्याचे 'स्फुल्लिंग' चेतविण्याचे कार्य या पुस्तकाने त्याकाळी केले. ज्वालामुखी, स्फोट, अग्नीकल्लोळ आणि तात्पुरती शांतता अशा चार भागांत विभागलेल्या या पुस्तकाची सुरुवात, स्वधर्म आणि स्वराज्य यापासून होते. दुसऱ्या भागात हुतात्मा मंगल पांडे आणि अयोध्या प्रांतामधील लढायांचा समावेश आहे.

तिसऱ्या भागात सेनापती तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई यांच्या योगदानाची माहिती असून, पूर्णाहुती व समारोपाने याची सांगता होते. स्वा. सावरकरांनी लंडनमधील वास्तव्यातच हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची ओळख 'क्रांतिकारकांची गीता' अशीच होती. या पुस्तकावर ब्रिटिशांनी प्रकाशनापूर्वी बंदीही घातली. मूळ ग्रंथ ६०० पानांचा असून, त्याच्या संक्षिप्त आवृत्तीला प्र. के. अत्रे यांनी १२ पानांची प्रस्तावना लिहिली आहे.

ज्ञानेश्वरीनंतर इतके तोलामोलाचे पुस्तक, मराठी वाययामध्ये नाही, असे अत्रे यांनी या पुस्तकाबद्दल लिहिले आहे. ते पुढे म्हणतात की, सत्तावन्नी क्रांतियुद्ध हे 'महाभारता'तील एखाद्या 'पर्वा'सारखे किंवा 'रामायणा'तील एखाद्या 'कांडा'सारखे वाटते. त्याचा इतिहास लिहिणार्याच्या अंगी महर्षी व्यास किंवा वाल्मीकींसारखीच काव्यप्रतिभा असावयास पाहिजे. वीर सावरकरांना ती दिव्य देणगी उपजतच असल्याने क्रांतिरसाने ओथंबलेले हे महाकाव्य, ते एवढ्या प्रखर व प्रभावी शैलीने लिहू शकले. क्रांतीवर आणि स्वातंत्र्यावर आजपर्यंत जगामध्ये अनेकांनी काव्ये लिहिली असतील; पण त्यावर लिहिलेले जिवंत आणि ज्वलंत महाकाव्य हे एकच. हे वाचत असताना, आपण एखाद्या जळत्या ज्वालामुखीच्या अंतर्भागातून वावरतो आहोत, असे वाटते. या १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांना हे पुस्तक समर्पित करताना स्वातंत्र्यवीर लिहितात, स्वधर्म आणि स्वराज्य यांकरिता झुंजता झुंजता धारातीर्थी पतन पावलेल्या सहस्त्रावधी अज्ञात हुतात्म्यांनो! ही इतिहास कृती तुमच्या वीरवृत्तीला समर्पित असो! सहस्त्रावधी हुतात्म्यांचे- देशवीरांचे रक्त! हा इतिहासही त्या रक्तालाच अर्पण! स्वदेशाकरिता लढण्यासाठी सिद्ध झालेल्या हे वीरांनो! तुम्ही कुठले कोण? तुमची नावे तरी काय? तत्त्वाची अग्निज्वाला तुमच्या हृदयात केव्हा पेटून उठली?... विजय जरी हातचा गेला, तरी तुम्ही आपल्या कीर्तीला कलंक लागू दिला नाहीत. तुमच्या पराक्रमाने भूतकाळाचा कलंक धुऊन निघून, तो अधिकच उज्वल होवो आणि तुमचा तोच पराक्रम भविष्याचे स्फूर्तिस्थान आणि चैतन्यनिधान होऊन राहो! स्वा. सावरकरांनी या उठावाची कारणमीमांसा करताना समर्थ रामदास स्वामींनी ३५० वर्षांपूर्वी लिहिलेल्या- **धर्माकरीता मरावे। मरोनी अवघ्यासी मारावे। मारिता मारिता घ्यावे। राज्य आपुले।।** या राष्ट्रमंत्राचा उल्लेख करून १८५७च्या क्रांतीमागे हेच तत्त्व आणि मानसशास्त्र असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. जस्टीस मॅकार्थी या इंग्रज इतिहासकाराने याबद्दल लिहिले आहे की, १८५७चा उठाव हे केवळ एक बंड होते असे नाही, तर त्यामध्ये सैन्यातील असंतोष, द्वेष आणि इंग्रजी राजवटीविरुद्धचा धर्मनिष्ठ सूड यांचा मिलाफ होता. म्हणूनच, या बंडाला खर्याखुर्या अर्थाने धार्मिक व राष्ट्रीय युद्धाचे स्वरूप प्राप्त झाले. या क्रांतियुद्धाच्या सुरुवातीला फासावर चढणारा पहिला हुतात्मा मंगल पांडे, बंदुकीच्या गोळीने जायबंदी झालेला संपूर्ण हात तलवारीने छाटून गंगामातेला अर्पण करणारा ८० वर्षांचा तरणाबांड म्हातारा कुंवरसिंह, स्वधर्मियांच्या फितुरीला बळी पडलेला फैझाबादचा शूर नेता मौलवी अहमदशहा, या स्वातंत्र्ययुद्धाच्या ज्वालामुखीत उघड्या डोळ्यांनी स्वत:ची आहुती देणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, 'हिंदुस्थानामध्ये परकीय लुटारू हे राजे आणि हिंदुस्थानचे खरे वारस मात्र चोर' असे उद्वेगाने म्हणत, नेपाळच्या जंगलात नाहीसे झालेले नानासाहेब पेशवे, इंग्रजांच्या सेनापतींना आपल्या युद्धकौशल्याने खडे चारणारे; परंतु, शेवटी विश्वासघाताने शत्रूच्या हाती सापडून फाशी गेलेले क्रांतीचे सेनापती तात्या टोपे, या सर्वांच्या बलिदानाची स्मृती आपण यानिमित्ताने जागी ठेवूया आणि स्वदेश, स्वधर्म आणि सुराज्यासाठी कृतिशील राहून, या सर्व ज्ञात- अज्ञात वीरांना खरी आदरांजली वाहूया...

---

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

# पालक असूनही अनाथ असलेली मुले

अनाथपणाची व्याख्या आपण साधारणपणे सरळ शब्दांत करतो. ज्यांचे आई- वडील नाहीत ती मुले. पण आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात एक वेगळे आणि अधिक गुंतागुंतीचे चित्र समोर येत आहे. अशी अनेक मुले आपल्या आसपास आहेत ज्यांचे आई-वडील जिवंत आहेत, आर्थिकदृष्ट्यो कुटुंब सक्षमही असते; तरीही त्या मुलांच्या आयुष्यात भावनिके आधार, सुरक्षितता आणि संवादाचा अभावे असतो. त्यामुळे ती मुले प्रत्यक्षात पालके असूनही अनाथपणाचा अनुभव जगत असतात. गेल्या दोन- तीन दशकांत भारतीये समाजात मोठे सामाजिक आणि आर्थिक बदले झाले.

शहरीकरण, नोकरीच्या संधी, स्पर्धात्मक शिक्षण व्यवस्था आणि बदलणारी कुटुंबरचनो यामुळे कुटुंबातील नातेसंबंधांचे स्वरूपही बदलले आहे. संयुक्त कुटुंबांची जागा लहाने कुटुंबांनी घेतली आहे. अनेकदा आई- वडीले दोघेही नोकरीत व्यस्त असतात, कामाचा ताणे असतो आणि वेळेची कमतरता असते. परिणामी घरात मुलांसोबत घालवला जाणारो वेळ कमी होत जातो. भौतिक गरजा पूर्ण होते



असल्या तरी भावनिक संवाद मात्र हळूहळू कमी होत जातो. या प्रक्रियेत मुलांवर सर्वाधिक परिणाम होतो. आज अनेक मुले अशी आहेत ज्यांचे पालक नोकरीच्या निमित्ताने परगावी राहतात. काही मुलांना शिक्षणासाठी लहान वयातच होस्टेलमध्ये पाठविले जाते. काही नातेवाईकांकडे राहतात. अशा परिस्थितीत मुलांच्या दैनंदिन गरजा भागते असल्या, तरी त्यांच्या आयुष्यातील भावनिक उपस्थितीचा अभावे जाणवतो.

पालकांचा सहवास, मार्गदर्शन आणि संवाद हे बालविकासासाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत; परंतु तेच कमी पडले तर मुलांच्या मनावर खोल परिणाम होऊ शकतो. कुटुंबातील ताणतणाव ही आणखी एक महत्त्वाची बाब आहे. घटस्फोटाचे प्रमाण हळूहळू वाढताना दिसते आहे. काही कुटुंबांमध्ये सततचे वाद, भांडणं किंवा दुरावा असतो. घराते तणावपूर्ण वातावरण असताना मुलं अनेकदा गोंधळलेल्या अवस्थेत वाढतात.

आई- वडिलांमधील संघर्षाचा सर्वात जास्ते परिणाम मुलांवरच होतो. ते स्वतःला दोषी समजू लागतात, भीती किंवा असुरक्षिततेची भावना वाढते आणि त्यांच्या भावनिक विकासावर त्याचा दीर्घकालीन परिणाम होतो. यासोबतचे व्यसनाधीनतेचा प्रश्नही गंभीर आहे. काही घरांमध्ये मद्यपान किंवा इतर व्यसनांमुळे कौटुंबिक जीवन विस्कळीत होते. अशा घरांतील मुलांना अनेकदा दुर्लक्ष, भीती किंवा अस्थिरतेचा सामना करावो लागतो. काही वेळा त्यांना लहान वयातच जबाबदाऱ्या घ्याव्यो लागतात. लहान भावंडांची काळजी घेणे, घरातील परिस्थितो सांभाळणे किंवा मानसिक ताण सहन करणे.

बालपणाचा निरागसे काळ अशा वातावरणात हरवून जातो. शिक्षणाच्या नावाखाली मुलांना लहान वयातच होस्टेलमध्ये पाठविण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. चांगले शिक्षण, स्पर्धात्मक परीक्षा आणि करीअरच्या संधी यासाठी हे आवश्यक असल्याचे अनेक पालकांना वाटते. परंतु लहान वयात कुटुंबापासून दूर राहण्याचा अनुभव मुलांसाठी भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक असू शकतो. होस्टेलमधील जीवन शिस्तबद्ध असले, तरी घरातीले स्नेह, माया आणि संवाद यांची जागा कोणतीही संस्था पूर्णपणे घेऊ शकत नाही. या सगळ्या परिस्थितीत मुलांच्या आयुष्यात एक प्रकारचा भावनिक एकाकीपणा निर्माण होतो. आधुनिके तंत्रज्ञान आणि सोशल मीडियामुळे हा एकाकीपणा अनेकदो अधिक तीव्र होतो.

मोबाईल, टॅबलेट किंवा स्क्रीन ही मुलांचा वेळे घालविण्याची साधने बनतात; त्यातून खऱ्या अर्थाने भावनिक नाते निर्माण होत नाही. उलट संवादाची जागा हळूहळू डिजिटल माध्यमे घेतात. बाल मानसशास्त्राच्या अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे की, मुलांच्या निरोगी विकासासाठी केवळ अन्न, शिक्षण किंवो भौतिक सुविधा पुरेशा नसतात. त्यांना भावनिक सुरक्षितता, संवाद, समजून घेणारे पालक आणि स्थिर कुटुंबीय वातावरण आवश्यक असते. जरे हे घटक कमी पडले तर मुलांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव, एकाकीपणा, नैराश्ये किंवा वर्तना समस्या निर्माण होऊ शकतात. याचा अर्थ असा नाही की, प्रत्येक व्यस्त कुटुंबातील मुलं समस्यांना सामोरी जातात. अनेक कुटुंब कामाच्या ताणातही मुलांसोबत संवाद ठेवतात, वेळ देतात आणि त्यांच्या भावनिक गरजांची काळजी घेतात. परंतु वाढत्या शहरी जीवनशैलीत हा समतोल राखणे अधिक कठीण होत चालले आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ वैयक्तिक समस्या म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा प्रश्न व्यापक सामाजिक चिंतेचा विषय आहे. शाळा, समुपदेशन सेवा आणि समुदाय यांची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. शाळां ध्ये भावनिक आरोग्याबाबत संवेदनशीले वातावरण तयार करणे, समुपदेशन सेवा उपलब्ध करणे आणि पालकांना मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. पालकांसाठीही कामे आणि कुटुंब यामधील संतुलन साधणे ही आजची मोठी गरज आहे. शेवटी, बालपण ही केवळ वाढण्याची प्रक्रिया नाही; ती नात्यांमधून घडणारी एक जिवंत अनुभूती आहे.

पालकांचा वेळ, संवाद आणि प्रेम हे मुलांच्या आयुष्यातील सर्वात मोठे आधारे असतात. जर तेच कमी पडले तर मुलं घरात राहूनही एकटी पडतात. आज समाजाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे.

आपण आपल्या मुलांना उत्तम शिक्षण, चांगल्या सुविधा आणि उज्ज्वल भविष्य देण्याचा प्रयत्न करत आहोत; पण त्या प्रक्रियेत त्यांच्या बालपणाची ऊब आणि भावनिक सुरक्षिततो हरवत तर नाही ना? मुलांना केवळ घराची गरज नसते; त्यांना घरपण हवे असते; आणि तेच हरवलं, तर पालक जिवंत असूनही मुलं अनाथासारखी वाटू लागतो.

---

कथा

आरती देशपांडे

# भेट



'हॅलो!'' ''हां, बोला मामा?'' ''कुठं हायेस तू? कुणी हाय तुझ्या आजूबाजूनी?''

''आत्ताच सगळीकडली धुणीभांडीची कामं आटोपून घरी निघाली हाय मी!''

''कुणी हाय का तुझ्या आजूबाजूनी?''

''न्हाई ओ! का?'' ''झेंडे वकिलाचा फोन आल्ता. म्हनत होते का कसंही करून तुला पुन्याला घेऊन या, म्हनून.'' ''कशाला?'' ''त्यान्ला तुझी आन् बाहुलीची भेट घालून द्यायची हाय.'' ''बाहुलीची? इतक्या वर्षांनंतर? कसं जमंल मामा? कुनाला कळलं तर कसं?'' ''घाबरू नको. सगळं चुपचाप व्हनार हाय.'' ''पन मी कशी येऊ पुन्याला?'' ''सांग, मामाची तब्येत ठीक नाहीये, भेटून येती, म्हनून!'' ''कधी येते आहे बाहुली पुन्याला?'' ''मे महिन्याच्या आठ तारखेला! अन् धा तारखेला भेटायचं म्हणत होते वकीलसाहेब!''

''बघते मामा, कसं जमते ते! ठिऊ का फोन?'' ''ठेव. पण लवकरात लवकर जमव नक्की. ती बाहुली इथंच आली आहे. पुढल्या म्हैन्यात परत लंडनला जानार हाय.'' मामाचं फोनवरचं बोलणं ऐकून अन् 'बाहुली'चं नाव ऐकून तिचं मन एकदम मागे मागे गेलं. 'बाहुली...' माझी बाहुली, सोळा वर्षांची असंल आता! कशी दिसत असेल...? चौदा वर्षांची होती कुंती तेव्हा! आणि तो... मामाचा मुलगा अठराचा!

शेजारीच राहायचा. धाकल्या मामासाठी मुलगी बघायला त्याच्या आणि तिच्या घरचे गेले होते.तो घरात आला; आणि... आणि घडू नये ते घडलं. घरच्यांना कळेपर्यंत पाच महिने होऊन गेले होते. लांब आत्याच्या गावात, उजव्या गालावर वाटाण्याएवढं लालसर ल्हायसं घेऊन बाहुली जन्माला आली. पण... जे ते दहा दिवसांचं बाळ अनाथाश्रमात सोडावं लागलं. मामाचा मुलगा पुन्हा भेटलाच नाही. लग्न झाल्यावर बाहुलीला विसरावं लागलं तिला.

अनाथाश्रमातून एका लंडनमधल्या घरात दत्तक गेलेल्या बाहुलीनं नशीब काढलं म्हणत होता मामा. आता बाहुली भारत बघायला आली आहे. तिनं झेंडे वकिलामार्फत आपल्या जन्मदातीचा शोध घेतला आहे. तिला आईच्या भेटीची ओढ लागली आहे. कुंती खरं तर संसाराच्या रगाड्यात कष्ट करता करता बाहुलीला विसरली होती.

जन्माला आल्या आल्या कुंतीनं बाळाचं मनातल्या मनात नाव ठेवलं. 'बाहुली...' कुरळे दाट केस, एवढ्याशा चेहऱ्यावर उठून दिसणारं तरतरीत नाक, काळेभोर डोळे, लालचुटुक जिवणी, दिठ लागू नये म्हणून देवानंच गालावर दिलेलं वाटाण्याएवढं गोलाकार ल्हायसं, अगदी बाहुलीवाणीच होतं तिचं बाळ!

झेंडे वकिलाच्या घरीच एका खोलीत बाहुलीची आणि कुंतीची भेट ठरली. तिला पाहिल्याबरोबर कुंतीला वाटलं... 'ही बाहुली! व्हय! ही बाहुलीच हाय! हुबेहूब माझ्या सारखीच दिसतीय! फक्त दिसतीय; मात्र एखाद्या विंग्रजी मडमेवानी!' ''ओह! ममाऽ! माय डिअर मदर! हाऊ ब्युटीफूल शी इज!'' बाहुली तिच्याकडे झेपावली. तिनं बाहुलीला मिठीत घेतलं. तिचा चेहरा हाताच्या ओंजळीत घेतला... 'व्हय! ती तीच हाय! आपली सुंदर बाहुली! उजव्या गालावरचं गोल ल्हायसं! हीच खूण फक्त.' बाहुली इंग्रजीत काहीतरी बोलली. तिनं वकिलाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

''तिला आईच्या मांडीवर डोकं ठेवून थोडावेळ पडायचं आहे, असं म्हणतेय.'' ''व्हय व्हय!'' ती आनंदाने खाली मांडी घालून बसली आणि 'मांडीवर ये' असं बाहुलीला खुणेनं सांगितलं. बाहुलीच्या दाट सोनेरी केसांतून ती हळुवारपणे बोटं फिरवू लागली. अतीव समाधानाने बाहुली-ने डोळे मिटून घेतले. ''वंडरफुल!'' तिनं मग पिशवीतून बेसनाचे लाडू काढून बाहुलीला आणि इतरांना दिला.

''इट्स सोऽ यम्मी! सोऽ टेस्टी!'' बाहुलीनं मनापासून दाद दिली. कुंतीच्या मुलांची नावं विचारली. ''माझं नाव काय ठेवशील''असं विचारलं. ती म्हणाली, ''मधुरा!'' ''इट मिन्स?'' ''स्विट गर्ल!'' झेंडे वकील. ''ओह! सो नाईस ऑफ यू!'' बाहुली पुन्हा तिला बिलगली. तिच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

बाहुलीलाही गहिवरून आलं. तिनं बाहुलीला सुंदर आरसे टिकल्या लावलेली चणिया चोळी भेट म्हणून देऊन तिच्या कपाळावर ओठ टेकवले. बाहुलीला प्रश्न पडला...

'आपण काय द्यावं!' तिनं पटकन हातातलं हिरे जडवलेलं सोन्याचं ब्रेसलेट काढून आईच्या हातात सरकवलं. ती दचकली. मागे सरकली. ''नको, नकोच! न्हाई! मी नाही घेऊ शकत हे!'' बाहुली एकदम हिरमुसली. 'व्हाय? व्हाय नॉट ममा! प्लीज!'' मामा म्हणाला, ''घे! प्रेमाची भेट हाये ती! जपून ठीव! कोनाला दिसलंच तर यष्टीत सापडलं म्हून सांग.'' घरी आल्यावर तिनं ते माकडं सगळ्यात खालच्या मडक्यात तळाशी ठेवून त्यावर कापूस झाकून टाकला... 'कितीही कठीण परिस्थिती आली तरी हे इकायचं न्हाई!' तिनं मनो मन निश्चय केला. तिच्या आणि बाहुलीच्या अनमोल भेटीची निशाणी आहे हे कडं म्हणजे!



वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# लाटांवरचा वाटाड्या आणि भारत...



आ'पे रीप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' मधील त्या अज्ञात नाविकाची बोट हेलकावे खात भारतापाशी येऊन ठेपली होती. पाण्यावर हिरवेपिवळे साप नाचत होते. भडोच बंदर जवळ आले होते. द्वारकेच्या म्हणजेच कच्छच्या आखाताच्या पुढे भडोच आहे. तेथून पुढे 'आरियाके' (कोकण) या देशाचा किनारा सुरू होतो. राजा नंबनूसचे (क्षत्रप नहपान) राज्य आणि भारताची सीमा तेथून सुरू होते. इ. स. पहिल्या शतकातला हा राजा महाराष्ट्र, गुजरात, काही प्रमाणात मध्य प्रदेश आणि अर्थातच भडोच बंदरावर नियंत्रण ठेवून होता. त्या काळच्या 'अबिरिया'ला अभिरांच्या प्रदेश आणि किनारपट्टीला 'सिरास्ट्रिन' म्हणजेच सौराष्ट्र म्हणत.

तो अज्ञात नाविक म्हणतो, हा प्रदेश सुपीक आहे. गुराढोरांनी, धनधान्यांनी संपन्न आहे. येथील माणसे दणकट आणि रंगाने सावळी आहेत. येथे तांदूळ, मका, तिळाचे तेल, कापूस, तुपाचे भरपूर उत्पन्न होते. येथल्या कापसापासून जाडेभरडे वस्त्र तयार करतात. 'मीन्नागर' या मुख्य शहरातून भरपूर प्रमाणात कपडा भडोचला जातो. राजा अलेक्झांडरच्या प्रेरणेने बांधलेल्या मोठाल्या विहिरी, जुनी मंदिरे अजूनही येथे दिसतात. खरे तर अलेक्झांडर पंजाबच्या पुढे आलेला नव्हता. त्यामुळे त्या मोठ्याल्या विहिरी, मंदिरे त्याही अगोदरच्या असतील असे वाटते. त्या अज्ञात खलाश्याने भडोचच्या पुढे असलेल्या खंबायतच्या आखाताचे वर्णन केले आहे. तेथपर्यंत पोहोचण्याचा प्रवास खडकाळ आणि खडतर होता. तेथपर्यंत पोहोचायला 'नम्माडूस' नदीच्या मुखातूनच वळसा घालून पुढे जावे लागे. ही 'नम्माडूस' नदी म्हणजेच आपली नर्मदामाई. नर्मदा आणि माही नदीचे वर्णन या अज्ञात प्रवाशाने केलेले आहे. इ. स. पहिल्या शतकात या नद्या भारताला समृद्ध करीत होत्या. नदीच्या मुखाकडील भाग अतिशय खडकाळ त्यामुळे राजाने स्थानिक मच्छीमारांना हाताशी धरून लांब तराफ्यांची सोय केली होती. अशा बोटींना 'ट्रपग्गा' आणि 'कोटिंबा' म्हणत. सौराष्ट्रापासून भडोचच्या दिशेने जाणाऱ्या जहाजांना हे मच्छीमार वाट दाखवायचे. तो अज्ञात नाविक म्हणतो की, भारतामध्ये खूप नद्या आहेत. पौर्णिमा आणि त्यानंतरच्या तीन दिवसात नद्यांमध्ये पाणी खळाळून वाहते आणि पात्रामध्ये लाटांवर लाटा उसळतात. पण नंतर हळूहळू पाण्याचा जोर कमी होत जातो. भडोचमध्ये तर कधी उसळत्या लाटांमुळे खालचा तळ दिसत नाही आणि कधी पाणी अचानक ओसरून कोरडीठण्ण जमीन दिसते. भरतीच्या वेळीच जहाजे आत येऊ शकतात. या आखातात पहिल्यांदाच जे नवखे नाविक येतात त्यांच्यासाठी आत येणे किंवा बाहेर जाणे दोन्ही गोष्टी अतिशय धोक्याच्या असतात. नद्यांच्या पात्रांमध्ये भरतीचे पाणी शिरून त्याला अनेक पाणवाटा फुटतात आणि त्यामुळे नवखा गडी भरकटला जातो. भडोचमध्ये अनेक जाती-जमाती गुण्यागोविंदाने नांदतात.

कंदहारच्या खडतर परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी सिंधू नदी ओलांडून आलेले 'अरकोस्सी', काबुल नदीच्या किनाऱ्यावरचे पेशावर जिल्ह्यातले 'गांधारी' लोक, 'अरट्टी' म्हणजे पंजाबी लोक, 'पोक्लाईस' म्हणजे पुष्कलावती या गांधार देशाच्या राजधानीतले लोक अशा अनेक जाती-जमाती सुखाने नांदायच्या. या पलीकडे भडोचच्या वरच्या प्रदेशावर बल्ख (बॅक्ट्रिया- उत्तर अफगाणिस्तान) ही लढाऊ जमात होती. त्यांचे स्वतःचे राज्य होते. याच प्रदेशातून अलेक्झांडर राजाने भारतावर आक्रमण केले होते; पण तो दक्षिणेकडे जाऊ शकला नाही. त्या अज्ञात नाविकाने पुढे लिहिले आहे, अजून पूर्वेकडे 'ओझोने' नावाची जुनी राजधानी आहे. ही 'ओझोने' राजधानी म्हणजे आत्ताचे उज्जैन. उज्जैन प्राचीन काळातले अतिशय महत्त्वाचे व्यापार केंद्र होते. ग्रीक व्यापाऱ्यांसाठी आणि भारतीयांसाठी येथूनच भडोचला आयात व्हायची. गोद, इंद्रगोप आणि इतर मौल्यवान रत्ने, कारागीरांकडून तयार होणारे मलमल, जाडेभरडे कापड यासारख्या वस्तू आणल्या जायच्या. काश्मीर, हिंदुकुशचा पायथा आणि काबुल नदीच्या आसपासच्या प्रदेशाहून येणाऱ्या गुग्गुळ, लेंडी पिंपळी, औषधी मुळे, वनस्पती आणि इतरही अनेक सुगंधी वनस्पती भडोचहून रोमला निर्यात व्हायच्या. भडोचला अरब, इटली आणि तुर्कस्तानातल्या 'लाओडिसियाकडचे' मद्य आणि तांबे, कथिल, शिसे, पुष्कराज, सुवर्ण, पोवळे गारगोटीचे दगड, रुबी, सल्फर, सोन्या- चांदीची नाणी, डोळ्यांसाठी सुरमा, वनमेथी अशा अनेक गोष्टी आयात व्हायच्या. राजघराण्यांसाठी सोन्या-चांदीची महागडी भांडी, सुंदर दासी, गायक, वाद्ये, उत्कृष्ट वाईन, सुरेख विणकाम केलेले तलम कपडे आणि उत्तम प्रतीची मलमे आणली जात. भडोचच्या बाजूचा किनारा उत्तरेपासून दक्षिणेकडे जो सरळरेषेत पसरलेला आहे त्याला 'दचिनबेस' (दक्षिण देश) म्हणतात. कारण येथील स्थानिक लोक दक्षिणेला 'दख्खन' म्हणतात. भडोचच्या किनाऱ्यापासून पूर्वेकडे असलेल्या गंगा नदीपर्यंत दाट लोकसंख्या आहे. उंचच उंच पर्वतरांगा आहेत आणि वाळवंटी प्रदेशदेखील आहेत. बिबट्या, वाघ, हत्ती, साप, माकडे सगळीकडे सहज फिरत असतात. भडोचपासून २० दिवसांवर दक्षिणेकडे 'पैठण' व पैठणच्या पूर्वेला असलेले 'तेर' ही दोन अतिशय महत्त्वाची व्यापारी केंद्रे आहेत. पैठणमध्ये ऑनिक्स रत्नाचा मोठा साठा आहे. इ. स. पहिल्या शतकात कापड उद्योगाचे हे मोठे केंद्र होते. तेरमध्ये कापडांचे विविध प्रकार आहेत. तेथून उत्तरेला भडोच आणि दक्षिणेकडे मच्छलीपट्टमकडे व्यापार चालतो. बैलगाड्यां धून मालवाहतूक केली जाते. भडोचनंतर सुप्पारा (सोपारा) आणि कलियाना म्हणजेच कल्याण बंदरे येतात. तो अज्ञात नाविक लिहितो की, कल्याण बंदर हे थोरल्या सारगनाच्या काळी खुले बंदर होते. पण संदानेस राजाच्या काळात ग्रीक जहाजांना तेथे येण्यास मज्जाव करण्यात आला. थोरला सारगन आणि राजा संदानेस सातवाहन वंशाचे सातकर्णी राजे होते. पश्चिम किनारपट्टीच्या रोमन व्यापारावर ताबा मिळविण्याच्या प्रयत्नात ग्रीक जहाजांच्या मज्जावाचा निर्णय घेतला गेला असावा. जी ग्रीक गलबते कल्याण बंदरावर येत त्यांना पुन्हा बंदोबस्तात भडोचला पाठवण्यात येत असे. प्राचीन इतिहासातही असेच आढळून येते की, राज्यां धील संघर्ष हा नेहमी व्यापारी हितसंबंधातून निर्माण झाला आहे. कल्याणच्या पुढच्या व्यापारी बंदरांचीही माहिती या अज्ञात नाविकाला होती. कल्याणच्या पुढे सेमील्ला (चौल), मंडगोरा (बाणकोट), पालाईपाटम (दाभोळ), मेलिझिगर (जयगड किंवा राजापूर), बायझंटियन (विजयदुर्ग), तोसरम (देवगड) अशी अनेक नावे त्याने लिहिली आहेत. याचा अर्थ या मार्गाविषयी त्याला व्यवस्थित माहिती होती. अरनोबोआस (मालवण), एगिडाई (गोवा), चेरसोनेसास (कारवार), वेंगुर्ल्याजवळचा खडकाळ भाग, गोवा भागातली चाचेगिरी, केरळकडले मुझिरीस म्हणजे आताचे कोडुंगल्लूर, तेथील व्यापाराची भरभराट अशी सर्व टिपणे या अज्ञात नाविकाच्या नोंदवहीत सापडतात. पांड्य राजांच्या नेलकिन्डातसुद्धा मिरी, तमालपत्र, सुंठ, वेलची, हिरे, नीलम, सुगंधी वनस्पती, कासवाचे कवच या वस्तूंचा व्यापार करण्यासाठी मोठाली जहाजे उभी असतात. नेलकिन्डाजवळ 'बकरे' नावाचे खेडेगाव लागते. नेलकिन्डाहून गच्च भरून गेलेली जहाजे बकरे ध्ये रिकामी होतात. येथे उथळ पाणी आणि त्यातही प्रवाळ आहेत; पण खलाशांना माहीत असते की, आता जमीन लागणार आहे. त्यामुळे ते सतर्क असतात.

पेरीप्लसच्या अज्ञात नाविकाने 'कन्याकुमारी'चा उल्लेख पवित्र स्थळ म्हणून केलेला आहे. तेथे समुद्रात स्नान करण्यासाठी अनेक जण येतात, असे तो म्हणतो. 'वरक्कलाई' या तिरुअनंतपुरमच्या एका भागापर्यंत येऊन हा अज्ञात नाविक थांबला आहे. यानंतर श्रीलंकेबाबत फक्त ओझरता उल्लेख आहे. पण तेथे तो गेला असेल असे वाटत नाही. असे म्हणतात की, भारतात प्राचीन काळात सोन्याचा धूर निघत होता. पण पेरीप्लसच्या अज्ञात नाविकाने भारताच्या सर्व प्राचीन बंदरां ध्ये होणारा समृद्ध व्यापार याची देही याची डोळा पाहिला आणि म्हणूनच भारताच्या प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने हा तांबड्या समुद्रावरचा अज्ञात खलाशी अतिशय महत्त्वाचा ठरतो.

---

आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

# प्रोफेशनल हझार्डस्

एका मोठ्या विभागाचा एक मोठा अधिकारी एकदा सहज वेळ होता म्हणून आपल्या कामाच्या व्यापाचे वर्णन करीत होता. तो म्हणाला, ''आज मला येथे येण्यास थोडा उशीर झाला. कारण घरी पत्नीने जेवण करून जाण्याचा आग्रह धरला. मी तिला म्हणालो की, तेथे मुलाखती आटोपल्यावर जेवणाची व्यवस्था करण्यात आली असणारच. परंतु, तिनेच मला आठवण करून दिली की, मी गेल्या पाच दिवसांपासून घरी जेवलेलोच नाही. गेले पाच दिवस मी सारखा पळतोय.

कधी मुंबईला मिटिंग, कधी पुण्याला, कधी हायकोर्टात नागपूरला तारीख तर कधी येथेच माझ्या कार्यालयात महत्त्वाची माहिती पाठवायची म्हणून रात्री उशिरापर्यंत काम. इतक्या उशिरा कर्मचारी मंडळींना थांबवायचे म्हणजे त्यांच्या जेवणाची सोय करणे आलेच. मग त्यांना बरे वाटावे व त्यांचा धीर वाढाविण्यासाठी



त्यांच्यासोबत जेवण. नागपूरला हायकोर्टात गेलो की तर विचारूच नका. तेथे कर्मचाऱ्यापासून तो अधिकारी सर्व काही मीच असतो. दोन-दोन केसेस असतात. भल्या पहाटे येथील कार्यालयातील कामे आटोपून निघायचे, न्यायमूर्तीसमोर अजिबात वेळ होता कामा नये, या सरकारी वकिलांनी दिलेल्या सूचना डोक्यात ठेवून जेवणाचा विचारही न करता कोर्टात पोहोचायचे. तेथे सारीच कामे करावी लागतात. प्रसंगी काही कागदपत्रांच्या झेरॉक्स मला स्वतःलाच काढून घ्याव्या लागतात. सोबतीला माणसे नसतात. तेथील कामाच्या मध्ये जमेल तेव्हा त्या हायकोर्टाच्या कॅन्टिनमध्येच वडापाव किंवा काहीतरी तत्सम खाऊन पोटाची खळगी भरायची आणि कामाला लागायचे. तेथील कामे आटोपूनही थेट घरी पोहोचणे दुरापास्तच असते.

प्रथम कार्यालयात जाऊन दिवसभराची काही महत्त्वाची कामे हातावेगळी करायची आणि मग घरी जायचे. बरेच वेळा बाहेरून लोकांना अधिकारी वगैरे या पदाचे कौतुक वाटते, परंतु माझ्या कामामधील माझी व्यस्तता मीच जाणो.'' त्या दिवशी बोलण्यासाठी जरासा वेळ मिळाला म्हणून त्या अधिकाऱ्याला आपले मन मोकळे करता आले. हे सारे सांगितल्यानंतर तो पुढे म्हणाला,''हे सारे आहे, पण हे असे असतेच. यालाच 'प्रोफेशनल हझार्डस्' म्हणतात. त्यांना स्वीकारावे लागतेच.'' मी तो शब्द ऐकल्यावर एकदम चमकलो. हा शब्द मी विद्यार्थिदशेनंतर आताच ऐकला होता. इंग्रजी साहित्याचा अभ्यास करताना ऑर्थर मिलर या नाटककाराच्या 'ऑल माय सन्स' या नितांत सुंदर नाटकात हा शब्द मी ऐकला होता. अधिकारी म्हणूनच काम करीत असलेल्या माझ्या एका मित्राला काही शारीरिक त्रास सुरू झाला. त्याच्या कामाच्या पद्धतीत त्याला एकाच जागी बराच वेळ बसावे लागे. कॉम्प्युटरवर जवळपास सात ते आठ तास काम करणे ही त्याच्या कामाची गरज होती. कॉम्प्युटरवर काम करून त्याच्या हाताखाली काम करीत असलेल्या देशभरातील जवळपास ५० मॅनेजरकडून माहिती संकलित करणे व ती हेड ऑफिसला पाठविणे हे त्याच्या कामाचे स्वरूप होते. त्यासोबतच त्याच्याकडे त्याच्या कंपनीचे काही अमेरिकेतील क्लायंटस् होते. त्यांच्याशी त्याला आठवड्यातून चार दिवस चर्चा करावी लागायची. त्यात अडचण अशी होती की, अमेरिकेतील कार्यालयीन वेळा म्हणजे आपल्याकडील रात्र. परंतु, क्लायंट म्हणजे सर्वोच्च प्राधान्य या उक्तीनुसार कार्य करीत असलेल्या त्याच्या कंपनीत त्याला या मंडळींशी रात्री संवाद साधावा लागायचा. रात्री साधारण तीन ते चार तास कॉम्प्युटरसमोर बसून त्याला काम करावे लागायचे. या सर्व बैठ्या कामाचा परिणाम झाला. त्याला सर्व्हायकल स्पॉन्ड्युलेलिसचा त्रास सुरू झाला. मध्यंतरी त्याच्या फासळ्यात दुखायला लागले म्हणून सर्व टेस्ट झाल्या. नागपूरच्या निष्णात डॉक्टरकडे त्याला घेऊन गेलो. त्यांनी त्यांस तपासले. काही जुजबी व्यायाम, बेल्ट आणि काही औषधी दिल्या. त्याला झालेल्या त्रासाचे डॉक्टर वर्णन करताना म्हणाले, ''तुमचे कामच असे आहे त्यामुळे असे झाले. यालाच 'प्रोफेशनल हझार्डस्' म्हणतात.'' मी पुन्हा एकदा चमकलो. साधारण दोन महिन्यांच्या फरकाने हा शब्द मी परत एकदा ऐकत होतो. हा प्रकार नेमका काय होता. त्याबद्दल विचार केला असता काही बाबी स्पष्ट झाल्या. काही माझ्या स्वतःच्या बाबतीतही होत असल्याच्या जाणवल्या. वेगवेगळ्या पदांवर कार्य करीत असलेले अधिकारी मंडळी व त्यांच्या पदाच्या दृष्टीने त्यांना मिळत असलेला मानमरातब वगैरे या दृष्टीने आपल्याला ते नेहमीच कुतुहलाचे वाटत आलेले आहे.

(पान ६ वर)

---

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# पांडु लिपी

## हस्तलिखितांतून अर्थाचा अनर्थ

लिपी म्हणजे काय? मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे सर्वजण उत्साहाने सांगतात, पण अनेकांना भाषा आणि लिपी यातील भेद माहीत नसतो. आपण जे बोलतो, भाषण करतो तिचे माध्यम म्हणजे भाषा आणि तेच विचार अक्षर- आकृतींद्वारे कापड, कागद किंवा तत्सदृश कशावर उमटवितो ती लिपी. अनेकांना मोडी ही भाषा असावी, असा गैरसमज आहे. ब्राह्मी, शारदा, नागरप्रमाणेच मोडीसुद्धा लिपीच आहे. ब्रह्मदेवाने आपल्या कपाळावर लिहिलेल्या भवितव्याची अदृश्य अक्षरे किंवा तळहातावरील रेषा, चेकवरील एमआयसीआरची काळी रंगपट्टी किंवा सर्वत्र दिसणारे बारकोड, क्यूआर कोड, मोबाईलमधील इमोजी, चीनची चित्रलिपी या सर्व लिपीच आहेत.

पूर्वी मोडीतून मराठी, संस्कृत, हिंदी भाषा साहित्य वगैरे लिहिले जात असे. आज आपण देवनागरीतून लिहितो आणि इंग्रजी रोमन लिपीतून. पांडु लिपी हे शब्द हिंदी साहित्यात प्रचलित आहेत. मात्र, तिचा आणि महाभारतातील पंडु राजा यांचा कसलाही संबंध नाही. फार काय पण या नावाची कोणतीही लिपी कधी अस्तित्वातच नव्हती. अर्थाचा अनर्थ : संस्कृतमधील श्याम म्हणजे काळा किंवा गडद पण तेजस्वी, चमकदार रंग. (रामरक्षेत रामाच्या कांतीचे वर्णन 'रामं दूर्वादल: श्यामं' असे आहे. दुर्वांची एक जात तेजस्वी सावळ्या वर्णाची असते. राम तिच्यासारखा सावळा होता. श्याम पासून उर्दूतील श्याही- शाई हे शब्द तयार झाले. ही बिब्बयापासून तयार करत. गुटेनबर्गच्या छपाई यंत्रापूर्वी शाईत बोरू बुडवून भूर्जपत्रावर, ताडपत्रावर किंवा कागदावर लिहिले जात असे. यानंतर अनेक व्यक्ती त्याच्या प्रतिलिपी तयार करत. कालांतराने हवामानामुळे या शाईचा आणि कागदाचा रंग ॲनिमिक अर्थात पंडु पडतो आणि कधी कधी नेमके काय लिहिले होते ते वाचताना अर्थाचा अनर्थ होतो म्हणून हस्तलिखित प्रतिंना पंडु लिपीतील लेखन असे म्हणतात. प्रति तयार करणाऱ्यांनी पुरेशी काळजी न घेतल्यामुळे मूळ मजकुरात अनेक बदल होत जातात. भविष्यकाळातील अभ्यासकांना शुद्ध प्रत ठरवताना पुढील अडचणींतून मार्ग काढावा लागतो.

१) **पुनरुक्ती:** एकच शब्द अथवा ओळ विनाकारण पुन:पुन्हा लिहिली जाते,

२) **लोप:** एखादा महत्त्वाचा शब्द अथवा संबंध वाक्य गाळल्या जाणे.

३) **अक्षरसादृश:** कधी ब आणि व, ट आणि ठ, ध आणि घ, य आणि थ, म आणि भ ही अक्षरे बदलतात.

४) **अर्थ बदल आणि कधी कधी अर्थविरुद्धता,**

५) **छंदभंग:** पद्याचे छंद, वृत्त बदलतात. काही उदाहरणे बघू. १) म



**न्दारमालाकुलितालकाय। कपालमालाङ्कित शेखराय। दिव्याम्बराय च दिगम्बराय। नमः शिवाय च नमः शिवाय।।** लेखनिकाने **'दिगंबरायच दिगंबराय। नमः शिवाय च नमः शिवाय।'** असे लिहिले. पण दिगंबर म्हणजे शंकर आणि दिव्याम्बरा म्हणजे पार्वती याचे भान कोणाला नसते. विद्वान मात्र विविध प्रतिंची तुलना करून अर्थ, संदर्भ, छंद, व्याकरण तपासत शुद्ध पाठ कोणता ते ठरवतात. **२) महाभारतातील एक वचन आहे.** 'धर्मो रक्षति रक्षितः।' म्हणजे धर्माचे रक्षण करणाऱ्याचे रक्षण धर्मच करतो. एका प्रतित 'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः।' असा पाठ आढळतो; तर कधी- 'धर्मो हन्ति हतः।' असेही लघुरूप सापडते. सारांशाने सर्वांचा अर्थ एकच. मग मूळ श्लोक कोणता असावा? 'धर्मो हन्ति हतः।' म्हणजे धर्माचा नाश करणाऱ्याचा नाश धर्मच करतो. मात्र यातून व्यक्तीचे रक्षण कोण करतो हे समजत नाही म्हणून हा पाठ चुकीचा समजावा तसेच 'धर्मो रक्षति रक्षितः।' हे बरोबर वाटते; पण मग धर्मभंग करणाऱ्याचे काय, हे समजत नाही. म्हणून हाही पाठ अपुराच. अशावेळेस रचनाकाराची शैली बघावी. महर्षी व्यास नेहमी दोनही बाजू मांडतात. म्हणून 'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः।' म्हणजे धर्मनाश करणाऱ्याचा नाश आणि धर्मपालन करणाऱ्याचे रक्षण हे दोनही अर्थ सुचवणारा हा विस्तारित पाठच योग्य ठरतो. **संदर्भही बघावा:** 'अहिंसा परमो धर्मः' म्हणजे अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म. पण मला जर कधी 'अहिंसा परमो धर्मः, धर्म हिंसा तथैव च।' धर्मरक्षणासाठी कधी हिंसा आवश्यक असा पाठ सापडला तर गीतेच्या संदर्भात दुसराच पाठ मी योग्य म्हणून स्वीकारेन. याप्रमाणे पांडुलिपी पाठात शब्दांचा लोप होतो किंवा कधी विस्तारही होतो हे भान अभ्यासकाने ठेवावे. यासाठी अनेक प्रती आणून अभ्यास करावा. स्वानुभव : काही दिवसांपूर्वी मी १२ व्या शतकातील पांडुलिपीतील 'मल्लपुराणम्' या संस्कृत ग्रंथाची संशोधित प्रत तयार करून तिचे मराठी भाषांतर केले. तेव्हाचे अनुभव असे: १) पहिल्याच श्लोकात एक घोटाळा सापडला. **'एकस्मिन् कमला कटाक्षविवरे सानन्द माधार्यते (माधुर्यते)। क्षीराब्धेपरत्र दीर्घधवलैः कल्लोललोलोत्करः। व्यग्रस्यापि सम र्थितप्रमथनव्यापारलब्धोदया श्चत्वारो वितरन्तु वांछितफलं वंद्या हरेर्बाहवः।।१।।'** एका प्रतित पहिल्या ओळीत 'माधार्यते' हा शब्द होता तर दुसरीत 'माधुर्यते' हा शब्द सापडला. पण मग केवढा अर्थ बदल झाला! मी माधार्यते हा शब्द बरोबर ठरवून अर्थ लिहिला- लक्ष्मीच्या नेत्रांतील कटाक्ष झेलण्यात मग्न असलेले भगवान विष्णू.

२) मल्लाने खांद्यांवर गोणी उचलून व्यायाम करावा, अशा अर्थाचा श्लोक होता. गोणी या संस्कृत शब्दाचा अर्थ जड पोते असा असला, तरी मला ते पटेना. मी अमरावतीच्या हनुमान व्यायाम शाळेत छिद्राचा वजनदार दगड बघितला अन् क्षणात खरा अर्थ उलगडला. तेथे गोणी हा शब्द नसून घनी हा शब्द हवा. घनी म्हणजे चुन्याच्या किंवा तेलघाणीत फिरणारा गोल घन दगड.

३) **मल्लाने प्रमदाश्रम करावा-** श्रम म्हणजे व्यायाम. पण मल्लाने ब्रह्मचर्य पाळावे. असे असताना तेथे प्रमदेचे म्हणजे मादक तरुणीचे कामच काय? शेवटी मी या निष्कर्षास आलो की, तेथे प्रमदा नसून 'प्रगदा' हा शब्द हवा. प्र गदा म्हणजे मोठी गदा. मल्लाने जड गदा म्हणजे मुद्गर फिरविण्याचा व्यायाम करावा. मौखिक परंपरेमुळे हजारो वर्षे जिवंत राहिलेले वेद पांडुलिपीतून कागदावर आले आणि घोटाळे सुरू झाले. उदा. **'अग्निमीळे पुरोहितं यजस्य देव मृत्विजम्। होतारं रत्नधातमम् ।।'** पांडु लिपिकांनी लिहिले- 'अग्निम् ईळे...रत्नधातमं।' त्यांनी ऱ्हस्व, दीर्घ, विसर्ग, अनुस्वाराचे नियम, उदात्त, अनुदात्त, स्वरित आणि छंद, संहितापाठ, पदपाठ या सर्वांची यथेच्छ मोडतोड केली. विद्वान लोक याला गंभीर प्रमाद मानतात. तरीही पांडुलिपीचे महत्त्व आहेच. सत्य हे एकरेषीय नसते. विविध प्रतीत चुका असतील, पण तरी त्यात मूळ ज्ञानाचा स्रोत आहे. एकाच मजकुराची अनेक रूपे आढळतात. त्यातून विचारांची उत्क्रांती दिसते.० मुद्रण तंत्र नसल्यामुळे पुढील काळात ज्ञानेश्वरीच्या अनेक पांडुलिपी प्रती तयार झाल्या. संत एकनाथांनी सर्व गोळा करून परिश्रमपूर्वक अध्ययन करीत एक शुद्ध प्रत तयार केली आणि अधिकारवाणीने लिहून ठेवले, यानंतर कोणी चुकीची प्रत तयार केली तर सोन्याच्या ताटात नारळाची करवंटी ठेवल्यासारखे होईल. आजही अनेक पुरातन ग्रंथ पांडु लिपीतच असून संत एकनाथांसारख्या चिकित्सक संशोधकांच्या प्रतीक्षेत आहेत.

---



## निसर्गाचे हळदी कुंकू

फुलला बहावा त्याचा रुबाब पहावा
फुलली फुले तरी नसे ताठा
फुले झुकती खाली नसे गर्व नाठा
वाऱ्यावर झुलती सोगे दुसऱ्या देत आनंद
दृष्टी सुख देत असे सृष्टी होऊनी धुंद
सृष्टीचे हळद कुंकू म्हणजे बहावा पळस
सप्तरंग उधळण्या निसर्गाला नाही आळस
एकीकडे रखरखता तर दुसरीकडे
रंगांची शीतलता सहा ऋतूंचे सहा सोहळे
असा हा मनमोहक बहावा
सगळ्यांनी पहावा त्याचा आनंद घ्यावा...!

डॉ. सविता विद्वांस


## मौन सुटताना..

ताज्याच पालविला घनगर्द सावली ती
त्या कथेतला सूर्य अफाट पसरताना.
तरीही मौन सांगून कोकीळ सावलीला
घनगर्द भावनेशी हितगुज साधताना.
ती भावना गर्द ओळ हळूच प्रवाही आली
मौन होते तिच्यात जरा तेही सुटून गेले.
ती मुक्त सावलीने सूर्यास बोलताना
संध्येत शांत वाणी जी तुझ्यात खिळून वाहे.
अस्तात जाणिवांचे तू खुलासे पेरताना
घरट्यात पाखरांचे मी गीत होत आहे.

श्रद्धा राऊत बुरले

# रात्रीचे वाढते तापमान चिंताजनक

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**



**जागतिक तापमान वाढ ही आता केवळ शास्त्रज्ञांच्या अहवालांपुरती मर्यादित चर्चेत राहिलेली बाब नाही, तर दैनंदिन जीवनात जाणवणारे कठोर वास्तव बनले आहे. हवामानातील अस्थिरता, अनियमित पर्जन्यमान, वाढत्या उष्णतेच्या लाटा आणि वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती यांमधून या बदलाची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.**

जागतिक 'वर्ल्ड मेट्रॉलॉजिकल ऑर्गनायझेशन' (डब्ल्यूएमओ) ने प्रसिद्ध केलेल्या 'स्टेट ऑफ द क्लायमेट' या अहवालाने चिंता अधोरेखित केली आहे. या अहवालानुसार जग अजूनही मोठ्या प्रमाणावर जीवाश्म इंधनांवर अवलंबून आहे. त्यामुळे कार्बन- न्यूट्रल होण्याच्या उद्दिष्टापासून आपण दूर जात आहोत. त्यामुळे आजचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपण हवामान बदलाच्या या वेगाने बिघडणाऱ्या परिस्थितीचा सामना कसा करणार? या प्रश्नाचे उत्तर शोधताना २०२५ मधील हवामान बदलाचे चार महत्त्वाचे निदर्शक आपल्यासमोर एक गंभीर चित्र उभे करतात.

सर्वप्रथम कार्बन डाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण. औद्योगिक क्रांतिपूर्व काळाच्या तुलनेत आज वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण सुमारे ५० टक्क्यांनी वाढले आहे. ही वाढ केवळ आकड्यांपुरती मर्यादित नाही, तर पृथ्वीच्या तापमानावर थेट परिणाम करणारी आहे. जीवाश्म इंधनांच्या मोठ्या प्रमाणावरील वापरामुळे या वायूचे उत्सर्जन सातत्याने वाढत आहे आणि एकदा वातावरणात गेल्यानंतर तो दीर्घकाळ टिकून राहतो. याचा अर्थ असा की, आपण आज जितका अधिक उत्सर्जन करतो, तितकेच भविष्यातील हवामान संकट अधिक तीव्र होत जाणार आहे.

दुसरा महत्त्वाचा निदर्शक म्हणजे जागतिक तापमान. २०२५ हे वर्ष आतापर्यंतच्या सर्वाधिक उष्ण वर्षांपैकी एक ठरले. औद्योगिक क्रांतिपूर्व स्तरांच्या तुलनेत जागतिक सरासरी तापमान सुमारे १.४३ अंश सेल्सियसने वाढले आहे. अधिक चिंतेची बाब म्हणजे गेल्या ११ वर्षांमध्ये प्रत्येक वर्षाने तापमानाच्या बाबतीत मागील सर्व विक्रम मोडले. ही सततची वाढ एक तात्पुरती घटना नसून दीर्घकालीन प्रवाहाचे द्योतक आहे.

तिसरा निदर्शक महासागर आणि हिम नद्या यांच्याशी संबंधित आहे. २०२५ मध्ये महासागरातील उष्णतेने विक्रमी पातळी गाठली. महासागर उष्ण झाल्याने हिमनद्या वेगाने वितळतात. त्यामुळे समुद्रपातळी वाढते. ही वाढ किनारपट्टीवरील शहरांसाठी आणि बेट राष्ट्रांसाठी गंभीर धोका निर्माण करते. त्याचबरोबर समुद्री परिसंस्थांवरही याचा विपरीत परिणाम होतो. अनेक समुद्री जीवांचे अस्तित्व धोक्यात येते. त्याचा परिणाम अन्नसाखळीवर आणि अखेरीस मानवी जीवनावरही होतो. चौथा आणि सर्वात ठळक निदर्शक म्हणजे तीव्र हवामान घटना.

२०२५ मध्ये जगभरात घडलेल्या अनेक विध्वंसक घटनांनी हे स्पष्ट केले आहे की, हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही वाढत आहेत. अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि चक्रीवादळे आता अपवादात्मक राहिलेली नाहीत, तर नव्या सामान्यतेचा भाग बनत आहेत. वाढत्या हरितगृह वायू उत्सर्जनामुळे या घटनांचा प्रभाव अधिक घातक होत आहे.

नवी दिल्लीमधून समोर आलेल्या एका ताज्या अहवालाने भारतातील हवामान बदलाच्या वाढत्या परिणामांविषयी गंभीर इशारा दिला आहे. 'कौन्सिल फॉर एनर्जी इन्व्हायरन्मेंट अँड वॉटर' (सीईईडब्ल्यू) या पर्यावरणविषयक विचार मंचाच्या विश्लेषणानुसार, येत्या दोन दशकांमध्ये देशाला दरवर्षी सरासरी १५ ते ४० अतिरिक्त अतिउष्ण दिवसांचा सामना करावा लागू शकतो. म्हणजेच, तापमान थोडेसे वाढणार नाही, तर सामान्य पातळीपेक्षा खूपच वर जाईल आणि उष्णतेची तीव्रता नवा विक्रम गाठेल. ही केवळ हवामानातील बदलाची बाब नाही, तर हा बदल देशाच्या आरोग्य व्यवस्थेपासून पायाभूत सुविधा आणि अर्थव्यवस्थेपर्यंत सर्वच स्तरांवर परिणाम करणारा आहे. वाढत्या उष्णतेमुळे लोकांचे दैनंदिन जीवन अधिक कठीण होणार आहे.

काम करण्याची क्षमता कमी होणे, थकवा, उष्माघातासारख्या समस्या आणि दीर्घकालीन आरोग्य धोक्यांचा वाढता धोका हे सर्व या बदलाचे थेट परिणाम असतील. अहवालातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'हीट डे' म्हणजेच अतिउष्ण दिवसांची वाढती संख्या.

अनेक राज्यांमध्ये दरवर्षी असे १५ ते ४० दिवस असू शकतात. ही परिस्थिती शहरी भागात अधिक गंभीर ठरू शकते. कारण काँक्रीटच्या रचनेमुळे उष्णता साठून राहते आणि 'हीट आयलंड' परिणाम अधिक तीव्र होतो. याहूनही चिंताजनक बाब म्हणजे केवळ दिवसच नव्हे, तर रात्रीसुद्धा अधिक उष्ण होणार आहेत. अहवालानुसार अनेक भागांमध्ये दरवर्षी २० ते ४० दिवस असामान्यपणे उष्ण रात्री अनुभवायला मिळू शकतात. या बदलाचा सर्वाधिक फटका विशिष्ट राज्यांना बसण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये उष्णतेबरोबरच पर्जन्यमानाच्या स्वरूपातही मोठे बदल होऊ शकतात. म्हणजेच, एका बाजूला अधिक उष्ण दिवस आणि दुसऱ्या बाजूला अधिक तीव्र पावसाच्या घटना अशा दुहेरी संकटाचा सामना या राज्यांना करावा लागू शकतो. परिणामी शेती, पाणी व्यवस्थापन, शहरी नियोजन आणि सार्वजनिक आरोग्य या सर्व क्षेत्रांवर ताण वाढणार आहे. या निष्कर्षामागे केवळ अंदाज नाही, तर सखोल डेटा विश्लेषण आहे. 'क्रेव्हिस' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालीच्या मदतीने हे विश्लेषण करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्मने भारतीय हवामान विभाग आणि पुण्यातील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रालॉजी' आणि भारतीय वन सर्वेक्षण यांसारख्या संस्थांकडील चार दशकांहून अधिक काळाच्या हवामानविषयक डेटाचा अभ्यास केला आहे. या माहितीच्या आधारे २०७० पर्यंतचे हवामानाचे संभाव्य चित्र उभे करण्यात आले आहे. त्यानुसार वाढत्या तापमानाचा परिणाम मानवी आरोग्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर देशाच्या डिजिटल आणि औद्योगिक पायाभूत सुविधांवरही होणार आहे.

भारतातील शेकडो डेटा सेंटर्सना थंड ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जा खर्च करावी लागते. तापमान वाढल्यास कूलिंग सिस्टिमवर अधिक ताण येईल आणि त्याचा थेट परिणाम ऑपरेटिंग खर्चावर होईल. आरोग्याच्या दृष्टीने पाहता परिस्थिती अधिक धोकादायक आहे. याबाबतचा अहवाल केवळ इशारा देत नाही, तर धोरणकर्त्यांसाठी एक स्पष्ट दिशा दर्शवतो. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी केवळ दीर्घकालीन लक्ष्ये जाहीर करणे पुरेसे नाही, तर तातडीने आणि स्थानिक पातळीवर प्रभावी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.

शहरी भागात हरित क्षेत्र वाढविणे, उष्णतेचा प्रभाव कमी करणारी पायाभूत सुविधा उभारणे, जलसंधारण आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे हे सर्व उपाय आता पर्याय नसून गरज बनले आहेत. हवामान बदलाचा प्रश्न हा केवळ पर्यावरणाचा मुद्दा राहिलेला नाही, तर देशाच्या विकासाच्या केंद्रस्थानी येऊन ठेपला आहे. या बदलांकडे दुर्लक्ष केले, तर त्याची किंमत आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य या सर्व स्तरांवर मोजावी लागेल. त्यामुळेच आज घेतलेले निर्णय आणि उपाययोजना हेच उद्याच्या भारताचे हवामान आणि भविष्य ठरवणार आहेत. म्हणूनच केवळ संकटाची जाणीव करून घेणे पुरेसे नाही, तर ठोस आणि निर्णायक कृती करणे अत्यावश्यक आहे.

'डब्ल्यूएमओ'च्या अहवालात तातडीने पावले उचलण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. त्यात सर्वप्रथम प्राधान्य आहे उत्सर्जनातील कपातीला. काही देशांनी अक्षय ऊर्जेचा वापर वाढवून 'डीकार्बोनायझेशन'च्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे; परंतु ही गती अजूनही अपुरी आहे.

अनेक देशांचे २०५० पर्यंत 'नेट झिरो' साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे. म्हणजेच जितक्या प्रमाणात हरितगृह वायू उत्सर्जित होतात, तितक्याच प्रमाणात त्यांना वातावरणातून दूर करणे; मात्र, हे उद्दिष्ट साध्य झाले, तरी हवामान बदलाचा परिणाम तत्काळ थांबणार नाही. कारण वातावरणात आधीच साचलेले वायू अनेक वर्षे प्रभाव टाकत राहणार आहेत. तरीही आपण जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी केले आणि उत्सर्जनात ठोस कपात केली, तर भविष्यातील संकटाची तीव्रता नक्कीच कमी करता येईल. हवामानबदलाचा प्रश्न हा सध्या केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही, तर आर्थिक, सामाजिक आणि राजकीय धोरणांच्या केंद्रस्थानी येऊन ठेपला आहे. (पान ६ वर)

---

**आजच्या आधुनिक काळात समाजमाध्यमे ही प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग झाली आहेत. 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'व्हॉट्सॲप', 'युट्यूब', 'स्नॅपचॅट' अशा अनेक माध्यमांमुळे लोक एकमेकांशी जोडले गेले. नाती जपणे, आठवणींची देवाणघेवाण करणे, नवीन माहिती मिळवणे आणि संपर्कात राहण्यासाठी समाजमाध्यमे उपयोगी आहेत. पण, याच समाजमाध्यमांचा चुकीचा वापर नात्यांमध्ये गैरसमज, वाद, शंका आणि दुरावाही निर्माण करू शकतो, हे आपण आधीच्या लेखात पाहिले आहे. विशेषतः लग्नाआधी आणि लग्नानंतर याचा वापर अधिक समजूतदारपणे करणे आवश्यक असते.**

समाजभान **डॉ. गौरी कानिटकर**

लग्नाआधी दोन व्यक्ती एकमेकांना समजून घेण्याच्या प्रक्रियेत असतात. अशा वेळी समाजमाध्यम हे संवादाचे एक साधन ठरू शकते. एकमेकांच्या आवडीनिवडी, विचार, छंद आणि स्वभाव जाणून घेण्यासाठी समाजमाध्यमे मदत करू शकतात. मात्र, फक्त समाजमाध्यमांवरूनच व्यक्तीचा अंदाज बांधू नये. मोकळेपणाने आणि आदराने संवाद साधावा. मेसेज, करणे नसावे. जेणेकरून माणसाला मोकळीक मिळेल. जुने फोटो, जुने मित्र, फॉलोअर्स किंवा कमेंट्स पाहून शंका घेणे चुकीचेच आहे. प्रत्येक व्यक्तीचे लग्नाआधीचे आयुष्य वेगळे असते, त्यावरून नाते खराब करू नये. खोटे जीवन दाखवण्यासाठी बनावट पोस्ट, महागड्या गोष्टींचे प्रदर्शन किंवा नात्याचे अनावश्यक प्रदर्शन करू नये. समाजमाध्यम आणि वास्तव यात फरक असतो.

पती-पत्नीने एकमेकांच्या यशाचे कौतुक करावे. समाजमाध्यमांवरही आदराने वागावे. जोडीदाराच्या पोस्टवर चांगल्या भावना व्यक्त करणे, सपोर्ट दाखवणे आणि

## 'रील्स'च्या युगातील 'रिलेशन'



कॉल किंवा व्हिडिओ कॉलद्वारे बोलताना सभ्य भाषा वापरावी. नात्याची सुरुवात करताना परस्परांवरचा विश्वास फार महत्त्वाचा असतो आणि विश्वास हाच नात्याचा पायादेखील असतो. समोरच्या व्यक्तीच्या वेळेचा आदर करावा. प्रत्येक वेळी लगेच उत्तर मिळाले नाही म्हणून रागावू नये. अनेकदा व्यक्ती वेगळ्या कामात असू शकते, प्रवास करत असते, निराळ्या मूडमध्ये असते, त्यामुळे लगेच उत्तर देणे मनात असूनही शक्य होत नाही. अशा वेळी समजून घेणे हेदेखील सुदृढ नात्यासाठी आवश्यकच असते.

शक्यतो, संदेश लिहिताना पूर्ण भाषा वापरावी. शॉर्टफॉर्ममध्ये संदेश नसावा. हल्ली मुले-मुली जेव्हा बाहेर भेटतात, त्यावेळी लगेच फोन नंबर एकमेकांना दिले जातात आणि मग सुरू होते संवादांची मालिका. यामध्ये जेवण झाले का? अशा स्वरूपाचे विनोदी संदेशही पाठवले जातात, हे पूर्णपणे टाळावे. एकमेकांच्या वैयक्तिक गोष्टींचा आदर करावा. फोटो पोस्ट करायचा असेल, 'रिलेशनशिप' जाहीर करायची असेल किंवा 'एंगेजमेंट'चे फोटो टाकायचे असतील, तर दोघांचीही संमती असणे गरजेचे आहे.

### लग्नानंतर सोशल मीडियाच्या संदर्भात काय करावे?

एकमेकांचे 'अकाऊंट' तपासणे, सतत 'ऑनलाईन' का आहात हे विचारणे, 'पासवर्ड' मागणे किंवा मोबाईल चेक करणे प्रकर्षाने टाळावे. नात्याची सुरुवात विश्वासावर व्हावी, तपासणीवर नाही. सतत ती व्यक्ती कुठे गेली, हे 'ट्रॅक' सकारात्मकता ठेवल्याने नाते अधिक मजबूत होण्यास सहकार्य होते. मित्र, नातेवाईक आणि दूर राहणार्या लोकांशी संपर्क ठेवण्यासाठी समाजमाध्यमे उपयुक्त आहेत. नवीन गोष्टी शिकणे, व्यवसाय वाढवणे किंवा प्रेरणादायी माहिती मिळवण्यासाठीही यांचा चांगलाच उपयोग होऊ शकतो. घरातील भांडण, मतभेद, नाराजी किंवा वैयक्तिक समस्या समाजमाध्यमांवर पोस्ट करू नयेत. रागाच्या भरात 'स्टेटस' ठेवणे, टोमणे मारणे किंवा अप्रत्यक्ष 'पोस्ट' करणेही नात्यासाठी घातकच ठरते.

इतर जोडप्यांचे फोटो, व्हिडिओ किंवा लाईफस्टाईल पाहून, त्याची स्वतःच्या संसाराशी तुलना करू नये. समाजमाध्यमावर दिसणारे प्रत्येक आयुष्य परिपूर्ण नसते. आपल्या जोडीदाराला वेळ न देता सतत मोबाईलमध्ये गुंतून राहणेदेखील टाळावे. अनावश्यक चॅटिंग, गुप्त मैत्री, सतत इतरांशी फ्लर्टिंग किंवा संशयास्पद वागणूक प्रकर्षाने टाळावी. यामुळे नात्यातील विश्वास कमी होतो. शेवटी एक महत्त्वाची गोष्ट, समाजमाध्यमे नाते निर्माण करू शकतात. पण, टिकवू शकत नाहीत. नाते टिकवण्यासाठी प्रेम, विश्वास, संवाद, वेळ आणि त्याचबरोबर समजूतदारपणा-ही आवश्यक असतो. समाजमाध्यमे वापरा; पण त्यांचे गुलाम होऊ नका. मोबाईलपेक्षा घरातील माणसांना वेळ द्या, 'पोस्ट'पेक्षा भावना जपा आणि 'लाईक्स'पेक्षा नात्याला महत्त्व द्या. (क्रमशः)

---

**'अमुक अमुक फिल्मचं कान महोत्सवात सिलेक्शन झालं आहे' अशी माहिती सोशल मीडियावर पोस्ट केली की, लगेच त्या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि कलावंत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू होतो. वर्तमानपत्रात 'अमुक अमुक मराठी चित्रपटाची कानला धडक', 'अमुक अमुक चित्रपट निघाला कानच्या वारीला', 'मराठमोळा सिनेमा गाजवणार कान महोत्सवाचा पडदा' अशा शीर्षकाच्या बातम्या झळकतात आणि त्या वाचणाऱ्या वाचकांचा ऊर अभिमानाने भरून येतो.**

## कान महोत्सव : एक जागतिक पर्वणी



कान महोत्सवात तो चित्रपट दाखवला जातोय म्हणजे त्याचा दर्जा उत्तमच असणार याची खात्री होऊन जाते. ऑस्कर पुरस्कारांप्रमाणेच कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाबद्दल आपल्या भारतीय प्रेक्षकांच्या मनात अपार कुतूहल आहे. फ्रान्समधील कान शहरात आयोजित केला जाणारा हा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव जगातील काही महत्त्वाच्या चित्रपट महोत्सवांपैकी एक असल्याने तसेच जगात निर्माण होत असलेल्या दर्जेदार चित्रपटांचे प्रदर्शन करून चित्रपट संस्कृतीचा प्रसार करण्यात या महोत्सवाचा मोठा वाटा असल्याने प्रेक्षकांना हे कुतूहल असणे आणि कोणत्याही कलावंताला आपला चित्रपट तिथे दाखवला जावा अशी इच्छा असणे अगदी स्वाभाविक आहे. मात्र, अनेकदा चित्रपटाची निवड मुख्य स्पर्धेत किंवा महोत्सव आयोजकांकडून न होता तिथल्या इतर विभागात झालेली असताना दिशाभूल करणारी माहिती सोशल मीडियावरून किंवा वर्तमानपत्रातून केली जाते. तो चित्रपट कान महोत्सवादरम्यान प्रदर्शित होणार असला, तरीही त्याची निवड कशी झाली? चित्रपटाचे निर्माते स्वतःचे पैसे खर्च करून त्याचे प्रदर्शन करणार आहेत का, याची स्पष्ट माहिती न दिल्यामुळे सर्वसामान्य प्रेक्षकांच्या मनात तो चित्रपट मुख्य स्पर्धेत असल्याची भावना निर्माण होते. गेली ७९ वर्षे सुरू असलेल्या या महोत्सवात भारतातील फार मोजक्या चित्रपटांना आणि कलावंतांना महोत्सवातील प्रमुख स्पर्धेत सहभागी होण्याचा सन्मान लाभला आहे.

कान महोत्सवाला हजेरी लावणाऱ्या भारतीय रसिक प्रेक्षकांची आणि कलावंतांची संख्या सध्या वाढत असली, तरीही तिथल्या स्पर्धेत उतरून पारितोषिक मिळविण्यासाठी आपल्याला आशय आणि तांत्रिकदृष्ट्या उच्च दर्जाच्या चित्रपटाची निर्मिती करावी लागणार आहे. १२ मे पासून कान येथे आयोजित केल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे हे ७९ वे वर्ष आहे. पहिला कान महोत्सव सप्टेंबर १९४६ मध्ये आयोजित करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ही संकल्पना सर्वप्रथम मुसोलिनीच्या राजवटीत इटलीमध्ये रुजली. इटलीमध्ये साजरा करण्यात येत असलेला व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा जगातील पहिला चित्रपट महोत्सव. या महोत्सवात जगभरात निर्माण होत असलेले तत्कालीन दर्जेदार चित्रपट प्रदर्शित करण्यात येऊ लागले.

प्रभात फिल्म कंपनीच्या विष्णुपंत दामले आणि फत्तेलाल यांनी दिग्दर्शित केलेल्या 'संत तुकाराम' या चित्रपटाला या चित्रपट महोत्सवात गौरविले गेले होते. या महोत्सवाचे आयोजन करणारी मंडळी प्रामुख्याने नाझी विचारसरणीची असल्याने त्या प्रकारच्या चित्रपटांना तिथे प्राधान्यक्रम मिळू लागला. चित्रपट कलेचा जन्म फ्रान्समध्ये झालेला असल्याने आणि इटलीसारख्या शत्रुपक्षाच्या देशात असा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागल्याने फ्रान्समध्ये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित करण्याची कल्पना प्रशासकीय पातळीवर चर्चेला आली. दुर्दैवाने त्याचवेळी दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन लांबणीवर पडले. महायुद्धात जर्मनी आणि इटलीचा पराभव झाल्यानंतर मात्र फ्रान्समध्ये पुन्हा एकदा हालचाली सुरू झाल्या आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला सुरुवात झाली. या महोत्सवात चेतन आनंद दिग्दर्शित 'नीचा नगर' या चित्रपटाला 'ग्रां प्री' या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तत्कालीन समाज व्यवस्थेतील वर्गभेदाचे वास्तववादी चित्रण करणारा 'नीचा नगर' महोत्स्वतात चर्चेचा विषय ठरला; त्यानंतर नियमितपणे या महोत्सवात भारतीय चित्रपट सहभागी होऊ लागले.

सत्यजित राय यांचा पहिलाच चित्रपट 'पाथेर पांचाली' स्पर्धा विभागात पाठवण्यात आला होता. महोत्सवातील या चित्रपटाच्या पहिल्या स्क्रीनिंगला काही ज्युरी सदस्य अनुपस्थित राहिले. या चित्रपटावर अन्याय होऊ नये म्हणून आंद्रे बाझाँ आणि इतर काही संवेदनशील समीक्षकांनी 'पाथेर पांचाली' हा चित्रपट पाहण्याचा ज्युरींना आग्रह केला. भारतीय चित्रपटांबद्दल एक विशिष्ट अढी असलेले ज्युरी 'पाथेर पांचाली' पाहून प्रभावित झाले. 'पाथेर पांचाली'ला 'बेस्ट ह्युमन डॉक्युमेंट' हा पुरस्कार देऊन कान महोत्सवात गौरविण्यात आले. 'पाथेर पांचाली'ला मिळालेल्या या पुरस्कारामुळे भारतीय चित्रपटांकडे युरोपियन प्रेक्षक आणि समीक्षक गांभीर्याने पाहू लागले. कान महोत्सवातील मुख्य स्पर्धा विभागात सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार जिंकणाऱ्या दिग्दर्शकाला 'पाम डो'र'ही ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात येते. हा पुरस्कार मिळविण्याच्या ईर्ष्येने जगभरातील दिग्गज दिग्दर्शक दरवर्षी त्यांनी दिग्दर्शित केलेले उत्तमोत्तम चित्रपट घेऊन या स्पर्धेत उतरतात. 'पाम डो'र'च्या खालोखाल कान महोत्सवामध्ये 'ग्रां प्री' हा मानाचा पुरस्कार आहे. २०२४ मध्ये छाया कदम, कनी कस्तुरी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या पायल कपाडिया या तरुण दिग्दर्शिकेच्या 'ऑल वी इमॅजीन ॲज लाईट' या चित्रपटाला 'ग्रां प्री' देऊन सन्मानित करण्यात आले. चेतन आनंद, सत्यजित राय, पायल कपाडिया यांच्या बरोबरीने मृणाल सेन (खारीज), एम. एस. सथ्यू (गर्म हवा), मीरा नायर (सलाम बॉम्बे), शाजी करुण (स्वहम), नीरज घेयवान (मसान) या दिग्दर्शकांचा सन्मान विविध विभागातील पुरस्कार देऊन कान महोत्सवात करण्यात आलेला आहे.

कान महोत्सवादरम्यान होणाऱ्या लघुपट स्पर्धेतही भारतीय दिग्दर्शकांनी चमकदार कामगिरी केलेली आहे. गीतांजली रावच्या 'प्रिंटेड रेनबो' या ॲनिमेशनपटाला तसेच चिदानंद नाईक याच्या 'सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट वन्स टू नो' या लघुपटाला कान महोत्सवात पुरस्कार मिळाले आहेत. पुरस्कारप्राप्त चित्रपटांच्या यादीकडे नजर टाकता आपल्याला त्यांच्या दर्जाचा अंदाज येतो. कान महोत्सवात चित्रपट प्रदर्शनाबरोबरीनेच चित्रपट कलावंत आणि प्रेक्षक यांच्यात वैचारिक देवाणघेवाण होण्यासाठी अनेक चर्चासत्र, परिसंवादांचे आयोजन केले जाते.

चित्रपट निर्माण करू इच्छिणारे दिग्दर्शक, निर्माते आणि वितरक यांच्यासाठी या महोत्सवात मार्केट विभाग असतो. या विभागात तुम्हाला तुमच्या चित्रपटाचे प्रदर्शन करून निर्माते किंवा वितरक मिळविण्याचे प्रयत्न करता येतात. जागतिक स्तरावरील एक मोठी बाजारपेठ निर्मात्यांसाठी खुली होते. (पान ६ वर)

# विश्पला

कीर्तिरूपांच्या आठवकथा — डॉ. रमा गोळवलकर

खगोलीय नोंदींच्या आधारे ऋग्वेद, रामायण आणि महाभारताचा काळ ठरवण्यासाठी प्रसिद्ध असलेले नीलेश नी. ओक म्हणतात की, ऋग्वेदाचा सर्वात शेवटच्या कालखंडाविषयी खगोलीय निरीक्षणांच्या (ॲस्ट्रोनॉमिकल ओब्झर्वेशन्स) नोंदी जवळपास २१ हजार वर्षांपूर्वीच्या आहेत. याचा पुरातत्त्वीय पुरावा काय? तर, सरस्वती नदीचं शुष्क पडलेलं पात्र. विविध उपग्रहांनी अंतराळातून घेतलेल्या छायाचित्रात तिचं ते पात्र अगदी स्पष्ट दिसलं. त्यावरून तिचा शोध सुरू झाला. ऋग्वेदात तिचं अतिशय मोठं पात्र असलेली, त्यात भरपूर पाणी असलेली नदी म्हणून जो उल्लेख केला आहे, त्याची प्रचीती आली. ती होती तेव्हा काय परिस्थिती होती?

सरस्वती नदीचं किमान दोन लाख वर्षांपूर्वीपासून अस्तित्व होतं. हिमालयातून उगमपासून सिंधू सागराला म्हणजे अरबी समुद्राला मिळणारी ही सरस्वती नदी शतुद्री (सतलज), यमुना मिळून एक मोठी नदी तयार झाली. तिच्या वाळलेल्या पात्राचा पुरातत्त्वीय दृष्टिकोनातून अभ्यास केला त्यावेळी लक्षात आलं की, साधारणपणे १,७२,००० वर्षांपूर्वी ती बिकानेरच्या जवळून वाहात होती. भौगोलिक जडणघडणीत बदल झाला आणि हे मोठं पात्र ७५,००० वर्षांपूर्वी वायव्येला सरकलं. तिचं पात्र मात्र तितकंच विस्तीर्ण होतं. काही काही ठिकाणी त्या पात्राची कमाल रुंदी २५ किलोमीटर्सपर्यंत होती. अशा सरस्वती नदीचा प्रवाह अविरल वाहात असताना तिच्या काठी वसलेल्या पूर्वजांनी आपल्या अष्टपैलू बुद्धिमत्तेच्या जोरावर एक संपन्न असलेली संस्कृती विकसित केली. सरस्वती नदीच्या कोरड्या पात्राचा विविध शास्त्रांच्या आधारे जगभरातले विद्वान अभ्यास करीत आहेत. या नदीच्या प्राचीनतेची साक्ष देणारे अनेक शास्त्रशुद्ध पुरावे आता उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे वैदिक संस्कृतीच्या काळाचाही सहज सुगावा लागतो. तर, त्या काळात रचल्या गेलेल्या ऋग्वेदात एका राणीचा वीरांगना म्हणून गौरवानं उल्लेख केलेला आढळतो. तिचं नाव विश्पला!



'विश्पला' या शब्दाचा अर्थ होतो 'प्रजेची पालनकर्ती'! ती सुविद्य तर होतीच; शिवाय अस्त्र आणि शस्त्र चालविण्यात निष्णात होती. तिला युद्धनीती आणि ती रणात राबविण्याचा विशेष अभ्यास होता. विश्पला राणीचा उल्लेख ऋग्वेदात किमान पाच वेळा आलेला आहे. त्यात ती खेल नावाच्या राजाची राणी होती, असं म्हटलेलं आहे. यांचं राज्य सरस्वती नदीची उपनदी असलेल्या शतद्रू म्हणजे सतलज नदीच्या काठी होतं. अनेक अभ्यासकांच्या मते तो प्रदेश म्हणजे गांधार प्रांत म्हणजे आजचा अफगाणिस्तान असावा. या राजाचे राजगुरू होते ऋषी अगस्त्य. खेल राजाच्या राज्यावर शत्रूनं आक्रमण केलं. त्याला तोंड देण्याकरिता त्याचा सेनापती सगळी सेना घेऊन त्याच्यावर तुटून पडला. पण शत्रूचं सैन्य अधिक शक्तिशाली होतं. त्यामुळे खेल राजाच्या सेनापती आणि सेनेचा पराभव झाला. राणी विश्पला मात्र हार पत्करायला तयार नव्हती.



तिनं राजाकडे युद्ध करण्याची अनुमती मागितली आणि ती मिळताच अश्वावर स्वार होऊन ती स्वत: लढण्यासाठी रणांगणात उतरली. तिच्यातलं ओज, तेज आणि शौर्य सारं पणाला लावून ती लढत होती. इतक्यात शत्रुपक्षातून एक वार असा काही विचित्र आला की, तिचा पाय गुडघ्याच्या काहीसा वरपासून तुटून विलग झाला. आता मात्र तिला युद्धातून माघार घ्यावी लागली. ती राजवाड्यात परतली. तिला अशा प्रकारे रणांगण सोडून परत येणं काही मान्य नव्हतं. त्यामुळे तिनं राजगुरू अगस्त्यांकडे विनंती केली की, काहीतरी योग्य उपचार करून तिचा पाय व्यवस्थित व्हावा. म्हणजे ती पुन्हा रणभूमीवर जाऊन उरलेलं युद्ध पूर्ण करेल.

अगस्त्य ऋषींनी सूर्य आणि संज्ञा (सरण्यू) चे जुळे पुत्र नासत्य आणि दस्र अर्थात देवांचे वैद्य अश्विनीकुमारांना विश्पलावर उपचार करण्याचं आवाहन केलं. अगस्त्य ऋषींच्या विनंतीला मान देत अश्विनीकुमार प्रकटले. त्यांनी एका रात्रीत तिच्यासाठी अयस म्हणजे धातूचा एक पाय तयार केला आणि तो तिच्या तुटलेल्या पायाच्या जागी बसवून दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी कृत्रिम पाय घालून राणी विश्पला पुन्हा घोड्यावर स्वार होऊन लढाई करण्यासाठी युद्धभूमीवर उतरली. यानंतर या राजदाम्पत्याचं काय झालं याविषयी काहीच कळत नाही.

मुळात ही कथा येते ती अश्विनीकुमारांचा महिमा सांगणाऱ्या ऋचेत 'चरित्रं हि वेरिवाच्छेदि पर्णमाजा खेलस्य परितक्म्यायाम्। सद्यो जङ्घामायसीं विश्पलायै धने हिते सर्तवे प्रत्यधत्तम्।।ऋग्वेद हे अश्विनीकुमारांनो, (युद्धात) संकटाच्या वेळी, जेव्हा राजा खेल यांची पत्नी विश्पला हिचा पाय एखाद्या पक्ष्याच्या पंखासारखा (युद्धभूमीवर) कापला गेला, तेव्हा तुम्ही लगेच (सद्यः) तिला धातूचा पाय (जङ्घामायसीम्) लावून चालण्यास (आणि लढण्यास) सक्षम केले. या एकाच ऋचेचा सखोल अभ्यास केला तर आपल्याला हे बिंदू आकळतात.

१) ऋग्वेद काळातील प्रसंग उद्भवला तर राण्यादेखील स्वत: रणांगणात उतरून लढत. त्यामुळे त्या अश्वविद्या, शस्त्रविद्या, अस्त्रविद्या आणि युद्धकला पारंगत होत्या.

२) ऋग्वेदात 'अयस' हा शब्द धातू म्हणजे मेटल या अर्थी वापरण्यात आलेला आहे. त्या काळी सोनं, चांदी, तांबं हे शुद्ध धातू आणि कांस्य हा मिश्र धातू त्यांना माहिती होता.

३) देवांचे वैद्य म्हणून संज्ञा- सूर्यपुत्र नासत्य आणि दस्र हे अश्विनीकुमार आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार करण्यात निष्णात होते. म्हणजे यांच्याकडे आपत्ती नियोजन अर्थात 'क्रायसिस अँड डिझास्टर मॅनेजमेंट' हा विभाग होता. ते सर्व प्रकारच्या अडीअडचणीवर उपाय शोधण्यात पारंगत होते.

४) नैसर्गिक अवयव गमावल्यानंतर त्या जागी कृत्रिम अवयव म्हणजे प्रोस्थेसिस बसवून माणसाला काम करता येण्याजोगं बनवण्याचा जगातला पहिला प्रयोग या भारताच्या भूमीत ऋग्वेद काळात झाला. त्यासाठी तांबं वापरण्यात आलं. कारण वातावरणात असलेल्या प्राणवायूशी प्रतिक्रिया करून ते गंजत नाही; फक्त काळं पडतं. ते वजनानं हलकं, आघात वर्धनीय (ठोकून हवा तो आकार देता येण्यासारखं = मॅलिएबल), घडण सुलभ म्हणजेच लवचीक असतं.

ऋग्वेदात नोंदवून ठेवलेला हा सगळा अर्थगर्भ संदर्भ जिच्यामुळे आहे त्या महाप्रतापी राणी विश्पलाची ही आठवकथा!

# मोहक 'मोह' फुलांची सांस्कृतिक श्रीमंती

बोली आणि संस्कृती — प्रा. अजय देशपांडे

उन्हाळ्यात मोहाचे झाड अंगभर फुलून येते. फुललेले मोहाचे झाड सुंदर दिसते. मोह, महुवा, मधुक वगैरे नावाने प्रसिद्ध असलेल्या मोहाचे मानवाशी प्राचीन काळापासून नाते आहे. विविध विधी, विवाह सोहळ्यापासून वेगवेगळ्या खाद्यपदार्थांपर्यंत आणि मद्य किंवा दारू निर्मितीपासून औषधी निर्माणापर्यंत मोहाचे महत्त्व आहे.

प्रेमिकांच्या भेटीचे संकेतस्थळ असणारा मोह पक्ष्यांसह प्राण्यांनाही साद घालणारा आहे. हाल सातवाहनाच्या 'गाथा सप्तशती' या प्राचीन ग्रंथामध्ये मोहफुलांचा स्पष्ट उल्लेख सहा गाथांमध्ये आला आहे. फुललेल्या मोहफुलांना स्पर्श करीत सुगंध घेत एक वाटसरू आपल्या पत्नीची आठवण करीत आहे. स. आ. जोगळेकर यांनी संपादित केलेल्या गाथा सप्तशतीत मूळ गाथा व अर्थ असा दिला आहे. **'अग्घाइ, छिवइ, चुम्बइ, ठेवइ, हिअअम्मि जणिअरोमञ्चो। जाआकवोलसरिसं पेच्छइ! पहिओ महुअपुप्फम्।।'** पहा, वाटसरू मधुक पुष्पाचा वास घेत आहे; त्याला स्पर्श करीत आहे; त्याचे चुंबन घेत आहे; ती फुले आपल्या हृदयावर ठेवून रोमांचित होत आहे. कारण मधुक पुष्पाच्या दर्शनाने त्याला त्याच्या पत्नीच्या गुबगुबीत गालांची आठवण झाली आहे. (पृष्ठ ४२१) ही गाथा दीपक अलंकाराचे सुंदर उदाहरण होय.



फुललेल्या मोहाखाली फुले वेचायला जाण्याचे निमित्त साधून प्रियकराला भेटणाऱ्या नायिका गाथांमध्ये भेटतात. मोह फुलांचा हंगाम संपल्यानंतर प्रियकराला भेटणे अशक्य होईल म्हणून निराश झालेली प्रेयसी एका गाथेत म्हणते-

**'णिप्पच्छिमाइँ असई दुःखालोआइँ महुअपुष्फाई ।**
**चीए बन्धुस्स व अट्ठिआइँ रुअँई समुच्चिणइ ।।'**

मधुक पुष्पांचा हंगाम संपत आल्यामुळे असतीचे अंतःकरण व्यथित झाले आणि ती अश्रू ढाळीत उरलीसुरली फुले वेचू लागली. हे पाहताना वाटते की, जणू ती आपल्या बांधवांच्या अस्थीच गोळा करीत आहे. (पृष्ठ ८०) मोहफुलांनी बहरलेले झाड प्रेमी युगुलांचे भेटीचे संकेतस्थळ असल्याचे उल्लेख आहेतच. अथर्ववेदात मधुक पुष्पांचा उल्लेख आला आहे.

**'मधुमतीं ओषधीं खनाम्यहं मधुकं मधुना संजज्ञे ।**
**मधुना मे मुखं भवति मधुना मे वाचा उच्यते ।।'**

मोहकळ्या, मोहफुले यांची चव गोड असते. मोहफुले खाल्ल्याने वाणी मधुर होते, असा लोकसमज असावा. मोहाचे रोपटे जमिनीतून काढून नेण्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा की, मोह जंगलातून आणून घरी लावून, वाढवून त्याच्या कळ्या-फुले आणि फळांचा दैनंदिन जीवनात आहारात समावेश करावा त्यामुळे आपली वाणी मधुर होते. सुश्रुत संहितेत मोहफुलांचे वर्णन आले आहे.

**'मधुकपुष्पं मधुरं शीतं वातपित्तशमनं गुरु च'**

मोहफूल चवीला गोड असते. त्याचा शरीरावर परिणाम शीत असून मोहफुले खाल्ल्याने शरीरातील वात आणि पित्त या दोषांचे शमन होते; मात्र मोह पचण्यास जड असल्याचेही सांगितले आहे. चरकसंहितेत मोहाची वैशिष्ट्ये नेमकी सांगितली आहेत.

**'मधूकपुष्पं मधुरं शीतं गुरु च बृंहणम्।**
**वातपित्तप्रशमनं कफकृच्चातिसेवनात्।।'**

मोह फुले चवीला गोड असून त्याचा परिणाम शीतल आहे. पचण्यास जड असणारी मोहफुले वात-पित्त दोषांचे निवारण करीत शरीराचे पोषण करणारी, वजन वाढविणारी आहेत. मात्र ही फुले शरीरात कफवृद्धी करू शकतात. चरकसंहितेत सुमारे ८४ प्रकारच्या मादक पेयांचे वर्णन केले असून त्यात मोहाच्या मादक पेयाचाही उल्लेख आहे. महाभारत, योगसार संग्रह वगैरे प्राचीन ग्रंथात मोहाचे उल्लेख आहेत. काही ग्रंथांत मोहाचे उपयोग व महत्त्व सांगितले आहे. अरबी प्रवासी इब्न बतूत १४ व्या शतकात भारतात आला होता. त्याने वाळवलेली मोहफुले खाल्ली. तो म्हणतो, ''मोहाची वाळवलेली फुले सुकवलेल्या अंजीरासारखी लागतात.'' मोहफुले ताजी आणि वाळवून खाण्याची रीत आहे. मोहाची चव मोहमयी आहे. मोहकळ्या मोहक असतात. दारूसाठी बदनाम असलेल्या मोहाचे वरण आणि पुरणही केले जाते. मोहाच्या फुलांपासून गूळ तयार केला जातो. मोहाची फुले वाळवून दळून पिठात मिसळून भाकरी केली जाते.

मोहाची फुले आणि गूळ यांची मोहपापडी केली जाते. मोहाचे लोणचे होते, चटणीही केली जाते. मोहाच्या फळाला 'मोहाटी' म्हणतात. त्याचे तेल काढतात. काही भागात मोहाच्या फळांना टोळ म्हणतात. मोहबी, टोळंबी ही मोहबियांची नावे आहेत. मोहाची दारू प्रसिद्ध आहे. मोहाच्या फुलांपासून दारू तयार करून ती सामूहिक पिण्याच्या उत्सवाला 'इरपा पंडुम' असे म्हणतात. अक्षय्य तृतीयेला 'मोहडोंबरी' नावाचा एक विधी केला जातो. 'मोहडोंबरी'पर्यंत कोणी मोह खात नाहीत, 'मोहा'ची पीत नाही. मोहडोंबरीच्या विधीच्या वेळी चारोळी आणि मोहाची दारू देवतेला अर्पण केली जाते. पळसाच्या पानाचा 'पेव' तयार करून त्यात मोहाची दारू दिली-घेतली जाते. त्यानंतर मोह खाण्यास सुरुवात होते. काही भागात मोहाच्या दारूला 'सिद्दू' असेही म्हणतात.

मोहफुलांचा सुगंध आणि गोडवा पक्षी आणि प्राण्यांना आकर्षित करणारा असतो. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या 'पक्षी जाय दिगंतरा' या पुस्तकात 'मोहा फुलला' हा सुंदर लेख आहे. चितमपल्ली लिहितात, 'मोहाच्या फुलांचा मोह माणसांनाच नव्हे तर वनातील पशुपक्ष्यांनाही पडतो. पुलानं बहरलेल्या मोहाच्या वृक्षाकडे मोर, हरोळी व पोपट आकर्षित होतात. तसेच मोहाची जमिनीवर पडलेली फुले खाण्याकरिता रानगवे, सांबर, नीलगाय, चितळ, कोठरी, कृष्णमृग, अस्वले, कोल्ही, खोकड, मोहडोंबरी- सिबिट सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर फार दुरून या वृक्षाकडे येतात.' (पृष्ठ २७, २८) मोहफुले आवडीने खाणाऱ्या एका पक्ष्याचे नाव 'मोहडोंबरी' असे आहे. लालगुलाबी कंठ असणाऱ्या पोपटांना मोहफळे म्हणजे मोहाटी किंवा टोई फारच आवडते.

विदर्भात भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती जिल्ह्यांत मोहाची टोई आवडीने खाणारे 'टोई पोपट' आहेत. 'निसर्गवाचन' या पुस्तकात मारुती चितमपल्ली लिहितात, 'एप्रिल- मे महिन्यात जंगलातील मोहाची झाडे फुलांनी बहरतात. फुलांच्या हंगामानंतर त्यांना फळे धरू लागतात. या फळांना भंडारा जिल्ह्यात टोई म्हणूनही ओळखले जातात. म्हणतात, गुलाबी कंठाच्या पोपटांना या टोई खूप आवडतात, म्हणून ते टोई पोपट.' (पृष्ठ ३४). मोहाचा महिमा असा बराच आहे. मोहाला इंग्रजीत 'इंडियन बटर ट्री' असे म्हणतात; त खरेच आहे. झाडीबोलीत मोहाला 'मोव्' असे म्हणतात. त्यातील 'व्' चा उच्चार अर्धाच आहे.

(पान ६ वर)

# समुद्रातील 'ट्राफिक जॅम'



**'जागतिक खेडे' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजच्या जगात सागरी वाहतूक ही अर्थव्यवस्था, व्यापार आणि दैनंदिन जीवनाचा अनन्यसाधारण भाग. जलमार्गांमधून लाखो जहाजे, मालवाहू नौका, प्रवासी जहाजे आणि मासेमारी नौकांचे दळणवळण जागतिक व्यापाराची गती कायम ठेवते. जगातील सुमारे ८० टक्क्यांहून अधिक मालवाहतूक समुद्रमार्गे होत असल्याने आज सागरी वाहतूक ही जागतिक पुरवठा साखळीची मुख्य जीवनवाहिनी मानली जाते.**

वेध — गायत्री श्रीगोंदेकर

सागरी वाहतूक म्हणजे महासागर आणि समुद्रांमध्ये जहाजांची हालचाल, व्यवस्थापन आणि त्यांचे 'रिअल- टाईम ट्रॅकिंग.' आधुनिक तंत्रज्ञानामुळे जहाजांची अचूक स्थिती, वेग, दिशा आणि मार्ग यांची माहिती त्वरित मिळू लागली आहे. यामुळे नौकानयन अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि जलद झाले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, ऊर्जापुरवठा, मत्स्यव्यवसाय, पर्यटन, तसेच संरक्षण क्षेत्रासाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते.


सागरी 'नेव्हिगेशन'चा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. प्राचीन काळात खलाशी दिशा शोधण्यासाठी सूर्य, तारे, कंपास आणि खगोलीय साधनांचा वापर करत असत. नंतर नकाशे, क्रोनोमीटर आणि रडार तंत्रज्ञान विकसित झाले. २०व्या शतकात 'जीपीएस' प्रणालीमुळे नौकानयनात क्रांती झाली. त्यानंतर 'एएआयएस' आणि उपग्रह तंत्रज्ञानामुळे जहाजांचे अचूक 'ट्रॅकिंग' शक्य झाले. या प्रगतीमुळे जागतिक व्यापाराला मोठी चालना मिळाली आणि समुद्री वाहतूक अधिक सुरक्षित व विश्वासार्ह बनली. सागरी वाहतुकीत विविध प्रकारच्या जहाजांचा समावेश होतो. मालवाहू जहाजे जगभरात वस्तू पोहोचवतात, तेलवाहू जहाजे ऊर्जापुरवठा साखळी मजबूत करतात, तर क्रूझ आणि फेरीसेवा प्रवासी वाहतूक सुलभ करतात. याशिवाय, मासेमारी नौका आणि संशोधन जहाजे सागरी संसाधनांचा अभ्यास व उपयोगासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. या सर्व जहाजांची हालचाल सुरळीत ठेवण्यासाठी अत्याधुनिक 'नेव्हिगेशन' प्रणालींचा वापर केला जातो.

बंदर व्यवस्थापन हे सागरी वाहतुकीचे आणखी एक महत्त्वाचे अंग. जगातील प्रमुख बंदरे ही जागतिक व्यापाराची केंद्रे आहेत. जहाजांची ये- जा, माल चढ- उतार, सीमाशुल्क प्रक्रिया आणि 'लॉजिस्टिक' व्यवस्थापन, यासाठी अत्यंत समन्वय आवश्यक असतो. आधुनिक बंदरांमध्ये 'डिजिटल' प्रणालींचा वापर करून जहाजांना 'डॉकिंग स्लॉट' दिले जातात. त्यामुळे विलंब आणि गर्दी कमी होते. सिंगापूर, रॉटरडॅम, शांघाय आणि दुबईसारखी बंदरे जागतिक व्यापारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. सागरी वाहतुकीचा जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव आहे. विविध देशांमधील आयात- निर्यात सुलभ केल्यामुळे उद्योग, उत्पादन आणि व्यापाराला चालना मिळते. समुद्रमार्गामुळे वस्तूंची वाहतूक तुलनेने स्वस्त आणि मोठ्या प्रमाणात शक्य होते. आंतरराष्ट्रीय सागरी कायदे आणि नियमावली या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावतात. जहाज सुरक्षा, प्रदूषण नियंत्रण आणि समुद्री सीमांचे व्यवस्थापन, यासाठी विविध आंतरराष्ट्रीय करार अस्तित्वात आहेत. वाढत्या जागतिक व्यापारामुळे समुद्री मार्गांवरील गर्दी वाढत असल्याने सुरक्षित आणि शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थापन अत्यावश्यक बनले आहे. यामध्ये 'ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टम' या आधुनिक तंत्रज्ञानाची मोठी भूमिका आहे. 'एआयएस' प्रणाली जहाजांची ओळख, स्थान, वेग आणि मार्ग यांची माहिती स्वयंचलितपणे प्रसारित करते. त्यामुळे जहाजांमध्ये टक्कर होण्याचा धोका कमी होतो आणि समुद्री मार्गांचे व्यवस्थापन शक्य होते. व्यापारी जहाजांबरोबरच प्रवासी नौका, मासेमारी बोटी आणि नौदल जहाजेही या प्रणालीचा वापर करतात. 'मरीन ट्राफिक'सारख्या प्लॅटफॉर्म'मुळे जहाजांची माहिती सर्वसामान्य नागरिक, संशोधक आणि व्यावसायिकांना उपलब्ध झाली आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान आणि स्वयंचलित जहाजांमुळे सागरी वाहतुकीत बदल अपेक्षित आहेत. 'डिजिटल मॉनिटरिंग' आणि 'स्मार्ट पोर्ट्स' मुळे कार्यक्षमता आणखी वाढेल. जागतिक संपर्क आणि व्यापार अधिक मजबूत करण्यासाठी सागरी वाहतूक पुढील काळातही केंद्रस्थानी राहणार आहे.

# AI नोकरीचा कर्दनकाळ की संधीचं नवं दार?

तंत्रज्ञान — महेश रायखेलकर, भ्र. ९३२६६१२४३६

AI म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे हळू हळू बाळसं धरू लागलंय. AI आल्यामुळे काही नोकऱ्यांवर गंडांतर येईल का? व काही नवीन नोकऱ्या, संधी निर्माण होतील का? हेच आज आपण पाहणार आहोत. या लेखाचा उद्देश कोणालाही घाबरविण्याचा नाही पण वस्तुस्थितीची कल्पना असावी म्हणून हा प्रपंच. हे सर्व असेच आणि लगेच होईल असेही नाही. कारण भारतात AI पूर्णपणे रुजायला तसा अवकाश लागेल. पण आपण तयार असणे कधीही चांगले.





**कोणत्या नोकऱ्या जातील किंवा त्याला धोका आहे.**

**१. आय. टी. क्षेत्र :** मुख्य करून आय. टी. क्षेत्राला याचा जास्त धोका आहे. बेसिक प्रोग्रामिंग ज्याला आपण कोडिंग म्हणतोय तो AI च करत असल्याने बेसिक प्रोग्रामिंग करणाऱ्यांची गरज तेवढी भासणार नाही.

**२. डाटा एन्ट्री ऑपेरटर :** आता कोणत्याही विषयावर माहिती ChatGPT काही मिनिटात करून देत असल्याने वेगवेगळे रिपोर्ट, लेटर, कोणत्याही आलेल्या मेलला उत्तर, अजेंडा हे करण्यासाठी किंवा हे टाईप करण्यासाठी लागणारे ऑपेरटर यांची गरज कमी होईल.

**३. डिझाईनची कामे :** जेमिनी सारखा AI डिझाईनची बेसिक कामे त्वरित करून देत आहे तेव्हा या क्षेत्रातील बरीचशी कामे कमी होतील.

**४. कंटेंट रायटिंग -** बेसिक प्रॉडक्टचे वर्णन, बातम्यांचे छोटे रिपोर्ट्स. ChatGPT २ मिनिटात १० व्हर्जन लिहून देतो. तेव्हा ही कामे करणाऱ्या लोकांकडे येणारा कामाचा ओघ कमी होईल.

**५. ट्रान्सलेटर आणि ट्रान्सक्रिप्शन:** भाषांतर करणं, मीटिंगचे मिनिट तयार करणे ही कामे AI चुटकीसरशी करत असल्याने यांची गरज कमी होईल.

**६. इंग्लिश एक्स्पर्ट:** इंग्लिश ही भारतीयांसाठी परकीय भाषा असल्याने या भाषेतील तज्ञांना AI येण्या अगोदर चांगली मागणी होती. आज AI मधे असलेला जास्त डेटा इंग्लिश मधेच असल्याने इंग्लिश एक्स्पर्टची गरज हळूहळू कमी होईल.

**७. एक्स्पर्टचे असिस्टंट:** डॉक्टर, वकील, सी.ए. इंजिनीअर अशी जी एक्स्पर्ट आहेत यांना मदत करणारे असिस्टंटची संख्या कमी होईल कारण त्या त्या एक्स्पर्टीजचे AI/ AIgent चांगल्यापैकी काम करत आहेत तेव्हा या एक्स्पर्टना त्यांच्या असिस्टंटवर अवलंबून रहावे लागणार नाही.

वरील काही उदाहरणे झाली. AI अजून किती वेगाने प्रत्येक क्षेत्रात शिरकाव करतोय आणि त्याचा वापर आपण किती वेगाने करतोय यावर बरेचसे अवलंबून असेल. कोणत्या क्षेत्रातील नोकऱ्या सुरक्षित राहतील किंवा नवीन कोणत्या संधी उपलब्ध होतील ते पाहूया...

**१. श्रमाची आणि बुद्धीची कामे :** AI बुद्धीची कामे करतोय AI रोबोट फार खर्चिक आहेत. तेव्हा प्लंबर, इलेक्ट्रीशियन, सुतार, नर्स, सर्जन, बांधकाम करणारे कामगार, शेतकरी किंवा श्रमाची कोणतेही कामे सुरक्षित आहेत.

**२. भावना व माणसाला जाणणाऱ्या नोकऱ्या:** शिक्षक, डॉक्टर, मानसोपचार तज्ञ अशी माणसांची व्यवहार करणारी क्षेत्रे सुरक्षित असतील.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, १७ मे ते शनिवार, २३ मे २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १७ मे-** दशहरा, करिदिन, प्रारंभ, इष्टी, मलमासारंभ, अधिक ज्येष्ठ मासारंभ (पुरूषोत्तममासारंभ), विश्व दूरसंचार दिन ✻ **सोमवार, १८ मे-** धनिष्ठा, नवक समाप्ती सकाळी ११.३२, अमृत सिध्दी योग ११.३२ ✻ **मंगळवार, १९ मे-** विनायक चतुर्थी (अंगारक योग) ✻ बुधवार, २० मे- महाराजा मल्हारराव होळकर पुण्यदिन ✻ **गुरुवार, २१ मे-** गुरुपुष्यामृत (सूर्योदयापासून २६:५० पर्यंत), राजीव गांधी स्मृतिदिन, दहशतवाद विरोधी दिन ✻ **शुक्रवार, २२ मे-** भारतीय ज्येष्ठ मासारंभ, राजा राममोहन राय जयंती , श्री महालक्ष्मीदेवी यात्रा सांगाव (ता. कागल) ✻ **शनिवार, २३ मे-** दुर्गाष्टमी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १८, २३ मे (१० नंतर) ✻ डोहाळ जेवण- १८ मे (१२ नंतर), २० मे (११ नंतर) ✻ बारसे- १८, २० मे (११ नंतर) ✻जावळ- २१ मे ✻ गृहप्रवेश- १८, २० मे

### मेष :- धावपळ करू नका

इच्छा, गरजा आणि झोप जीवनात कधीही पूर्ण होत नाहीत. पापग्रहांमुळे धनस्थान व्ययस्थान बाधित झाले आहे. त्यामुळे सध्या आपल्या गरजा मर्यादित ठेवा. उपजत कला- गुणांचा विकास होत जाईल. विनाकारण धावपळ करू नका. विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावे. नव्या योजना सध्या नकोत. शुभ ता. १८, २१

### वृषभः- अडचणींवर मात

जो जेवढ्या सुविधेत आहे, तो तेवढ्याच दुविधेत आहे. व्ययात मंगळ, लाभात शनि, नेपच्यून त्यामुळे आर्थिक समस्या वाढल्या तरी वेळीच मार्गही धनस्थ गुरू, शुक्रामुळे निघत जाईल. अडचणींवर मात कराल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. अति आत्मविश्वास बाळगू नका. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. विलंबाने प्रगती घडेल. शुभ ता. १९, २१

### मिथुनः- मनासारख्या घटना

उत्सुकता, आस्तित्व, शाश्वत सत्य म्हणजे जीवन. शुक्रवारचा बुध- शनि लाभयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणारा आहे. राशीतील गुरू, शुक्रामुळे मनासारख्या घटना घडतील. उपेक्षीत संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सौख्य लाभेल. वैद्यकिय, कृषि क्षेत्रात प्रगती साधता येईल. अपेक्षित घटना घडतील. चिंता नको. शुभ ता. १८, २१

### कर्कः- योजलेली कामे होतील

संयोगाने जीवन मिळते, सहयोगाने चालते, लाभातील बुधाचा भाग्यातील शनिशी होणारा लाभयोग आर्थिक बाबतीत शुभफलदायी आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. नव्या योजना साकार करता येतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधीचे स्वागत करावे. सरकारी कामे मनासारखी होतील. फार चिंता करू नका. मनासारख्या घटना घडतील. शुभ ता. १९, २१

### सिंहः- नव्या संधी लाभतील

काही हसून बोला, काही हसून टाळा, समस्या खूप आहेत. त्यावेळेवर सोडवा. लाभस्थानी गुरू, शुक्र असल्याने आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधी लाभतील. शुभ ता. १९, १९

### कन्याः- पुढचे पाऊल पडेल

प्रत्येक श्वास घेताना आसमंतातल्या सुगंधाचा प्रत्येय आला पाहिजे. अष्टमातील मंगळ शारीरीक तक्रारी ठेवणार आहे. उष्णतेपासून त्रास होईल. गृहसजावट, खाद्य पदार्थ, ज्ञानदान अशा क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. व्यवसायात पुढचे पाऊल पडेल. नव्या संधीचे स्वागत करावे. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. शुभ ता. १९, २०

### तुलाः- चिंता नको

देणारा अमाप देत असतो. फक्त घेणार्याची ओंजळ श्रध्देने भरलेली असावी. बुध, शनिचा लाभयोग कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडविणारा आहे. नोकरी, व्यवसायात अनूकुलता वाढेल. नव्या संधीचे स्वागत करावे. कौटुंबिक जीवनात, भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. १९,२१

### वृश्चिकः- अचानक धनलाभ

जीवनात जो वादा निभावता येत नसेल तर असा वादा करू नये. बुध- शनि लाभयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणारा आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अचानक धनलाभाचे योग आहेत. अपेक्षित संधी लाभतील. घाईने निर्णय घेऊ नका. समस्यातून मार्ग निघेल. प्रगतीच्या घटना. शुभ ता. १८, २१

### धनुः- गृहसौख्य लाभेल

देव आपल्याला जे पाहिजे ते देत नाही, आपल्यासाठी योग्य आहे, तेच देत असतो. सुखस्थ शनिचा बुधाशी होणारा लाभयोग सौख्यदायी घटना घडविणारा आहे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. वैद्यकिय, मेकॅनिकल अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. सुसंधीचे स्वागत करावे. सर्व प्रतिकुलतेवर मात कराल. गृहसौख्य लाभेल. शुभ ता. १८, १९

### मकरः- अडचणीतून मार्ग निघेल

प्रत्येक दिवस नवा आरंभ असतो. फक्त कालचं ओझं उतरविण्याच धाडस हवं. राशी स्वामी शनिचा बुधाशी होणारा लाभयोग आर्थिक बाबतीत महत्त्वाच्या घटना घडविणारा आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणीवर मात कराल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. १९

### कुंभः- कला- गुणांतून अर्थार्जन

गर्वाशिवाय बोलणे, हेतुशिवाय प्रेमकरणे, अपेक्षेशिवाय काळजी घेणे ही सर्व खर्या नात्याची लक्षणे आहेत. धनस्थ शनिचा बुधाशी होणारा लाभयोग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी आहे. कला- गुणांतून अर्थार्जन घडेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या संधींचा लाभ घ्यावा. मनासारख्या घटना घडतील. शुभ ता. १९

### मीनः- कार्यक्षेत्रात प्रगती

कधीकधी आयुष्य आपल्याला हवं असलेले देत नाही, तर प्रगतीसाठी ज्याची गरज असते, तेचं आपणास देते. राशीतील शनिचा बुधाशी होणारा लाभयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. योजलेली कामे करून घ्यावीत. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २१

!! शुभ भवतु !!

पान ४ वरून

## रात्रीचे वाढते तापमान चिंताजनक

वकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल साधणे ही आजची सर्वात मोठी कसोटी आहे.शाश्वत विकासाची संकल्पना आता केवळ तत्त्वज्ञान राहिली नसून व्यवहारात उतरविण्याची गरज निर्माण झाली आहे. हवामान बदल ही मानवनिर्मित समस्या आहे. तिचे समाधानही मानवी इच्छाशक्ती आणि कृतीमध्ये दडले आहे. तंत्रज्ञान, धोरण आणि जागतिक सहकार्य यांच्या माध्यमातून आपण या संकटावर मात करू शकतो; मात्र यासाठी फारसा वेळ शिल्लक नाही. आज घेतलेले निर्णयच उद्याच्या पृथ्वीचे भविष्य ठरवतील आणि म्हणूनच ही लढाई प्रत्येक नागरिकाची आहे. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## AI नोकरीचा कर्दनकाळ की...

कारण या क्षेत्रात फक्त व्यवहार नाही तर मानवी भावना देखील आहेत. सध्यातरी AI याबाबतीत बेसिक लेव्हलला आहे .

**३. सर्जनशील आणि निर्णय घेणाऱ्या नोकऱ्या :** AI विक्रीचा प्लॅन तयार करून देईल. पण ग्राहकाचा मूड पाहून त्याला हाताळणे आणि विक्री पूर्ण करणे हे सेल्स मॅनेजरच करू शकेल. AI कडे जगात आजपर्यंत जे काही घडले याचा जरी डेटा असला तरी नवीन कल्पना लढवणे, संशोधन करणे, सर्जनशीलता हा मानवी गुण वापरून काही नवीन घडवणे हे AI करू शकणार नाही. येथे मानवास भरपूर वाव आहे.

**४. AI ला शिकवणाऱ्या नोकऱ्या:** Prompt Engineer, AI Trainer. AI ला 'काय' करायचं ते सांगणारा माणूस लागतोच. या नवीन संधी उपलब्ध होतील. AI कसे वापराचे हे शिकवणारे तज्ञ लागतील. AI डेटा वरच काम करतो तेव्हा डेटा विश्लेषकाची गरज भासेल. तेव्हा शेवटी असे म्हणावे लागेल AI आल्यामुळे घाबरून जायचे कारण नाही. जर तुमचे क्षेत्र AI मुळे फार प्रभावित होत असेल तर क्षेत्र बदला किंवा AI शिकून त्याचा वापर करण्यास सुरवात करा. तसेच AI आल्यामुळे कोणते क्षेत्र नवीन निर्माण होणार आहे? कोणत्या नवीन संधी निर्माण होणार आहेत याचा विचार करा आणि कामाला लागा. परीवर्तन हा जगण्याचा भाग आहे तेव्हा त्याला सजगपणे सामोरे जाणे हेच शहाणपणाचे.

## आत्मनिर्भर भारत



आत्मनिर्भर आणि
निर्भय
मंत्र असावा
प्रत्येकाचा
श्वास अन्
उच्छ्वासातही
विचार असावा
या देशाचा ।।
संकटाचे
संधीमध्ये
परिवर्तन हे ध्येय असावे
यातून पुरुषार्थाचे दर्शन
सर्व जगाला प्रत्ययी यावे ।।

देशासाठी जगणे हा तर
प्रत्येकाचा धर्म असावा
परस्परांना समजून घेऊन
विद्वेषाचा लेश
नसावा ।।
या देशाला विश्वगुरूच्या
पदास नेण्या कार्य करावे
देशाचे गत परम वैभव
पुन्हा एकदा प्रकटित व्हावे ।।
स्वावलंबी देश असावा
काळाची ही शिकवण आहे

घराघरातील उद्योगाने
समृद्धीची गंगा वाहे ।।
आळस सारा झटकून आता
उद्योगाची वाट धरावी
देशामधल्या निर्मित वस्तू
विश्वासाठी गरज ठरावी ।।
अनंत अमुची इच्छाशक्ती
देश घडविण्या खर्ची व्हावी
या मातीच्या कणाकणातून
चैतन्याची बाग फुलावी ।।

सुरेश चिमणपुरे

# ऋग्वेदातील तत्त्वज्ञान (१)

तत्त्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळके

सृष्टीतील गूढत्वाविषयी जिज्ञासा व ते उकलण्याकरिता कल्पनेच्या भराऱ्या मारण्याची ऊर्मी मानवी मनात मूळचीच आहे. या ऊर्मीच्या बीजातूनच तत्त्वज्ञानाचे विविध घुमारे फुटत असतात. ऋग्वेदातील तत्त्वज्ञानाच्या मुळाशी हीच भावना आहे. सृष्टीची उत्पत्ती, तिचे आदिकारण, परमेश्वराचे स्वरूप आणि सामर्थ्य, आत्मा व जीव यांचा परस्परसंबंध, चेतन आणि अचेतन सृष्टीतील गूढतत्त्व तसेच सृष्टीतील विभिन्न शक्तींचे आधारभूत देव आदीसंबंधीचे सविस्तर विवरण ऋग्वेदात आढळते. एकूण सृष्ट्युत्पत्तीविषयक तत्त्वज्ञानामध्ये वेदकाली म्हणजे सुरुवातीलाच बरीच प्रगती झाली असल्याचे दिसून येते.

मंत्रकर्त्या ऋषींना याविषयी बरीच जिज्ञासा उत्पन्न झाली असली पाहिजे हे ऋग्वेदातील 'सृष्ट्युत्पत्तीसूक्त' (१०.१३०) या सूक्तावरून दिसून येते. हे संपूर्ण सूक्त या विषयाला वाहिलेले आहे. विश्वनिर्मितीबद्दल अतिशय मार्मिक व मूलगामी म्हणून 'नासदीय' नावाच्या सूक्ताकडे पाहिले जाते. ते ऋग्वेदाच्या दशम मंडलातील १२९ वे सूक्त असून सृष्टीचे मूळ शोधण्याचा जगातील पहिला प्रयत्न म्हणून त्याकडे पाहिले जाते. तसेच सर्व तत्त्वज्ञानाच्या पितृस्थानी म्हणून त्याकडे आदरानेही पाहिले जाते. हे सप्तऋचात्मक असून या सात ऋचांत अत्यंत खोल अर्थाचे १५० शब्द आहेत. या सूक्ताचा आशय असा की, अव्यक्त अशा एका तत्त्वापासून व्यक्त जग उत्पन्न झाले आहे. न्यूटनने झाडावरून फळ खाली पडताना पाहिले. आपणही हजारो वेळा फळे पडताना पाहतो. पण न्यूटनने नुसतेच फळ पडताना पाहिले नाही, तर ते पडताना त्याला त्यात गुरुत्वाकर्षणाचा नियम दिसला. हेच तत्त्वदर्शन होय. नासदीय सूक्तामध्ये मंत्रद्रष्टा प्रजापती ऋषी जगन्निर्मिती साक्षात डोळ्यांनी पाहत आहे की काय, असे त्यातील वर्णनावरून वाटते. प्रारंभीच त्याने मोठा मार्मिक व मूलगामी प्रश्न उभा केला आहे. तो असा की, मुळात सत (सत्य) किंवा असत (असत्य) काहीच नसता विश्व निर्माण झाले कसे?

**'नासदासीत् नोसदासीत् तदानी नासित्**
**रजः नो व्योम अपरोयत्।**
**किम आवरियः कुह कस्य शर्मन अम्भः कीम**
**ासीत् गहनं गभीरम् ।।'** (१०.१२९.१)

मुळात असत् नव्हते व सत्‌ही नव्हते. रजः किंवा धुळीचे आकाश व त्यापलीकडचे निरभ्र आकाश हेही नव्हते. अशा स्थितीत कोणी कोणाला आवरण घातले असावे? कोणाच्या सुखासाठी ते घातले असावे? प्रारंभी अगाध व गहन असे पाणी तरी होते का? पुढच्या ऋचेत व्यक्त जग ज्या एका अव्यक्त तत्त्वापासून निघाले होते त्या अव्यक्त तत्त्वाचे स्वरूप सांगितले आहे.



**'न मृत्यूरासिदसृतं न तर्हि न**
**रात्र्या अन्ह आसित्प्रकेतः ।**
**आनीदवातं स्वधया तदेकं**
**तस्माध्दान्यन्न परः किंचनास।।'**

(१०.१२९.२) तेव्हा मृत्यू म्हणजे मर्त्यसृष्टी नव्हती म्हणून अमृत किंवा मृत्यूरहित असाही पदार्थ नव्हता. रात्र आणि दिवस यांचा भेद कळण्यासही काही साधन नव्हते. (कारण सूर्य नव्हता) जे एकटे एकच आपल्या शक्तीने वायूशिवाय श्वासोच्छवास करीत होते, त्याशिवाय किंवा त्यापलीकडे दुसरे काहीच नव्हते. तिसऱ्या ऋचेत कवी गातो की,

**'तम आसित तमसा गूढं अग्रे**
**प्रकेतं सलिलं सर्व मा इदम।'**

प्रारंभी हे सर्व अंधकाराने व्याप्त होते व एकमेव पाणी होते. अथवा सर्वव्यापी ब्रह्म फोल मायेने आच्छादिले होते, ते मूळ एक ब्रह्मच तपाच्या महिम्याने पुढे प्रकट झाले होते. पुढे सहाव्या ऋचेत शंका उपस्थित करतो की, देवही सृष्टीच्या पसाऱ्यानंतरचे, तेव्हा सृष्टी कोठून आली कोण सांगणार?

**'आवाक् देवाः अस्य विसर्जनेन**
**अथ को वेद यत्र आबभूव।'**

पुढे सातव्या ऋचेत तर विश्वाची उत्पत्ती कशी झाली हे विश्वाचा जो अध्यक्ष तोही जाणत असेल किंवा नसेलही असे निर्धास्तपणे सांगण्यास कवी संकोच करत नाही.

**'यो यस्य अध्यक्षः परमे व्योमन**
**सो अंग वेद यदी वा न वेदः।'**

अशा रीतीने सृष्टी अस्तित्वात येण्यापूर्वीच्या तत्त्वाचा या सूक्तात विचार केला आहे. याचा अर्थ असा की, मनुष्याच्या उगमाबरोबरच त्याच्या मनात सृष्ट्युत्पत्ती बद्दलचे, एवढेच नव्हे तर त्याच्याही पूर्वीच्या अवस्थेचे गूढ जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली होती, असे स्पष्ट दिसते आणि सृष्टीच्या पूर्वी जे काही तत्त्व होते ते अनिर्वाच्च आहे, ते शब्दांनी व्यक्त करण्यासारखे नाही या निष्कर्षाप्रत त्याला यावे लागते.

सृष्टीत मानव, सूर्य, वायू, पाणी, आकाश, मृत्यू, ईश्वर, रात्र, अंधकार, दिवस इत्यादी सर्व तत्त्वे असतात. परंतु या तत्त्वांविना जी सृष्टी असेल ती कशी असेल याचे कुतूहल त्याच्या मनात जागृत झाले. या कुतुहलापोटीच या सूक्ताचा जन्म झाला आहे.

सृष्टीच्या निर्मितीविषयीचे अतिशय महत्त्वाचे विचार आपल्याला दशम मंडलातीलच 'पुरुषसूक्त' नावाच्या ९० व्या सुक्तात आढळतात. या सूक्तात एकूण १६ ऋचा आहेत. या सूक्ताचे पठन पुण्यप्रद मानले जाते. जुनी परंपरा सांभाळणाऱ्या ब्राह्मण घराण्यातून उपनयन झाल्यापासून हे नित्य पाठात ठेवतात. स्नानाच्या वेळी हे म्हणण्याचा परिपाठ आहे.

ऋग्वेदामध्ये काही ऋचा अशा आढळतात की ज्यामध्ये सर्व देवतांचे नियंत्रण करणारी कोणती तरी महाशक्ती आहे, असा विश्वास प्रकट केला आहे. ही महाशक्ती अंतिम सत्ता (ultimate reality) असून सर्व देवता या महाशक्तीचीच मूर्त रूपे आहेत, असा विचार येथे प्रकट केला आहे. या महाशक्तीलाच ईश्वर म्हणून संबोधण्यात येते व या विचारसरणीला एकेश्वरवाद (monotheism) असे म्हणतात. 'पुरुषसूक्ता'मध्ये याच एकेश्वरवादाचा स्पष्ट आविष्कार झाला आहे. हे जग एका अद्वितीय पुरुषापासून उत्पन्न झालेले आहे. पुरुषच सर्व काही आहे आणि पुरुषापासूनच सर्व स्थिरचरादिकांची उत्पत्ती झाली आहे, ही कल्पना या सूक्तात व्यक्त केली आहे. येथे पुरुष शब्दाने परमेश्वर असा अर्थ घ्यावयाचा आहे.

ईश्वर हा पुरुषोत्तम किंवा परमपुरुष आहे, ही कल्पना जगातील सर्व धर्मांचा आधार आहे. असा हा सर्वशक्तिमान पुरुष कसा आहे?

**'सहस्त्रशीर्षा पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपात ।**
**स भूमी विश्वतो वृत्त्वात्यतिष्ठशांगुलम् ।।'** (१)

अनंत मस्तके, अनंत नेत्र व अनंत पाद यांनी युक्त असा हा आदिपुरुष (परमात्मा) सर्व सृष्टी व्यापून त्याच्या पलीकडे १० अंगुले भरून उरला आहे. जे काही आहे, जे झाले व जे होणार ते सर्व काही हा पुरुष आहे.

**'पुरुष एवेदं सर्वं यद्भुतं यच्च भव्यम'.**

सारे दृश्य जग हा त्याचा महिमा आहे, एवढेच नव्हे तर हा त्याच्या महिम्याचा केवळ एक भाग असून तीन भाग आपल्या कल्पनेच्या पलीकडे आहेत. परमात्मा अथवा विराट पुरुषापासून सारी सृष्टी उत्पन्न झाली. देव, ऋषी, मनुष्य, पशू अशी विविध सृष्टी झाली. ऋषींनी यज्ञ केले व यज्ञापासून ऋक, साम व यजू हे तीन वेद झाले. ब्राह्मण हे विराट पुरुषाचे मुख, क्षत्रिय बाहू, वैश्य मांड्या व शूद्र हे त्याच्या पायापासून उत्पन्न झाले. त्याच्या मनापासून चंद्र, डोळ्यांपासून सूर्य, तोंडापासून इंद्र व अग्नी आणि प्राणापासून वायू झाला; अर्थात तो सर्व देवांचा देव आहे.

पान ३ वरून

## प्रोफेशनल हझार्डस्

बरेच वेळा त्या पदांमुळे अशा मंडळींचा हेवादेखील वाटतो. परंतु त्यांच्या त्या पदाच्या मानमरातबासोबत त्यांना सामना करावी लागणारी परिस्थिती फार वेगळी असते. वरकरणी बघता ते सारेच सोपे वाटते. परंतु एखादी व्यवस्था चालवित असताना त्या व्यवस्थेच्या संचालनामधील अडथळे त्या व्यवस्थेचा प्रमुख झाल्याशिवाय कळूच शकत नाहीत. आपल्या देशाचा विचार केला असता वेगवेगळ्या व्यवस्था कार्यरत आहेत. या व्यवस्था देशाचा कारभार योग्य पद्धतीने चालविण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या व्यवस्थांमधून मिळत असलेला लाभ सर्वसामान्य प्रत्येकाला मिळत असतो. त्या व्यवस्था उभारताना व त्याचे संचालन करताना अधिकारी मंडळींना कोणकोणत्या दिव्यातून जावे लागते, याचा कधीकधी विसर पडलेला असतो.

देशाला भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. हा चष्मा लावूनच सर्व बाबींकडे बघण्याची दुर्दैवाने आपल्याला सवय झाली असल्याने सार्वजनिक क्षेत्रातील कोणत्याही कार्याकडे संशयाच्या दृष्टीनेच बघितले जाते. भ्रष्टाचाराचा भाग खरा असला, तरीही प्रामाणिकपणे कार्य करणारे अधिकारी मोठ्या प्रमाणावर आहेत. तो चष्मा लावल्याने या प्रामाणिक अधिकाऱ्यांवर अन्यायच होतो. त्यांच्या त्या समर्पणाने कार्य करण्याच्या प्रक्रियेतील प्रोफेशनल हझार्डस्‌चा विचारही कुणी करीत नाही. असते ती केवळ अपेक्षा. ती अपेक्षा रास्त आहेच.

प्रचंड लोकसंख्येच्या आपल्या देशात, जेथे प्रत्येकच गोष्ट राजकीय रंग घेते, अशा ठिकाणी अधिकारी वर्गाला कार्य करणे किती अवघड आहे, याबद्दल माहिती असण्याची गरज आहे. अधिकारी सरकारी गाडीतून उतरतो किंवा एखाद्याला मोठे पॅकेज असते इतकेच वरकरणी आपल्याला दिसत असते. ती व्यवस्था राबवित असताना त्यांना सहन कराव्या लागत असलेल्या या अन्य बाबी लक्षातच येत नाहीत किंवा ते देखील त्या सर्व बाबींना आपल्या कामाचे साईड इफेक्टस् समजून स्वीकारतात. प्रोफेशनल हझार्डस् हा एक खरोखरीच सहानुभूती दाखविण्याचा विषय आहे.

कामाच्या रामरगाड्यामध्ये स्वतःच्या प्रकृतीकडेही लक्ष न देणारे अनेक अधिकारी वेगवेगळ्या व्याधींचे शिकार झालेले असतात; त्याबद्दल आपणास कल्पना नसते. दिवसेंदिवस कमी होत चाललेली कर्मचारी संख्या व उपलब्ध कर्मचारी मंडळींवर वाढता कामाचा बोझा हा कार्यालयाच्या बाहेर दिसत नाही. सध्या सर्वच कामे अत्यंत तातडीचे किंवा कालमर्यादित व सर्वोच्च प्राधान्य- या सदरात मोडत आहेत.

कार्यालयात एखादे काम वेळेवर झाले नाही म्हणून अधिकाऱ्याला सुनावून जाणारा नागरिक एखाद्याही दिवशी कार्यालय संपल्यावरही रात्री १० वाजेपर्यंत अधिकारी व त्याचे सहकारी कार्य करीत असतात हे बघत नाही. अधिकाऱ्यांनी आपल्या उच्च पदांसोबत येणारे प्रोफेशनल हझार्डस् स्वीकारलेलेच आहेत. तो त्यांचाच चॉईस आहे. पण असेही काही असते व त्याचा त्रास अधिकारी सहन करीत असतात, ही सहानुभूती बाळगणे आपल्याला शक्य होईल? शेवटी देशाची व्यवस्था चालतेच आहे आणि हे सर्व अधिकारी सर्व प्रोफेशनल हझार्डस् स्वीकारूनच तक्रार न करता ही व्यवस्था चालवितच आहेत, हे विसरता येत नाही. त्यांना या हझार्डस्‌मुळे सहन कराव्या लागत असलेल्या त्रासाबद्दल थोडी सहानुभूती दाखविण्याची गरज आहे. त्याचे मनोबल वाढविण्याचा प्रयास आपल्या सहानुभूतीतून होईल असे वाटते.

पान ४ वरून

## कान महोत्सव...

या बाजारपेठेचा मराठी चित्रपटांना फायदा व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे दादासाहेब चित्रनगरीच्या सहकार्याने काही मराठी चित्रपटांची निवड करून त्यांना या बाजारपेठेत सहभागी होण्याची संधी दिली जाते. २०१६ पासून सुरू केलेल्या या योजनेत 'रिंगण', 'दिठी', 'या गोष्टीला नावच नाही', 'सायकल' अशा काही दर्जेदार चित्रपटांना जागतिक वितरणाची संधी शोधता आली आहे.

या वर्षीच्या कान मार्केटसाठी रोहन मापुस्करच्या 'एप्रिल मे ९९' आणि रवींद्र जाधव यांच्या 'जीव' या दोन चित्रपटांची निवड करण्यात आलीय. या संधीचा फायदा चित्रपटाचे निर्माते करून घेतील आणि महाराष्ट्रात दाखविण्यात आलेले हे चित्रपट जगाच्या कानाकोपऱ्यात वितरित केले जातील, अशी अपेक्षा करू या.

पान ५ वरून

## मोहक 'मोह' फुलांची सांस्कृतिक श्रीमंती

मोव् वन म्हणजे मोहाचे जंगल. मोहाच्या लहान झाडाला 'मोहुर्ली' असे म्हणतात. विदर्भात मोहुर्ली या नावाची गावे आहेत. मोहगाव, मोहदा, मोहा, मोहदरी अशी गावांची गावे तेथील मोहाच्या जंगलामुळे ठेवली गेली असावी.

छत्तीसगडमध्ये मोह फुले गळण्याच्या हंगामाची गाणी आहेत. असेच एक गीत २०१४ मध्ये प्रजासत्ताक दिनी राजपथावर गायिले गेले. उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश वगैरे प्रांतात महुवा गीते आहेत. यज्ञात मधुक वृक्षाची समिधा काही विशिष्ट कारणासाठी टाकल्या जात असावी. काही भागात जंतू संसर्ग होऊ नये म्हणून घरात मोहाचे लाकूड जाळून धूर केला जातो. काही लोकसमूहांत मोहाच्या झाडावर देव राहतो, अशी लोकश्रद्धा आहे. विवाहप्रसंगी मोहाचा 'मुंडा' मिरवणुकीने विवाहस्थळी आणून त्याची पूजा केली जाते. यावेळी गावयाची गाणीही आहेत. मोहाला पवित्र वृक्ष मानले जाते. एकूण काय तर सुगंध, रंग, चव या दृष्टीने 'मोह'मयी असणारी मोहफुले सांस्कृतिकदृष्ट्या वैभवसंपन्न आहेत.

वेध — राहुल बोरगांवकर

**गतवर्षी पाकी जनरल असीम मुनीरने भारताबद्दल गरळ ओकली होती. 'काश्मीर हे आपले गळ्यातील हाड आहे' असा दावा करून त्याने भारतीय (हिंदू) व पाकिस्तानी हे कधीच एकत्र राहू शकत नाहीत, काश्मीर घेतल्याशिवाय पण स्वस्थ बसणार नाही, असे म्हटले होते. त्या भाषणानंतर १५ दिवसांतच पहलगामचा हल्ला झाला. आताही या मुनीरने कारण नसताना पुन्हा एकदा भारतविरोधी वक्तव्य केले. पण, 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही सुरूच आहे, याची त्याला आठवण करून देण्याची नितांत गरज आहे.**

# मुनीर, 'ऑप. सिंदूर' अजून सुरु आहे!

पाकिस्तानचा लष्करप्रमुख व स्वयंघोषित 'फील्ड मार्शल' जनरल असीम मुनीरने पुन्हा एकदा आपला फणा काढला आहे. रावळपिंडीतील काही लष्करी अधिकार्यांपुढे बोलताना त्याने गतवर्षी भारताबरोबर झालेल्या युद्धाचे कारण 'दोन विचारसरणींतील संघर्ष' असे केले आहे. तसेच या संघर्षात पाकिस्तान यशस्वी झाल्याचा दावाही केला. 'ऑपरेशन सिंदूर'ला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्त भारताने पाकिस्तानला इशारा दिला होता की, पाकिस्तानच्या कोणत्याही कोपऱ्यातील दहशतवाद्यांचा अड्डा भारताच्या मारक क्षमतेपासून दडून राहिलेला नाही. त्यानंतर रावळपिंडीत काही लष्करी अधिकाऱ्यांसमोर बोलताना जनरल मुनीरने या युद्धात पाकिस्तानचा विजय झाल्याचा दावा केला.

भारताने पाकिस्तानशी चार युद्धे लढली. त्या सर्व युद्धांत भारताचा विजय झाला. सारे जग ही वस्तुस्थिती मान्य करते. पण, फक्त पाकिस्तानच या सर्व युद्धांमध्ये आपणच जिंकल्याचा दावा करीत असतो. १९७१च्या युद्धात तर पाकिस्तानच्या ९३ हजार सशस्त्र फौजेने शरणागती पत्करली होती. त्या जवानांना आपल्या पॅन्ट खाली उतरवाव्या लागल्या होत्या. पाकिस्तानचा बांगलादेशातील कमांडर नियाझी हा शरणागतीच्या कागदपत्रावर स्वाक्षरी करतानाचा फोटो तर जगप्रसिद्ध आहे. तरीही, या युद्धात आपणच जिंकल्याचा दावा पाकिस्तानने सोडलेला नाही. कारण, प्रत्यक्ष लष्करी कारवाईत जरी भारताचा विजय झालेला असला, तरी नंतरच्या वाटाघाटींच्या टेबलावर भारताचा पराभव झाला होता. इतका मोठा लष्करी विजय मिळवूनही इंदिरा गांधींच्या कथित पोलादी नेतृत्वाला पाकिस्तानने पकडलेले भारताचे ५४ जवान आणि पाकव्याप्त काश्मीर काही परत घेता आले नव्हते किंवा पाकिस्तानकडून युद्धखर्चाची भरपाईही घेता आली नव्हती. असो).

गतवर्षीच्या युद्धात चारच दिवसांत भारताने आपली लष्करी कारवाई ताबडतोब थांबवावी आणि आपले अधिक नुकसान करू नये, यासाठी पाकिस्तानला अक्षरशः भीक मागावी लागली होती. भारताने ही कारवाई थांबवावी, यासाठी पाकिस्तानने आधी संयुक्त अरब अमिरातीला मधे घालण्याचा प्रयत्न केला. त्या देशाने यात मधे पडण्यास साफ नकार दिल्यावर पाकिस्तान आपल्या मायबाप अमेरिकेकडे भीक मागत गेला.

अमेरिकेनेही त्याला थेट भारताशीच बोलणी करण्याचा सल्ला दिला, तेव्हा पाकिस्तानच्या 'डीजीएमओ'ने दोनदा भारताच्या 'डीएमओ'ला फोन लावला होता. भारतीय लष्कराने आपले लष्करी लक्ष्य आधीच साध्य केले असल्याने भारतालाही युद्ध लांबविण्याची गरज भासत नव्हती. त्यामुळे भारताने युद्धबंदी जाहीर केली. हा सारा केवळ वर्षभरापूर्वीचा इतिहास आहे. पण, आपल्या जनतेच्या नजरेत आपली छिन्नभिन्न झालेली प्रतिमा कायम राहावी, यासाठी पाकिस्तानने या युद्धात आपलाच विजय झाल्याचा दावा केला. तो खरा वाटावा, यासाठी लष्करप्रमुख जनरल असीम मुनीरला चक्क 'फील्ड मार्शल' हा किताब जाहीर केला गेला. पण, ही लबाडी अडाणी पाकिस्तानी जनतेत पचली, तरी खरी गोष्ट ठाऊक आहे.

या युद्धाला पाकिस्तानने 'मार्का-ए-हक' (म्हणजे हक्काची लढाई) असे नाव दिले आहे. हे 'मार्का-ए-हक' म्हणजे केवळ दोन देशांतील वा दोन लष्करांमधील युद्ध नव्हते, तर दोन विचारसरणींमधील संघर्ष होता. अल्लाच्या कृपेने त्यात सत्याचा विजय झाला आणि खोटेपणाचा पराभव झाला. या संघर्षात पाकिस्तानची लष्करी रणनीती नेहमीच वरचढ राहिली, असा दावा जनरल मुनीरने केला. इतया निर्लज्जपणे खोटा दावा करणाऱ्या या माणसाशी कसला वाद घालायचा? मुनीर कोणत्या विचारसरणींची चर्चा करतो आहे? मुनीरची कसली आलीय विचारसरणी? दंगेधोपे करून बळजबरीने मिळविलेला प्रदेश आणि भिकेत मिळालेली शस्त्रास्त्रे यांच्या जोरावर पाकिस्तान फारच उड्या मारीत असतो.

एका अर्थी, मुनीरचा दावा खराही आहे. कारण, मुनीरची विचारसरणी एकच आहे आणि ती म्हणजे दहशतवाद पसरविणे! उलट, भारत हा शांततेचा अग्रदूत आहे. गरज नसताना भारताविरुद्ध आगळीक केलेल्या पाकिस्तानच्या झोळीतही भारताने दयेची भीक घातली होती. त्यामुळे मुनीरच्या विचारसरणीच्या विरोधात ही लढाई होती, हे खरेच. फक्त मुनीरचा निष्कर्ष चुकीचा आहे. विजय सत्याचा, म्हणजे भारताचा झाला आहे. पाकिस्तानची दहशतवादाची विचारसरणी ही फक्त भारताविरोधात नसून, ती शेजारच्या अफगाणिस्तानविरोधातही आहे. पण, दोन्हीकडे त्याला जबरदस्त मार खावा लागला आहे.



स्वतःला 'फील्ड मार्शल' म्हणवून घेणारा हा भ्याड जनरल, भारत जेव्हा हल्ले करीत होता, तेव्हा एका बंकरमध्ये (भूमिगत खोली) सुरक्षितपणे लपून बसला होता. या संघर्षाआधीच त्याने आपल्या कुटुंबीयांना लंडनला पाठवून दिले होते. म्हणजे त्याला स्वतःच्या जीवाची भीती तर होतीच; पण न जाणो, काही अघटित घडलेच; तर आपल्या कुटुंबीयांनाही त्याने सुरक्षित स्थळी हलविले होते. म्हणजे त्याचा आपल्याच फौजेच्या शौर्यावर विश्वास नव्हता आणि विजयाची खात्री नव्हती. 'फील्ड मार्शल' शब्दाचा अर्थ- युद्धाच्या वेळी प्रत्यक्ष रणभूमीवर राहून मार्गदर्शन करणारा नेता. पण, स्वतःला बंकरमध्ये दडवून ठेवणारा हा मुनीर 'फील्ड' नव्हे, तर 'बंकर मार्शल' ठरला. या युद्धात सपशेल शरणागती पत्करल्यावरही आपलाच विजय झाला, असा दावा करणारा हा 'फेल्ड मार्शल' आहे.

आता वर्षभराने या संघर्षावरील म्हणजे, पाकिस्तानच्या आणखी एका अपमानास्पद पराभवावरील खपली निघाल्याने त्यावर मलमपट्टी करण्यासाठी मुनीरला ही सारवासारव करावी लागत आहे. पण, 'ऑपरेशन सिंदूर' अजून सुरूच आहे, याची त्याला आठवण करून दिली पाहिजे. म्हणजे त्याला पुन्हा एक सुरक्षित बंकर शोधायला वेळ मिळेल.


आकलन — तेजस परब

स्टेट बँक ऑफ इंडिया'ने नुकत्याच जाहीर केलेल्या एका सर्वेक्षण अहवालात देशातील महिलावर्गाने पुढाकार घेत चालविलेल्या कुटुंबात सन्मानजनक नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. याचाच अर्थ, जेव्हा स्त्री एखाद्या घराची जबाबदारी स्वीकारते, तेव्हा घरातील व्यक्ती मोलमजुरीपेक्षा सन्मानजनक नोकरीकडे वळताना दिसतात, असे हा अहवाल सांगतो. या महिलांचा कलही साधारणपणे अशाच प्रकारच्या नोकऱ्या शोधण्याकडे असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकीकडे मोलमजुरी करणाऱ्या महिलांच्या संख्येत ४.२ टक्क्यांनी घट झाली आहे, तर सन्मानजनक नोकरी शोधणाऱ्या महिलावर्गात ४.४ टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे महिला आता सुरक्षित रोजगाराकडे वळत असल्याचा हा संकेत मानावा लागेल.

'स्टेट बँक ऑफ इंडिया'ने देशभरातील एकूण २.७० लाख कुटुंबांचे सर्वेक्षण केले, ज्यामध्ये ११.४८ लाखांहून अधिक नागरिकांची आकडेवारी नोंदवण्यात आली. शहराकडे कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अशा महिला ज्या कुटुंबप्रमुख आहेत, त्यांनी नियमित रोजगार प्रदान करणाऱ्या नोकऱ्यांचा मार्ग पत्करला. मोलमजुरी, वेठबिगारी, घरकाम, अन्य सफाईची कामे यापेक्षा 'कॉर्पोरेट' क्षेत्रातील कामांना त्या प्राधान्य देत आहेत. जिथे महिला कुटुंबप्रमुख आहेत, अशा घरांत नियमित वेतन देणाऱ्या नोकरदारांची संख्या वाढू लागली आहे. याचा अर्थ सरळ आहे. महिला स्वतः सुशिक्षित झाल्या आणि त्यांनी आपल्या घरातील सदस्यांनाही सुशिक्षित केले. गुलामगिरीच्या जोखडातून कुटुंबाला बाहेर काढले. कालपरवाच दहावी-बारावीचा निकाल जाहीर झाला, ज्यात अनेक विद्यार्थ्यांनी बिकट परिस्थितीवर मात करून घवघवीत यश संपादित केल्याच्या बातम्याही झळकल्या. पण, हे यश मुळात एकट्या मुलांचे नसतेच. त्यांना वारंवार मार्गदर्शक आणि प्रसंगी कठोर भूमिका घेणाऱ्या घरातील मातेचेही असते. महिलांनी स्वतः शिक्षण घेतलेच. मात्र, त्याचे महत्त्व आपल्या मुलांना, कुटुंबातील अन्य सदस्यांना पटवूनही दिले.

महत्त्वाचे म्हणजे, आर्थिक आणि अन्य महत्त्वाच्या विषयांमध्ये स्त्रियांचे म्हणणे कुटुंबियांनाही आता महत्त्वाचे वाटू लागले आहे. हे परिवर्तन अनुभवण्यासाठी निश्चितच एक काळ लोटला. स्त्रीला उंबरठा ओलांडून स्वतःला सिद्ध करावे लागले. ती 'स्वयंसिद्धा' बनली. मोलमजुरी, वेठबिगारी आणि अन्य कुठल्याही रोजंदारीच्या कामांपासून तिने स्वतः फारकत घेतलीच. शिवाय, आपल्या कुटुंबालाही त्या जोखडातून मुक्त केले. ग्रामीण भागातील महिलांच्या सर्वेक्षणाच्या आकडेवारीत असेही लक्षात आले की, वेठबिगारी, रोजंदारीच्या कामातील मजुरांमध्ये पाच टक्क्यांनी घट झाली आहे. कारण, ज्या घरातील महिला या कुटुंबप्रमुख आहेत, त्यांनीच भूमिका घेत अशाप्रकारच्या कामांपासून फारकत घेण्यास सुरुवात केली. याऐवजी आता अशा महिला आणि कुटुंबे छोट्याशा का होईना, स्वयंरोजगाराकडे वळली; ज्यामुळे कुटुंबांच्या आर्थिक व्यवहारात महिला केंद्रस्थानी आल्या.

> **'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' या पंक्तींतून संत तुकडोजी महाराजांनी महिला सक्षम आहेत, असा विश्वास दिला. याच विचारांच्या बीजांचा आता वटवृक्ष होऊ घातल्याचे चित्र दिसते. कारण, देशातील महिलांनी हा विश्वास अगदी सार्थ ठरवला आहे. त्या केवळ स्वतःच्या कुटुंबापुरती आर्थिक घडी बसवत नाहीत, तर त्या कुटुंबप्रमुखाच्या भूमिकेत असणाऱ्या प्रत्येक कुटुंबात रोजगार गुणवत्ता गतीने वाढत असल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्याविषयी...**



# 'ती'च्या हाती अर्थकारणाची दोरी!

मुलींच्या शिक्षणातील वाढत्या आकडेवारीमुळेच हा इतका मोठा बदल शय झाला. भारतात स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ ज्यांच्यामुळे रोवली गेली, त्या महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पाहिलेल्या स्वप्नामुळेच हे शक्य झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर स्त्रीशिक्षण क्षेत्रात होत चाललेली उत्तरोत्तर प्रगतीही याला कारणीभूत आहे. कारण, जर महिला अशिक्षित राहिली, तर रोजंदारीच्या कामांवर जाण्याचे प्रमाण वाढले असते. मात्र, ती शिकली आणि तिने ज्ञानदीप समाजात तेवत ठेवला.

जिथे- जिथे स्त्रीशिक्षणावर सरकारने भर दिला, त्या- त्या भागात महिलांच्या रोजंदारीचा प्रश्न घटत गेला. माध्यमिक आणि पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणार्या महिलावर्गात नियमित वेतन किंवा सुरक्षित नोकऱ्या मिळवणाऱ्या महिलांचे प्रमाण म्हणूनच सध्या अधिक आहे.

भारतात महिलांचा श्रम भागीदारी दर ४० टक्क्यांवर पोहोचला आहे. ग्रामीण भागात ४५.९ टक्के आणि शहरी भागात हा दर २७.७ टक्के इतका आहे. ज्यांनी कौशल्य किंवा प्रशिक्षण घेतले, त्यांनी स्वयंरोजगारावर भर दिला. त्यामुळे सरकारी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाचा व्याप आणि विस्ताराचा दर दूरवर ग्रामीण खेड्यापाड्यांत पोहोचवता आला, तर ही संख्या आणखी वाढणार आहे, हे निश्चित. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे सध्या 'व्होकल फॉर लोकल' हे जनआंदोलन उभारण्याच्या तयारीत आहेत. अशा वेळी प्रशिक्षणाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेला सुसज्ज अशा वस्तू व सेवा उत्पादन देऊ शकतील. याच अहवालात नमूद केल्यानुसार, स्त्रियांचा आर्थिक निर्णयातील वाढता सहभाग याचे द्योतक आहे. भारतातील महिला कामगारांची संख्या २०१७-१८ मध्ये २२ टक्के इतकी होती. २०२३-२४ मध्ये ती ४०.३ टक्के इतकी वाढली. 'पीएम मुद्रा' योजनेंतर्गत ६८ टक्के कर्ज महिलांना मिळाले. महिलांच्या रोजगारात ग्रामीण भागात ९६ टक्के आणि शहरात ४३ टक्के वाढ झाली. स्वयंरोजगार ३० टक्के वाढून ६७.४ टक्के इतका झाला. 'ईपीएफओ'च्या आकडेवारीनुसार, एकूण १.५६ कोटी महिलांना नोकऱ्या मिळाल्या. महिलांच्या नेतृत्वाखालील 'एमएसएमई' उद्योगांची संख्या १.९२ कोटी झाली. महिलांनी घेतलेला या सक्रिय सहभाग 'जीडीपी' दरात दोन टक्क्यांनी वाढ दर्शवतो. गरिबी कमी होण्यास मदत होईल व उद्यमशीलता वाढेल, असा अंदाज आहे. तसेच ३३.५ टक्के महिलांना कंपन्या आणि संस्थांमध्ये ३३.५ टक्के उच्चपदी जबाबदाऱ्या मिळाल्या आहेत. यासंदर्भातच एक उदाहरण घ्यायचे झाले, तर परिवहन क्षेत्राचा आवर्जून उल्लेख करता येईल. परिवहन क्षेत्र हे एकेकाळी पुरुषवर्गाची मक्तेदारी असलेल्या क्षेत्रात आज महिलाही दिसून येतात. शिक्षण, प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे या क्षेत्रातही महिलांनी प्रवेश केल्याचे हा अहवाल सांगतो. त्याचप्रमाणे खाणकाम आणि औद्योगिक क्षेत्राकडेही महिलांचा कल असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महिलांचा रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि कौशल्य विकास झाल्यास, त्यांचे त्या- त्या क्षेत्रांतील योगदान कसे महत्त्वाचे ठरू शकते, ही बाब या अहवालाने अधोरेखित केली आहे. त्यामुळे एकीकडे विरोधक 'नारीशक्ती वंदन' विधेयकाला विरोध करीत असले तरी दुसरीकडे भारतीय महिलांनी जवळपास सर्वच क्षेत्रांत गगनभरारी घेतलेली दिसते. मोदी सरकारने मागील १२ वर्षांत राबविलेल्या महिला सक्षमीकरणाच्या योजना आणि प्रभावी धोरणे यांचाच हा परिपाक म्हणावा लागेल. नारीशक्तीला वंदन!

# 'अधिक मास' : भक्ती, दान आणि अध्यात्माचा पवित्र काळ




निमित्त — प्रतिनिधी

यंदाचा 'अधिक मास' अर्थात पुरुषोत्तम मास १७ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत साजरा होत आहे. हिंदू धर्मशास्त्रात अत्यंत पवित्र मानला जाणारा हा महिना भगवान विष्णूंना समर्पित असून भक्ती, दान, उपासना आणि सात्विक जीवनशैलीचा संदेश देणारा मानला जातो. विशेष म्हणजे यंदा अधिक मास 'ज्येष्ठ' महिन्यात आल्याने ज्येष्ठ महिना तब्बल ६० दिवसांचा असणार आहे.

अधिक मासाला पुरुषोत्तम मास, मलमास, अधिमास, आसंक्रांती मास अशा विविध नावांनी ओळखले जाते. दर तीन वर्षांनी हा महिना येतो. या काळात विवाह, गृहप्रवेश, मुंज, नामकरण यांसारखी मंगल कार्ये टाळली जातात; मात्र पूजा-अर्चा, जप, दानधर्म आणि धार्मिक साधनेला विशेष महत्त्व दिले जाते.

**अधिक मास का येतो?**


भारतीय कालगणनेत सौर वर्ष आणि चांद्र वर्ष यांमध्ये फरक असल्यामुळे अधिक मासाची संकल्पना अस्तित्वात आली आहे. सूर्य एक परिक्रमा पूर्ण करण्यासाठी सुमारे ३६५ दिवस घेतो, तर चंद्राचे वर्ष सुमारे ३५४ दिवसांचे असते. या ११ दिवसांच्या फरकामुळे दर तिसऱ्या वर्षी जवळपास ३६ दिवसांचा तफावत निर्माण होते. हा समतोल राखण्यासाठी भारतीय पंचांगात अधिक मासाचा समावेश करण्यात आला आहे.

**भगवान विष्णूंच्या उपासनेला विशेष महत्त्व-**

अधिक मास हा भगवान विष्णूंना अर्पण केलेला महिना मानला जातो. या काळात विष्णूंची पूजा, गीता पठण, मंत्रजप, नामस्मरण, उपवास आणि सात्विक आहार याला विशेष महत्त्व आहे. ॐ नमो भगवते वासुदेवाय किंवा अष्टाक्षरी नारायण मंत्राचा जप केल्याने जीवनातील संकटे दूर होतात, अशी श्रद्धा आहे.

या महिन्यात पुराणश्रवण, भजन-कीर्तन, रुद्राभिषेक, जलाभिषेक, शिवपूजन आणि संकीर्तन यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांनाही मोठे महत्त्व दिले जाते. भाविकांच्या मते, या काळात केलेली भक्ती इतर महिन्यांच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक पुण्य देणारी असते.

**दानधर्माची परंपरा-**



अधिक मासात अन्नदानाला विशेष पुण्यकारक मानले जाते. गरजूंना अन्न, वस्त्र आणि मदत देण्याची परंपरा अनेक कुटुंबांमध्ये आजही जपली जाते. काही ठिकाणी ३३ जोडप्यांना भोजन घालून त्यांचा सन्मान केला जातो. याचबरोबर जावयाला जेवणासाठी बोलावणे, अनारशाचे वाण देणे आणि लेकीला भेटवस्तू देण्याची प्रथा देखील प्रचलित आहे. आईच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी 'आईची ओटी भरणे' ही परंपराही अनेक कुटुंबांमध्ये पाळली जाते. त्यामुळे कौटुंबिक सौख्य आणि समृद्धी लाभते, अशी श्रद्धा आहे.



**सात्विक जीवनशैलीचा संदेश-**

अधिक मासात तामसी आहार, मद्यपान आणि वाईट सवयींपासून दूर राहण्याचा सल्ला धर्मशास्त्रात दिला आहे. संयम, साधना आणि सकारात्मक विचार यामुळे मनःशांती लाभते, असा भाविकांचा अनुभव आहे.

**श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्माचा उत्सव-** अधिक मास हा केवळ धार्मिक विधींचा काळ नसून आत्मचिंतन, भक्ती आणि संस्कार जपण्याचा महिना मानला जातो. बदलत्या आधुनिक जीवनशैलीतही अनेक कुटुंबे परंपरा आणि श्रद्धा जपत हा पवित्र काळ उत्साहाने साजरा करतात. भक्ती, दान आणि सदाचाराचा संदेश देणारा अधिक मास प्रत्येकाच्या जीवनात अध्यात्मिक उर्जा निर्माण करणारा ठरतो.

# अराजकवादी मनसुब्यांना 'NEET'ची वीट

**'नीट' पेपरफुटीच्या अत्यंत गंभीर प्रकरणाने देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले, हे खरेच. मात्र, त्यावरुन विरोधी पक्षाने देशातील 'जेन-झी'ला बांगलादेशसारखे थेट सत्ताधार्‍यां विरोधात रस्त्यावर उतरण्याची केलेली कुटील डावाची भाषा ही सर्वस्वी दुर्दैवीच! पण, राहुल गांधी आणि अरविंद केजरीवालांसारख्या अराजकवादी नेत्यांनी आपले राजकीय स्वार्थाचे इमले उभारण्यासाठी, 'नीट'ची वीट रचून केलेला हा फुटकळ प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही!**

वेध प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रात पाऊल ठेवू पाहणार्‍या देशभरातील लाखो तरुण- तरुणींसाठी 'नीट' ही परीक्षा निव्वळ एक प्रवेशिका नसून, त्यांच्या कुटुंबाच्या स्वप्नांचा आणि वर्षानुवर्षांच्या तपश्चर्येचा तो एक महत्त्वाचा टप्पा. मात्र, २०२६च्या 'नीट' परीक्षेत जे काही घडले, त्याने या प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा गेला. कधी नव्हे, ते एकाच केंद्रावरील अनेक विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळणे, परीक्षेच्या वेळेत झालेल्या गोंधळाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना 'ग्रेस' गुण वाटणे आणि बिहारसह काही राज्यांत उघडकीस आलेले पेपरफुटीचे रॅकेट, या सर्व घटना निश्चितच संतापजनक आहेत.

'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' या संस्थेने सुरुवातीला जी बचावात्मक भूमिका घेतली आणि सर्व आरोप फेटाळून लावले, त्यामुळे संशयाचे धुके अधिकच दाट झाले. अखेर जनक्षोभ आणि पुराव्यांचा दबाव वाढल्यानंतर 'एनटीए'ला आपली चूक मान्य करावी लागली आणि विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घ्यावा लागला. पण, यातून विद्यार्थ्यांचा जो नाहक मानसिक छळ झाला, तो पैशांत किंवा गुणांत मोजता येणारा नाही. रात्रंदिवस एक करून अभ्यास करणारा प्रामाणिक विद्यार्थी आज स्वतःला व्यवस्थेचा बळी मानत आहे, हे देशासाठी दुर्दैवीच. या प्रकरणाचे गांभीर्य वेळीच ओळखूनच, केंद्र सरकारने या महाघोटाळ्याच्या तपासाची सूत्रे 'केंद्रीय अन्वेषण विभागा'कडे सोपवली. गुन्हेगारांच्या मुसक्याही आवळल्या जात आहेत. परंतु, यावरुन विरोधकांकडून जे राजकारण सुरू झाले, ते अधिक चिंताजनक म्हणावे लागेल.

'नीट' परीक्षेत गैरप्रकार झाले, हे सत्य नाकारता येणार नाही. दोषींवर कडक कारवाई व्हायलाच हवी. पण, जे घडले, त्यावर लगोलग राजकीय पोळ्या भाजण्याचा जो अत्यंत गलिच्छ प्रकार देशातील विरोधी पक्षांकडून सुरू आहे, तो या पेपरफुटीपेक्षाही भयंकरच! काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी या प्रकरणाचा वापर करून थेट देशात अराजक माजवण्याचे मनसुबे रचले असून, तसे आवाहनच देशातील तरुणाईला केले.

अरविंद केजरीवालांनी काल यासंदर्भात मांडलेली भूमिका अत्यंत धक्कादायक आणि त्यांच्या देशविघातक मानसिकतेचेच दर्शन घडवणारी आहे. बांगलादेश आणि नेपाळमधील 'जेन-झी' ज्याप्रमाणे सरकारला फेलावर घेऊ शकतात, तर भारतातील तरुणही तोच मार्ग अवलंबतील, असे प्रक्षोभक विधान करून केजरीवालांनी देशातील तरुणांची माथी भडकवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याच्या नावाखाली त्यांना थेट रस्त्यावर उतरवून देशात जाळपोळ, हिंसाचार आणि श्रीलंकेसारखी, बांगलादेशसारखी अराजकतेची परिस्थिती निर्माण व्हावी, हीच विरोधकांची सुप्त इच्छा यातून स्पष्ट होते. राहुल गांधीदेखील सातत्याने, 'मोदी सरकारने तरुणांचे भविष्य अंधारात ढकलले,' अशी विधाने करत आहेत. लोकशाहीत सरकारला जाब विचारण्याचा पूर्ण अधिकार विरोधकांना आहे.

विद्यार्थ्यांनीही साहजिकच रस्त्यावर उतरुन या प्रकरणाचा जाहीर निषेध नोंदवला. परंतु, विद्यार्थ्यांच्या निराशेचा आणि त्यांच्या संतापाचा असा गैरफायदा घेऊन त्यांना हिंसेकडे प्रवृत्त करणे, हा विरोधकांचा कुटील डावच! सत्ताधार्‍यांविरोधात देशात मुद्दाम असंतोषाची लाट निर्माण करण्यासाठी विरोधक आता विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून चालवत आहेत, हे देशातील सुज्ञ जनतेने वेळीच ओळखले पाहिजे. आज सरकारला धारेवर धरणारे आणि 'नीट'वरून गळे काढणारे विरोधी पक्ष स्वतःच्या कार्यकाळातील इतिहास सोयीस्कररीत्या विसरलेले दिसतात.

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'संपुआ' सरकारच्या काळात 'नीट' अस्तित्वात येण्यापूर्वी संपूर्ण देशासाठी 'एआयपीएमटी' ही परीक्षा घेतली जात असे. या परीक्षेत तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर सावळागोंधळ आणि पेपरफुटी होत असे की, सर्वोच्च न्यायालयाला थेट हस्तक्षेप करून ही परीक्षाच रद्द करावी लागली होती. त्यावेळी हरियाणा, मध्य प्रदेशसह अनेक राज्यांत पेपरफुटी आणि 'मुन्नाभाई स्टाईल'ने दुसर्‍याला परीक्षेला बसवण्याचे 'रॅकेट' राजरोसपणे चालायचे.

'व्यापमं घोटाळा' याच काळात फोफावला होता. त्यावेळी मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आणि तत्कालीन काँग्रेस नेत्यांनी कोणती कठोर पावले उचलली? त्यावेळी पेपरफुटी रोखण्यासाठी कोणताही ठोस कायदा न करता, केवळ मलमपट्टी करण्याचे काम झाले. आज मात्र हेच नेते पारदर्शकतेचे ढोंग रचून प्रवचने देत आहेत, हा त्यांचा निव्वळ दुटप्पीपणाच! खरं तर संपुआ सरकारच्या काळात पेपरफुटी ही एक 'अंडरग्राऊंड इंडस्ट्री' बनली होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या शिक्षण-माफियांवर 'सर्जिकल स्ट्राईक' करण्यासाठी ऐतिहासिक पावले उचलली. नुसती मलमपट्टी न करता, आजारावरच घाव घालण्याचे काम या सरकारने केले आहे. 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा, २०२४' हा मोदी सरकारने आणलेला सर्वांत कडक कायदा. या अंतर्गत पेपर फोडणार्‍यांना, गैरप्रकार करणार्यांना आणि त्यांना मदत करणार्‍या संस्थांना दहा वर्षांपर्यंतची कठोर कैद आणि एक कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच आताही 'नीट' प्रकरण उघडकीस येताच, सरकारने कोणतीही चालढकल न करता, अजिबात वेळ न दवडता थेट 'सीबीआय'ला पाचारण केले. यातूनच बिहार आणि झारखंडमधील मुख्य सूत्रधारांच्या मुसया आवळण्यात आल्या आहेत.

परीक्षा प्रक्रियेत आणि 'एनटीए'च्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी 'इस्रो'चे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या उपाययोजनाच स्पष्ट करतात की, सरकार प्रश्नांपासून पळ काढणारे नसून, व्यवस्थेतील कीड समूळ नष्ट करण्यासाठी कटिबद्ध आहे. निश्चितच 'नीट' पेपरफुटी प्रकरणाने व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या आहेत, हे नाकारुन चालणार नाहीच.



भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नये आणि विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रशासनाला आणखी काही कठोर पावले ही उचलावीच लागतील. पेपर प्रिंटिंगपासून ते परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचवण्याच्या प्रक्रियेत पूर्णपणे 'डिजिटल एन्क्रिप्शन' आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य करावा लागेल. ज्या खासगी शाळा किंवा महाविद्यालयांना परीक्षा केंद्रे दिली जातात, त्यांचे संपूर्ण 'ऑडिट' व्हावे. स्थानिक पातळीवरील साटेलोटे तोडण्यासाठी परीक्षा केंद्रांवर केंद्रीय निरीक्षकांची करडी नजर असावी. पेपरफुटी प्रकरणात पकडल्या गेलेल्या आरोपींचे खटले चालवण्यासाठी आणि त्यांना जलदगतीने शिक्षा देण्यासाठी 'फास्ट ट्रॅक' न्यायालयांची स्थापना करण्यात यावी, जेणेकरून गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक निर्माण होईल.

जे काही घडले, त्यामुळे झालेले विद्यार्थ्यांचे नुकसान भरून काढता येणार नाही हे खरे असले, तरी या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने सुरू आहे. विद्यार्थ्यांची आणि तरुणांची ऊर्जा ही देशाच्या उभारणीसाठी आहे, ती जाळपोळ किंवा अराजकतेसाठी नाही, हे तरुणांनीही समजून घेतले पाहिजे.

मोदी सरकार कायद्याच्या बडग्याने गुन्हेगारांना त्यांची जागा दाखवून देईलच. परंतु, केवळ राजकारणासाठी तरुणांच्या भावनेशी अशाप्रकारे खेळणार्‍या या राजकीय गिधाडांच्या फसव्या आवाहनांना बळी पडून स्वतःचे भविष्य पणाला लावू नये!

# कसा असेल यंदाचा मान्सून?



वेध प्रा. अशोक ढगे

**पाऊस कमी पडण्याचा अंदाज चिंताजनक ठरतो. अंदाज खरा ठरून पाऊस कमी पडल्यास शेतकरी, सरकार, उद्योग आणि वित्तीय संस्था आदी घटक अडचणीत येतात. त्यामुळे या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी समन्वयित आणि दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. योग्य नियोजन, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि तंत्रज्ञानाचा योग्य अवलंब यांद्वारे या संकटाचे परिणाम कमी करता येऊ शकतात.**

स्कायमेट आणि भारतीय हवामान विभागाचे येत्या पावसाळ्याविषयी जाहीर झालेले अंदाज बहुतांश सारखेच असून सामान्यपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. त्याची तुलना लगेच २०१४- १५ च्या दुष्काळी वर्षांशी व्हायला लागली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन महिन्यांपासून कमी पावसाच्या अंदाजानुसार खरीप हंगामाचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात खरिपाखालचे क्षेत्र पाच लाख हेक्टरने कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मे महिन्यात पावसाचा आणखी एक अंदाज येणार आहे. त्यातच पाऊस १५ दिवस अगोदर महाराष्ट्रात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. कमी काळात जास्त पाऊस झाला तरी त्याचा उपयोग नसतो. कमी पावसाचा अंदाज व्यक्त झाला की, त्याचे पडसाद केवळ हवामानापुरते मर्यादित राहत नाहीत, तर थेट देशाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात मान्सून हा अर्थचक्राचा कणा मानला जातो. त्यामुळे मान्सून कमी होण्याची शक्यता व्यक्त होताच शेतकरी, धोरणकर्ते आणि रिझर्व्ह बँक यांच्यासह संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्यांच्या मनात चिंता निर्माण होते. भारतामध्ये सुमारे ५० टक्क्यांहून अधिक शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम फटका बसतो, तो शेतकर्‍यांना. पेरणी उशिरा होते, काही ठिकाणी पेरणीच होत नाही तर काही भागात उगवलेले पीक टिकविणे कठीण जाते. पाण्याअभावी उत्पादन घटते आणि शेतकर्‍यांच्या उत्पन्नावर याचा थेट परिणाम होतो. शेती उत्पादन कमी झाल्यास ग्रामीण भागातील खरेदीशक्ती घटते. ती संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची असते. ग्रामीण मागणी कमी झाली की उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्रांवरही परिणाम दिसून येतो. अडचणीच्या काळात ग्रामीण मागणीनेच अर्थव्यवस्था सावरली आहे, हे दिसून आले आहे. मान्सून कमी राहण्याचा दुसरा मोठा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होतो. धान्य, डाळी, तेलबिया, ऊस यांसारख्या पिकांचे उत्पादन घटल्यास बाजारात पुरवठा कमी होतो. पुरवठा कमी आणि मागणी कायम असल्यामुळे किमती वाढतात. परिणामी महागाईला चालना मिळते. विशेषतः अन्न महागाई वाढल्यास सर्वसामान्य नागरिकांवर परिणाम होतो. घरगुती बजेट बिघडते आणि खर्चाचे नियोजन बदलावे लागते. महागाई वाढल्यास रिझर्व्ह बँकेसारख्या केंद्रीय बँकेसमोर मोठे आव्हान उभे राहते.

महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी व्याज दर वाढवावे लागतात किंवा इतर कडक आर्थिक धोरणे अवलंबावी लागतात; मात्र व्याज दर वाढल्यास उद्योगांना कर्ज महाग होते. गुंतवणूक कमी होते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावू शकतो. त्यामुळे एका बाजूला महागाई नियंत्रित करणे आणि दुसर्‍या बाजूला आर्थिक वाढ टिकविणे, हे संतुलन राखणे कठीण बनते. शासनकर्त्यांसाठीही ही परिस्थिती आव्हानात्मक असते. कमी पावसामुळे शेती संकटात आल्यास सरकारला शेतकर्‍यांसाठी मदत योजना जाहीर कराव्या लागतात. तसेच पाणीटंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलसंधारण प्रकल्प, सिंचन सुविधा यावर अतिरिक्त खर्च करावा लागतो. या सर्वांमुळे सरकारचा महसूल ताणला जातो आणि वित्तीय तुटीवर दबाव वाढतो. कमी मॉन्सूनचा परिणाम आयात-निर्यात धोरणावरही होतो. देशांतर्गत उत्पादन कमी झाल्यास अन्नधान्य आणि इतर कृषी वस्तूंची आयात वाढवावी लागते. उदाहरणार्थ डाळी, खाद्यतेल किंवा साखरेच्या बाबतीत उत्पादन घटल्यास आयातीवर अवलंबित्व वाढते. यामुळे परकीय चलनाचा खर्च वाढतो आणि व्यापार तूट वाढण्याची शक्यता निर्माण होते. दुसरीकडे काही पिकांचे उत्पादन घटल्यामुळे निर्यात कमी करावी लागते किंवा त्यावर निर्बंध घालावे लागतात; जेणेकरून देशांतर्गत पुरवठा कायम राहील. याचा परिणाम जागतिक बाजारातील भारताच्या प्रतिमेवरही होऊ शकतो.

ऊर्जा क्षेत्रावरही मान्सूनचापरिणाम होतो. जलविद्युत प्रकल्प पावसावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी असल्यास वीजनिर्मिती घटते. परिणामी इतर स्रोतांवर विशेषतः कोळसा आणि गॅसवर अवलंबित्व वाढते. यामुळे ऊर्जा खर्च वाढतो आणि उद्योगांवर परिणाम होतो. तसेच पाणीटंचाईमुळे शहरांमध्येही पाणीपुरवठ्यावर ताण येतो. त्यामुळे नागरी जीवनावर परिणाम होतो. पावसाविषयीचा अंदाज व्यक्त झाल्यानंतर नवी मुंबईसह राज्यातील अन्य शहरात पाण्याच्या वितरणात काही प्रमाणात कपात सुरू झाली. लातूरला मिरजहून पाणी दिल्याच्या आठवणी आणि कोपरगाव, मनमाडसारख्या शहरांमध्ये महिन्यातून एकदाच पाणी असे निर्णयही लगेच पुढे येतात. शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याला मर्यादा येतात. टँकर लॉबी कमी पावसाचा कसा फायदा घेते आणि त्यातून कसे आणि किती घोटाळे होतात, याबाबतच्या तक्रारी नवीन नाहीत. मान्सून कमी असल्यास ग्रामीण रोजगारावरही परिणाम होतो. शेतीतील कामे कमी झाल्यामुळे मजुरांना रोजगार मिळणे कठीण होते. यामुळे स्थलांतर वाढून शहरांवर ताण वाढतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे एकूण देशांतर्गत मागणी कमी होते. त्याचा परिणाम जीडीपी वाढीवर होऊ शकतो. याशिवाय, मानसशास्त्रीय परिणामही दुर्लक्षित करता येत नाही. शेतकर्‍यांमध्ये अनिश्चितता वाढते, कर्जाचा बोजा वाढतो आणि मानसिक तणाव निर्माण होतो. आत्मविश्वास कमी होतो; त्याचा परिणाम पुढील हंगामातील निर्णयांवर होऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे.

शेतकर्‍यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्राला लागलेला शाप आहे. कमी पाऊस, कमी उत्पादन आणि जगण्याच्या संघर्षातून वाढणार्‍या आत्महत्या या चक्रातून महाराष्ट्राची सुटका व्हायला तयार नाही. त्याचे कारण पुन्हा पावसावरचे जास्त अवलंबित्व हेच आहे. या पृष्ठभूमीवर सरकार आणि वित्तीय संस्था विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण, हवामान अंदाजाची अचूकता वाढविणे, तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला जातो. तसेच शेतकर्‍यांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षण आणि आर्थिक मदत दिली जाते. दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहता, शेती अधिक टिकाऊ आणि कमी पावसावर अवलंबून राहणार नाही, हे बघणे ही काळाची गरज आहे. कमी पावसाचा अंदाज हा संपूर्ण आर्थिक व्यवस्थेच्या नसा हलवणारा संकेत ठरतो. मान्सून हा भारताच्या अर्थचक्राचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यातील थोडीशीही अनिश्चितता मोठे परिणाम घडवू शकते. त्यामुळेच कमी पावसाचा अंदाज जाहीर होताच शेतकर्‍यांपासून धोरणकर्त्यांपर्यंत आणि रिझर्व्ह बँकेसारख्या वित्तीय संस्थांपर्यंत सर्वांच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. या परिस्थितीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले असता मान्सून हा देशातील 'मूक आर्थिक निर्देशक' असल्याचे लक्षात येते. शेअर बाजार, चलनवाढ, व्याज दर, ग्राहकांची खरेदी क्षमता या सगळ्यांवर पावसाचा थेट किंवा अप्रत्यक्ष प्रभाव असतो. पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम बाजारात एक प्रकारची सावध भूमिका दिसू लागते. गुंतवणूकदार काही प्रमाणात जोखीम टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण ग्रामीण मागणी घटण्याची शक्यता निर्माण होते.

ग्रामीण बाजारपेठेतील मंदीमुळे एफएमजीसी, ऑटोमोबाईल, बांधकाम यांसारख्या क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो. शेतकर्‍यांच्या दृष्टीने पाहिले तर कमी पाऊस म्हणजे केवळ उत्पादन घट नाही, तर निर्णयप्रक्रियेत मोठा बदल असतो. कोणते पीक घ्यायचे, किती गुंतवणूक करायची, पाण्याचे व्यवस्थापन कसे करायचे या सगळ्या बाबी अनिश्चित होतात. अनेक शेतकरी जोखीम टाळण्यासाठी कमी खर्चिक पिकांकडे वळतात. त्यामुळे एकूण उत्पादन संरचना बदलते. याचा परिणाम पुढील काही महिन्यांमध्ये बाजारात होणार्‍या उपलब्धतेवर आणि किमतींवर होतो. महागाईच्या दृष्टीने विचार केला असता कमी पावसाचा परिणाम केवळ अन्नधान्यापुरता मर्यादित राहत नाही. अन्न महागाई वाढली की त्याचा 'स्पिलओव्हर इफेक्ट' इतर क्षेत्रांवरही होतो. वाहतूक खर्च, उत्पादन खर्च, सेवा क्षेत्रातील किमती यापैकी सगळीकडे वाढ दिसू शकते. त्यामुळे महागाई व्यापक स्वरूप धारण करते. शासनकर्त्यांसाठी हा काळ कसोटीचा असतो. एका बाजूला शेतकर्‍यांना मदत करणे, पाणी व्यवस्थापन सुधारणे, महागाई नियंत्रणात ठेवणे आणि दुसर्‍या बाजूला वित्तीय तूट वाढू न देणे ही अनेक स्तरांवरील जबाबदारी असते. कमी मान्सूनचा विचार व्यापक केला, तर हवामान बदलाच्या मोठ्या चित्राशी जोडलेला दिसतो. अनियमित पाऊस, दुष्काळ आणि बदलते हवामान ही भविष्यातील मोठी आर्थिक आव्हाने ठरणार आहेत. त्यामुळे एका हंगामापुरता विचार न करता दीर्घकालीन टिकावू विकासाचा विचार करणे अत्यावश्यक आहे.